स्वप्न विक्रेत्यांच्या दुनियेत!

चित्र वार्ता पुस्तक पुरवणीसह

# माणूस

१२ एप्रिल १९७५ : एक रुपया



## विजय तेंडुलकर....

जनता मोर्चा. ३ एप्रिल.
मुंबईच्या हिशेबाने आणखी एक मोर्चा. जरा जास्त लांब आणि मोठा. जरा वेगळा. जरा अधिक आवाज करणारा.
तशाच पताका. निशाणे. घोषवाक्ये.
संघटनांची तशीच दिंडी. सरकारविरोधाचीच पालखी. त्याच घोषणा जरा चाल बदलून. कार्यकर्त्यांचा तोच उत्साह आणि आवेश, अनुयायांचे तेच मागून कधी शिस्तीने, कधी बेशिस्तीने पण चालत रहाणे. तेच पोलिस, त्याच म्युझिअमजवळच्या बॅरिकेड्स, तेच शिष्टमंडळाने मागण्यांचा एक खलिता सरकारदरबारी नेऊन देणे, तीच त्वेषयुक्त किंवा आक्रस्ताळी भाषणें. तेच शब्द, शब्दप्रयोग, आरोप, आव्हानें, धमक्या. हे सर्व घोषणा देत ऐकणारे, टाळ्या मारणारे कार्यकर्ते आणि त्यांना अनुसरणारे मोर्चेवाले. तेच तसेच.
आसपास, आगेमागे, इकडे तिकडे पोलिसांचे जथे, गाड्या आणि विखुरलेले बघे. कोणी संबंधित, कोणी नैमित्तिक. तसेच.
मुंबईच्या लेखी – आणि सरकारच्याही – हे नेहमीपैकी. रोजचे. मागील पानावर चालू पानावर आणि पुढे.
वृत्तपत्रात जरा विशेष प्रसिद्धी, तूर्त सरकारविरोधाचे दिवस. ‘ जनता ’ या नावाचे सर्व वृत्तपत्रांना विशेष प्रिय, म्हणे. पण अखेर मोर्चाच.
आणखी एक. जरा घसघशीत. थोडा वेगळा. महाराष्ट्राच्या राजधानीच्या भरगच्च दैनंदिनीतला एक आला-गेला तपशील.
पण मोर्चेवाल्यांच्या दृष्टीने हे इतकेच नसावे.
मुंबईतल्या मुंबईत घरून उठून नाहीतर कामावरून निघून मोर्चात सामील झालेले त्यातले सगळे नव्हते. मोर्चा संपला की घरी पोचायचे हा हिशेब काहींच्याच बाबतीत खरा.
उरलेले हजारो पंढरपूर, जळगांव, धुळे, पेण, पनवेल असे कुठून कुठून आलेले. कोणी तर मैलोगणती चालून आलेले. कित्येक आयुष्यात प्रथमच मुंबई नावाची ‘ त्यांची ’ नामांकित राजधानी पहात असलेले. बाया, पुरुष, धट्टेकट्टे, पांगळे, वृद्ध. एक तर एका लाकडी पायाचा.
वारली–पावरी–कातकरी–आदिवासी. जवळ एकेक बोचके. डोळ्यात अपार उत्सुकता. पावलात जन्मजात काटकपणा. स्वरात माणुसकी, बुजरेपणा, अपेक्षाच अपेक्षा.
त्यांना या अनुभवाने काय दिले ?
एकादा स्फूर्तिदायक सांघिक अनुभव ? नवा आत्मविश्वास ? उमेद ? लढाऊ विचार ? निदान मोठ्या शहरांतले त्यांचेच भारतीय ‘ भाऊ-बहीण ’ जगतात ते ‘ जीवन ’ आणि स्वतःचे लांब रानावनातले आदिवासी ‘ जगणे ’ यातल्या प्रचंड तफावतीची बोचरी जाणीव ? नवी बेचैनी ? एक राग ?
त्यांनी परत काय नेले ? ती या मोर्चाची असल्यास खरी जमा. बाकी नव्या मोर्चांच्या रेघोटचांनी त्या मोर्चाच्या खुणा भराभर पुसल्या जातच आहेत. मुंबईचे बहुरंगी बहुढंगी वगैरे जीवन अबाधित चालू आहे.
( सरकार पक्षाचेही. )
तिकडे बिहारात काही घडो, इकडे कसे सर्व आलबेल आहे. (की नाही ? ) □

# माणूस


| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर<br>सौ. निर्मला पुरंदरे | १२ एप्रिल<br>१९७५ | अंक : पंचेचाळीसावा<br>किंमत : एक रुपया |

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० दूरध्वनी ४३४५९ । छायाचित्र मांडणी : सुनिल कुरणे










# मुंबई अवाक् झाली...

धुळे-शहादा, मोरवाडा, तलासरी, डहाणू या भागातून आलेल्या आदिवासी स्त्रिया हा या मोर्चातील सर्वात कौतुकाचा आणि अभिमानाचा विषय होता. डोक्यात फुले माळलेल्या रणरणत्या उन्हात अतिशय शिस्तीत अनवाणी चालणाऱ्या या आदिवासी महिला आणि दऱ्याखोऱ्यात राहणारे हे आदिवासी २०० मैल धुळ्याहून चालत आले होते.





मोर्चातील ही नेते मंडळी




मुंबईला विद्रूप करणारे हे जाहिरात फलक

भडक .. बटबटी सेक्सी

सर्व साधारण माणसालाही कळत असेल कीं मुलायम कांतीची कोणतीही नटी लक्स साबण वापणार नाही. पण इथे प्रश्न असतो वातावरण निर्मितीचा. हा साबण कमी किंमतीचा–म्हणजेच आमजनतेसाठी. सामान्य माणसाला चंदेरी दुनियेचं खूप आकर्षण. मग शर्मिला टागोर आणि लक्स या दोन गोष्टी त्याच्या डोक्यात घट्ट बसतात–बसवल्या जातात. आणि ही जादू, ही किमया साधली जाते जाहिरातींनी.

या जाहिरातजगाचा परिचय करून देणारा लेख

# स्वप्न विक्रेत्यांची ही दुनिया

छाया दातार

या युगाला जाहिरातीचं युग असं कधी कधी कौतुकाने आणि कधी विषादाने म्हटलं जातं. माणसाचा स्वतःवरचा ताबाच नाहीसा होतो. अगदी सकाळी उठल्यापासून झोपेपर्यंत मी टूथपेस्ट कोणती वापरावी, कसं हसावं, कोणते कपडे घालावे, कोणतं टॉनिक घ्यावं, इतकंच काय सिनेमा कोणता बघावा याबद्दलचे सल्ले सतत माझ्या कानावर आदळत असतात, डोळ्यांपुढून सरकत असतात. एक प्रकारचं ब्रेन वॉशिंगच म्हणाना ! अर्थात आता हेही तितकंच खरं की, या जाहिरातबाजीची इतकी सवय झालेली असते की, जसं नायगारा गावात राहणाऱ्या लोकांच्या रक्तात नायगारा धबधब्याचा आवाज भिनून जातो आणि मग एक दिवस नायगाऱ्याचा आवाजच लुप्त होतो. नायगारा गोठतो. लोकांना काही सुचत नाही. लोक वेडे होतात. काहीतरी हरवल्याचं फिलिंग येतं. आता समजा, उद्या वर्तमानपत्रातल्या जाहिराती अदृश्य झाल्या. रेडिओवरच्या जाहिरातीवर बंदी आली आणि रस्त्यावरचे फलक काढून घेतले तर–तर लोक वेडेपिसे होतील. गंमत म्हणजे एकूण जाहिरातीपैकी–विशेषत: ग्राहकोपयोगी ब्रॅन्डेड वस्तूंच्या जाहिरातीचा उपयोग भारतातील १० ते १२ टक्के लोकांसाठीच असतो. म्हणजे तेवढ्याच लोकांना या वस्तू घेण्याची ऐपत असते. बाकीच्या लोकांसाठी ती केवळ स्वप्ने असतात. स्वर्गसुखाची. अर्थात ती जीवनातील भुकेची पोकळी भरून काढण्यासाठी उपयोगी पडतात. हो, चित्रपटांच्या रस्त्यावरील मोठाल्या जाहिराती मात्र जास्तीत जास्त लोकांच्या भावविश्वात मानाचे स्थान पटकावतात. अर्थात तेही स्वर्गीय नयनसुखच. फक्त कल्पनाशक्तीला किल्ली देणारे.

## जाहिरात—संवाद

मात्र ही जाहिरातबाजी आपल्याला वाटते तितकी सोपी नाही. स्वस्त तर मुळीच नाही. तिचेही एक स्वतंत्र शास्त्र आहे. मानसशास्त्र, चित्रकलाशास्त्र, शब्दांचे शास्त्र अशा अनेक शास्त्रांचा उपयोग करून ह्या जाहिराती आकर्षक स्वरूपात आपल्यापुढे येतात. जाहिरात म्हणजे काय ? कम्युनिकेशन. संवाद. विक्रेता आणि ग्राहक यांच्यामधील दळणवळण. आमचा जाहिरातधंद्यातला एक मित्र गंमतीने म्हणतो, कम्युनिकेशन म्हणजे काय, to tell, to hide, to mislead. तुम्ही पुष्कळ काही सांगता, बरंच काही लपवता आणि दुसऱ्याच दिशेला घेऊन जाता. मला वाटतं, जाहिरातीत ही तिन्ही अंगे अभिप्रेत आहेत. ज्या वस्तूची विक्री करायची त्या वस्तूबद्दल तुम्ही थोडसं अतिशयोक्तीपूर्ण सांगता. त्या वस्तूतील दोष झाकायचा प्रयत्न करता. उदा. लक्स साबू फार बुळबुळीत असतो. पाण्यात तो फार लवकर विरघळतो. लवकर संपतो. तेव्हा तुम्ही हे दोष लपविण्यासाठी मुलायम शब्दावर भर देता. आणि दुसऱ्याच दिशेला लोकांना घेऊन जाता. उदा. शर्मिला टागोर लक्स वापरते आणि म्हणते, ' ये लक्स मेरे कान्तीके लिये कितना अच्छा और मुलायम है. ' शर्मिला टागोर लक्ससारखा स्वस्त साबण वापरत असेल का ! कोणाही कॉमनसेन्स असलेल्या माणसाच्या हे सहज लक्षात येईल. पण येथे प्रश्न आहे वातावरण निर्मितीचा. हा साबण कमी किंमतीचा—आम जनतेसाठी. सामान्य माणसाला चंदेरी दुनियेचे नेहमीच आकर्षण वाटते. त्यांच्यासारखंच आपण बोलावं, करावं, चालावं, राहावं, साबण वापरावा. मग शर्मिला टागोर आणि लक्स या दोन गोष्टी त्याच्या डोक्यात घट्ट बसतात.

थोडक्यात काय तर हे सगळं स्वप्निल जग. अतिशयोक्तीचे जग. ग्राहकांचे मन वळविण्याची स्पर्धा. ग्राहकाचा अनुनय करायचा, त्याच्या इच्छेला आवाहन करायचे, उद्दिपीत करायचे, गरजा ओळखायच्या, नव्या निर्माण करायच्या. मालासंबंधी विश्वास उत्पन्न करायचा, प्रत्यक्षात, कल्पनेत.

## जाहिरातीचा जन्म

बहुधा सगळ्या मोठ्या कंपन्यांमध्ये ' बाजाराचे संशोधन ' करणारे एक खाते असते. वेगवेगळ्या प्रकारचे सर्व्हे करून आपल्या मालाला केवढी बाजारपेठ जास्तीत जास्त उपलब्ध होऊ शकेल, कोणत्या वर्गातील लोक आपला माल घ्यायला तयार होतील, किती लोकांची माल विकत घेण्याची ऐपत असेल वगैरे अहवाल ही मंडळी तयार करतात. छोट्या कंपन्या ' बाजार-मार्गदर्शक ' कंपन्यांकडून असा अभ्यास कंत्राट देऊन करवून घेतात. हा अहवाल विक्री व्यवस्थापकाकडे (मार्केटिंग मॅनेजर) जातो. ही बाजारपेठ काबीज करण्यासाठी, पूर्णपणे ताब्यात ठेवण्यासाठी, ग्राहकांचे मन वळविण्यासाठी, त्यांना माहिती देण्यासाठी त्याला जाहिरातीची गरज भासते. तो प्रथम आपली गरज काय आहे ती निश्चित करतो.

१ : नवी वस्तू बाजारात विक्रीसाठी आणणे.

२ : वस्तू अधिक टिकावी किंवा अधिक आकर्षक दिसावी म्हणून नव्या प्रकारचे वेष्टन बाजारात आणण्याचा निर्णय घेणे. यासाठी बरेच तंत्र असते. एका अमेरिकन कंपनीचा याबाबतचा अनुभव असा आहे की, एकाच वस्तूला तीन-चार प्रकारची वेष्टने वापरून एखाद्या भागात नमुन्यादाखल ती वस्तू वाटली. नंतर गिऱ्हाइकांकडे जाऊन त्यांचे मत अजमावायचा प्रयत्न केला. त्यावेळी जे काही निष्कर्ष निघाले ते असे : पांढरा रंग स्वच्छतेचे प्रतीक वाटते. लाल वेष्टन श्रीमंती दाखवते. पिवळे वेष्टन सेक्सी फिलिंग देते वगैरे. यापैकी ज्या प्रकारची प्रतिमा तुमच्या वस्तूला शोभेल ते वेष्टन वापरण्याचा निर्णय घेतला जातो.

३ : प्रथमपासून बाजारात आलेलीच वस्तू पण वेगळ्या उपयोगासाठी किंवा लोकांच्या वेगळ्या गटासाठी आहे किंवा वेगळ्या स्वरूपाची आहे असे सूचित करणे.

४ : किंवा स्पर्धक कंपनीचा माल जास्त विकला जात असेल तर स्पर्धेत भाग घेऊन आपल्या मालाचे स्थान टिकविणे किंवा वाढविणे. उदा. शीतपेयामध्ये कोकाकोला, गोल्डस्पॉट, लिम्का यामध्ये मोठ्या प्रमाणावर स्पर्धा चालू असते. तसेच कपड्याच्या साबूची पावडर सर्फ, मॅजिक, डेट, स्वे यांची स्पर्धा तर आपल्याला रोज जाणवते.

यापैकी प्रत्येक गरजेसाठी वेगळ्या प्रकारची जाहिरात मोहीम आखावी लागते.

## स्वप्नांचे विक्रेते

हा विक्री व्यवस्थापक नंतर जाहिरात कंपनीकडे जातो. जाहिरात कंपन्या स्वतंत्र असून वेगवेगळ्या उत्पादक कंपन्यांच्या मालाच्या जाहिरातीचे कंत्राट घेत असतात. विक्री व्यवस्थापक तेथील जाहिरात अधिकाऱ्याला आपली गरज सांगतो आणि मग जाहिरातीची चक्रे फिरू लागतात. मोहीम आखली जाते. येथेच ' ग्लॅमर वर्ल्ड ' झगमगणाऱ्या जगाला सुरुवात होते. या क्षेत्रात लहान मोठ्या बऱ्याच कंपन्या आहेत. व्हीजन, टॉम अ‍ॅन्ड बे, प्रतिभा अ‍ॅडव्हरटायझिंग, रॅडिकल पब्लिसीटी या काही मराठी माणसांनी चालवलेल्या कंपन्या. त्यातही जाहिरातीचे दोन प्रकार. औद्योगिक वस्तू आणि ग्राहकोपयोगी वस्तू. तुम्ही-आम्ही बघतो, चर्चा करतो त्या या ग्राहकोपयोगी वस्तू. या वस्तूंमध्ये स्पर्धा अगदी अटीतटीची असते. या वस्तूंच्या जाहिरातीचे काम पुष्कळदा मोठ्या कंपन्या करतात. हिंदुस्थान थॉम्पसन, अय्यर्स, उल्का, शिल्पी इ. या त्या मोठ्या कंपन्या. आल्या आल्याच दर्शनी भागात यांच्या सजनशीलतेचा प्रत्यय येतो. जाहिरात जगातले लोक स्वतःला भयंकर सृजनशील (creative) मानतात. लांब वाढलेले केस, जाड फ्लॅशी टाय, झकपक फॅशनेबल कपडे असे इतर ऑफिसांतून न आढळणारे वातावरण हे यांच्या ऑफिसचे वैशिष्ट्य.

## कल्पक लेखक

जाहिरात अधिकारी हा सिनेमातल्या दिग्दर्शकाची भूमिका घेतो. सगळ्यांकडून मदत घेऊन हा तयार जाहिरात बाजारात मांडतो.

याचे काम नव्या, ताज्या जिवन्त कल्पना शोधून काढणे, जाहिरातीचा विषय ठरवणे आणि त्यावर गोष्ट (theme) तयार करणे.

याचे उदाहरण म्हणून आपण ही एक सिगारेटची जाहिरात पाहू. विल्स फिल्टर या सिगारेटसाठी ' मेड फॉर इच अदर ' ही गोष्ट सुचविली गेली आणि ही ' कॉपी ' (जाहिरातीतील मजकुराला कॉपी म्हणतात) फार गाजली. त्यामागचे मानसशास्त्र शोधून पाहणे फार गंमतीचे आहे. या जाहिरातीत एक सुखी तरुण, यशस्वी जोडपं आपल्याला दिसतं. जणू एकमेकांसाठी जन्माला आलेलं.

एकमेकांच्या डोळ्यात पाहात मश्गुल, कधी जोडीने नौकाविहार करताना, कधी जगाला विसरून जहाजाच्या डेकवर निवान्त गप्पा मारताना. एक लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे की, ह्यातला तरुण व तरुणी कोणी नटनटी नाहीत. देवदूतासारखे भयंकर सुंदर नाहीत, ग्लॅमरस नाहीत. किंचित स्मार्ट, जरासे नीटस, बस्. एवढेच. जणू त्यांच्याऐवजी तेथे तुम्ही-आम्ही असलो तरी काहीच फरक पडणार नाही. किंबहुना तेच जाहिरातदारांचे उद्दिष्ट आहे. त्यांनी निवडलेले प्रसंग मध्यमवर्गीय माणूस स्वप्नात नेहेमीच पाहत असतो. प्रेयसी साधीच– पण फक्त त्याच्यावर प्रेम करणारी— तिच्या संगतीत धुंद क्षण– आणि बरोबर विल्स– सगळाच प्रसंग तंबाखूच्या किंचित कडवट सुगंधाने अधिकच गडद होतो. विल्स केवळ त्यासाठीच– तुमच्यासाठीच. **विल्स आणि तुम्ही जणू एकमेकांसाठीच**. जशी तुमची सखी, प्रेयसी, पत्नी. याच विल्सने पनामाबरोबर स्पर्धा करून आपला जम बसवला.

अतिशय कलात्मक, खोडसाळ, मनोरंजक जाहिरात म्हणून बॉम्बे डाईंगच्या एका जाहिरातीचे उदाहरण घेता येईल. नेहेमी जाहिरात म्हटली की, सुंदर चेहऱ्याची बाई, तिचे कमनीय शरीर वगैरे पाहण्याची इतकी सवय झालेली असते की, ह्या जाहिरातीतील एक जाडजूड हसऱ्या चेहेऱ्याची मुलगी जेव्हा अंगभर टॉवेल गुंडाळून तुमच्या समोर येते तेव्हा पानं उलटता उलटता तुम्ही पटकन थांबता. तिचं जाडजूड शरीर खुदकन् हसायला लावते, टॉवेल आवडतो आणि मग नजर वळते अक्षराकडे–' मी फक्त बॉम्बे डाईंग कंपनीचेच टॉवेल्स वापरते कारण ते वाटेल त्या आकाराचे मिळतात. ' मान लिया– निरोप पोचला. बॉम्बे डाईंग आजकाल आपल्या आकर्षक जाहिरातींसाठी विशेष ख्यातनाम झालीय ती यामुळेच.

चांगल्या कॉपीचे आणखी एक उदाहरण देता येईल एअर इंडियाचे. त्यांच्या महाराजाने फारच प्रसिद्धी आणि आपुलकी मिळविली आहे. उद्योगधंद्यातील बड्या असामी, आरामासाठी प्रवासाला निघालेली श्रीमंत मंडळी, शिक्षणक्षेत्र, राजकीय वर्तुळ यातील लोक त्यांचे गिऱ्हाईक. त्यांचा एखाद्या महाराजाच्या गेस्ट हाऊसमध्ये शोभेल असा आदबशीर मुलाहिजा ठवला जातो. महाराजा जातीने हजर असतो. (राज्यकारभाराच्या कटकटीतून मोकळे झाल्यामुळे महाराजांना उद्योग काय ?) या महाराजाच्या जोडीला आपल्या विमान वेगाला शोभेल अशा पद्धतीने एअर इंडिया आपल्या घोषणाही नव्या नव्या आणि ताज्या शोधून काढत असते. आजूबाजूला घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीची नोंद घेत. गेल्या वर्षीची त्यांची एक उत्तम जाहिरात म्हणजे जागतिक हॉकी टूर्नामेंटसाठी हॉकीची टीम परदेशी गेली तेव्हा फलकावर वाक्य होते——

' I give you the world, you bring me the cup '

(word आणि world मधील कोटी लक्षात आली असेलच.)

' मी तुला जग देतो तू मला सुवर्ण कप आण. ' आणि बिचारी

लंकी टीम रौप्यपदक घेऊन परत आली तेव्हा एअर इंडियाने सांत्वन केले,

'Nor everyone can afford gold these days I will settle for silver.'

या दिवसात सोनं सगळ्यांना कुठं परवडतंय्. मी आपला चांदीवर समाधान मानतो.

यातल्या खुमासदार विनोदावर कोणीही खूष व्हावे आणि म्हणावे, 'हुशार माणसे आहेत बुवा.' अर्थात त्यांच्यावर टीका होतेच. तुमचे फलक फार नर्म विनोदाचे असतात. सामान्य माणसाला कळत नाहीत. त्यावर त्यांचे उत्तर– सामान्य माणूस का विमानात बसणार आहे ?

### दृश्यवेधक (Visualizer)

विषयाला अनुसरून दृश्यस्वरूप तयार करणे हे याचे काम. त्याच्या हाताखाली कमर्शियल आर्टिस्टचा ताफा असतो. कल्पना मनात आली की तऱ्हतऱ्हेने मांडून बघितली जाते. आपल्याला हवे ते मॉडेल निवडायचे, तिचा फोटो काढून घ्यायचा, हव्या तशा आकर्षक पार्श्वभूमीवर तो फोटो मांडून बघायचा. जाहिरातीतील वस्तूशी त्या सबंध चित्राचे नाते जोडायचे, यासाठी हा आपली प्रतिभाशक्ती राबवतो. श्री. गरूड, श्री. र. कृ. जोशी इ. नावे या क्षेत्रात फार नावाजलेली आहेत. एखाद्या जाहिरातीत पार्श्वभूमीसाठी रंग कुठचा वापरावा. चेहेऱ्याची मांडणी कशी असावी इ. गोष्टींबरोबरच ती वस्तू कोणत्या वर्गासाठी आहे, या गोष्टीचाही त्यांना विचार करावा लागतो. उदा. लक्स सुप्रीम हा महाग किंमतीचा साबू. श्रीमंत लोक वापरणार. तेव्हा त्याच्याभोवती श्रीमतीचे, ऐश्वर्याचे वातावरण निर्माण व्हायला पाहिजे. या गोष्टीकडे ते आवर्जून लक्ष देतात.

या दृश्यवेधकाला बऱ्याच वेळा मदत घ्यावी लागते फोटोग्राफरची. पूर्वी पुष्कळदा काल्पनिक चित्रे चालत असत. हा जमाना आहे चालत्या–बोलत्या माणसांच्या चित्रांचा. त्यांचे जिवन्त फोटो जाहिरातींना उपयोगी पडतात. विलास भेंडे आज जाहिरातजगात मोठा भाव खाऊन आहेत. मात्र हवा तसा फोटो हव्या त्या वातावरणात येण्यासाठी पुष्कळ कष्ट घ्यावे लागतात, भटकावे लागते. स्टुडिओमध्ये सुद्धा फोटो काढताना पुष्कळ ट्रिक्स् वापराव्या लागतात. परवाचीच एक गंमत भेंडे सांगत होते.

बाजारात एक नवी टूथपेस्ट येऊ घातली आहे. तिच्या जाहिरातीसाठी फोटो घेणे चालू होते. 'ब्रशवर काढलेली टूथपेस्ट' असा साधा–सरळ विषय. ब्रश ठेवला गेला. टूथपेस्ट त्यावर काढली गेली. प्रकाशझोत टाकले गेले. आता फक्त कॅमेरा नीट फोकस करून शॉट मारायचा, पण कॅमेरातून पाहता पाहता लक्षात आलं, टूथपेस्ट ताजी दिसत नाही. वरची गोलाई गेलेली टूथपेस्ट दबलेली. पेस्ट काढून तोडताना जो एक ऐटबाज तुरा शेवटी आलेला दिसतो तोही आला नव्हता. चला, पुन्हा ब्रश धुवा, टूथपेस्टचा नवा तुकडा. यावेळेला तर चक्क टूथपेस्ट पातळ होऊन गळायला लागली. अरेच्चा, या प्रकाशझोतांनी बरीच उष्णता निर्माण केली होती. अनेक प्रकार झाले. शेवटी फ्रिजमध्ये ठेवून पेस्ट गोठवावी अशी कल्पना निघाली. तासाभराने पुन्हा एकदा पेस्टबाई ब्रशबुवांच्या मांडीवर लाडिकपणे बसल्या. यावेळी मात्र दोघांनीही आपला रुबाब सांभाळला. आणि तब्बल तीन तासांनंतर भेंड्यांना यश आले. मात्र भेंड्यांच्या स्टुडिओचे आणि कौशल्याचे भाडे तासागणिक वाढत होते. स्वीकारलेल्या प्रत्येक फोटोचे पैसे वेगळे, फोटोच्या कागदाचे, फिल्मची किंमत वेगळी.

स्टुडिओमधली दुसरी गंमत होती कोपऱ्यात ठेवलेली मोटार सायकल. मला पुठ्ठ्याच्या चंद्रावर बसलेल्या डोहाळतुलीचा फोटो


व्हिएतनाममध्ये उसळलेल्या युद्धाची सचित्र कहाणी

**व्हिएतनाम अर्थ आणि अनर्थ**

लेखक : **रा. म. शास्त्री** (वि. ग. कानिटकर)

व्हिएतनाममधील प्रदीर्घ लढ्याचे समग्र दर्शन घडविणारे पहिले पुस्तक

**प्रसिद्धी दिनांक : १२ एप्रिल ७५**

**पृष्ठे ४५२ + ३० मूल्य तीस रुपये**

**सवलतीचे मूल्य रुपये वीस फक्त**

टपालखर्च १ रु. V. P. ने किंवा M. O. ने मागवा

**सरिता प्रकाशन, 'वरदा' सेनापती बापट पथ, पुणे १६.**

ब्लॅक टूथ पावडर

काजळ. नेत्रांजन. बाळगोळी



उत्पादक

**काकडे ॲण्ड सन्स, २८ नवी पेठ, पुणे ३०**

काढतात त्याची आठवण झाली. भेंडे म्हणाले, 'हसू नका. सगळंच काही आउट डोअर शूटिंग शक्य नसतं. त्याचे श्रम, भाडे खूप असतं.' ती मोटार सायकल आणली होती सहलीला निघालेल्या चार जोडप्यांचे फोटो घेण्यासाठी. बॉम्बे डायिंगच्या कपड्यांची जाहिरात. मोटार सायकलवरून जोशामध्ये सहलीला निघालेली मंडळी. फुलपाखरासारखा आनंदी मूड. स्टुडिओमध्ये मोटार सायकली आल्या पण गतीचा परिणाम कसा साधायचा ? दोन एक्झॉस्ट फॅनस आणले. समोरून वाऱ्याचा झोत टाकला. मॉडेलसच्या अंगात वारे भरले. केस उडू लागले. मंडळी चेकाळून हसू लागली आणि मूड जमला.

भेंड्यांनी सांगितले, 'मॉडेलसचा अनुभव बरा आहे. हवी तशी पोझ, पाहिजे तेवढंच हसू, काकणभर कमी नको, जास्त नको. अस्से नाक आणि तस्से डोळे त्या करतात आणि त्या आता अनुभवीही झाल्यात. शिवाय त्यांना स्वीकारलेल्या एका पोझसाठी ५० रुपयांपासून ते २००० रुपयांपर्यंत पैसे मिळतात. कबीर बेदी हा आताचा नट पूर्वीचा ठाकरसी सूटींगचा फाकडू हिरो. सर्वांत जास्त किंमत. आणि शीला जोन्स, सलोमी या आघाडीच्या स्त्री-मॉडेल्स. ह्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक विशेष असतो की, नटनटयांसारखी ती या जगाबाहेरची माणसे वाटत नाहीत. तुमच्या-आमच्यातीलच पण जरा स्मार्ट.

## माध्यम नियोजक

आता आपण पुन्हा एकदा झगझगणाऱ्या अंगाच्या बाहेर पडतो आणि पुन्हा बाजार, नफा वगैरे धंद्याच्या जगात शिरतो. विशिष्ट वस्तूच्या जाहिरातीसाठी कोणते माध्यम वापरावे याचा सल्ला हे महाशय देतात.

भारतात प्रामुख्याने खालील माध्यमांचा जाहिरातींसाठी उपयोग केला जातो.

१ : छापील जाहिराती मुख्यतः वृत्तपत्रे व मासिके यांतून येतात.

२ : रस्त्यांवर, पुलांवर जाहिरातीचे मोठे फलक लावले जातात.

३ : आकाशवाणीवरील जाहिरात.

४ : जाहिरातीचे चित्रपट.

५ : ग्राहकांसाठी स्पर्धा.

माध्यम कसे निवडावे हे बरेच कौशल्याचे काम असते. तुमचे गिऱ्हाईक प्रामुख्याने कोण, ते कोठे राहतात, काय वाचतात, त्यांच्या आवडी काय, थोडक्यात त्यांचे मानस जाणून घेण्याचा प्रयत्न करावा लागतो आणि मग त्या विविक्षित गटाजवळ जाण्यासाठी माध्यम निश्चित करावे लागते. उदा. लक्स साबू हा कमी किंमतीचा आम जनतेसाठी आहे तेव्हा त्या साबूची पोस्टर्स पानवाल्याच्या दुकानात, कामगार वस्तीत, अगदी दूरच्या खेड्यात सुद्धा आढळतात. पण 'लक्स सुप्रीम' ह्या नव्या महाग साबूची जाहिरात जास्तीत जास्त मोटारी ज्या भागातून तेथील रस्त्यावर जातात तेथे मोठमोठे फलक लावून केलेली आढळते. एवढेच काय, उच्चवर्गीय वस्तीत जाऊन नमुना म्हणून तो साबू फुकट वाटला जातो.

ब्रुकबॉन्ड चहाच्या रेडलेबल चहाचे उदाहरण देता येईल. रेड लेबलच्या जाहिरातींनी अगदी ग्रामीण भागातही आक्रमण केलेले आढळते. पण 'ताजमहाल' या नव्या ब्रँन्डची जाहिरात उच्च दर्जाच्या चित्रपटगृहातून जाहिरातपट दाखवून केली जाते.

सध्या मात्र वृत्तपत्रीय कागदाच्या टंचाईमुळे सगळ्यात कोणाचे नुकसान झाले असेल तर या जाहिरात कंपनीचे. आणि त्यामुळे बऱ्याच जाहिरातींना डच्चू मिळाला. फुलपेज जाहिरात द्यायला बंदी झाली. आर्थिक मंदीचाही जाहिरातबाजीवर परिणाम होतो. आणि जाहिरात कंपन्यांचे उत्पन्न कमी होते. यंदा काही छोट्या कंपन्या बंद पडल्या, मोठ्या कंपन्या आक्रसल्या.

छापील जाहिरातीचा उपयोग खोलवर जाण्यासाठी होतो. रेडिओवर शब्दांची उधळण होते. वृत्तपत्रांत शब्दांबरोबर दृश्य परिणामही साधला जातो. ज्याला ज्या वस्तूची गरज असेल असा माणूस काळजीपूर्वक ती जाहिरात बघतो. निरोप सुस्पष्टपणे पोचविला जातो. मात्र आर्ट डिरेक्टर आपटे म्हणत होते की, आपल्याकडे प्रिंटिंग अजूनही उत्तम नाही, त्यामुळे अखिल जागतिक पातळीवर आम्ही कमी पडतो. येथला कागद, छपाई आमच्या कल्पनांना न्याय देऊ शकत नाहीत. त्यामुळे कल्पना प्रभावीपणे लोकांपुढे मांडल्या जात नाहीत. परदेशी मासिकांतील खाद्यपदार्थांच्या जाहिराती बघताना श्री. आपटे यांचं म्हणणं खरं आहे हे पटतं. जाहिरातीतील अर्धी कापलेली केक, वरचं मऊ, श्रीमंत क्रीम-तोंडाला पाणी सुटलंच पाहिजे.

## आकाशवाणी की किंचाळवाणी

आकाशवाणीच्या जाहिरातींचा उपयोग प्रामुख्याने आठवण करून देण्यासाठी, एखाद्या वस्तूचे नाव कानात बसविण्यासाठी होतो. वृत्तपत्र कमी लोक वाचतात. शिवाय फक्त आवडीच्या मजकूरावरूनच नजर फिरविण्याची शक्यता. बऱ्याच मजकूरात जाहिरात नजरेस पडणे कठीण. डोळे बंद करता येतात पण कान चटकन बंद होत नाहीत. कानावर सक्तीने शब्द पडतात. पानवाल्याचा रेडिओ ठणाणा करीत असतोच.

भारतामध्ये आकाशवाणी जाहिरातींची सुरुवात रेडिओ सिलोनवर प्रथम झाली. अमिन सयानी नाव तेव्हाच पुढे आले. आजकालच्या रेडिओ कॉमेंटेटर्सपैकी शीलकुमार ही त्यातलीच विशेष असामी. शीलकुमारच्या मते पुराणातील नारद हा भारतातला पहिला प्रचारक (पब्लिसिटी मॅन). इकडच्या चहाड्या तिकडे करणे हे त्याचे गौण काम पण तिन्ही लोकात प्रवास करून इकडची बातमी तिकडे पोचविणे, सर्वश्रुत करणे हे फार महत्त्वाचे काम त्याने वेळोवेळी केले.

शीलकुमारच्या मते भारतातील जनता अजून निरक्षर आहे, पेपर वाचू शकत नाही तेव्हा सर्वसामान्य माणसाकरता ज्या वस्तूंचे उत्पादन होते त्यांच्या प्रचारासाठी आकाशवाणीसारखे माध्यम नाही. शिवाय या जाहिरातीमुळे लोकशिक्षण करता येतं, नव्या कलावंतांना संधी मिळते. उदा. बी. के. एन्टरप्राइजचा अंत्याक्षरी कार्यक्रम-गाण्याच्या भेंड्या वगैरे जयरामसारखे कलाकार यातून पुढे आले.

आकाशवाणीवर तीन प्रकारच्या जाहिराती असतात.

१ : रेडिओ स्पॉट-अर्ध्या मिनिटात वस्तूबद्दल माहिती देणे.


२ : झिंगल्स्-गाणे गाऊन वस्तूचे महत्त्व पटविणे.

३ : रेडिओ प्रोग्रॅम्स-उदा. बँक ऑफ बरोडाचा अद्भूत दुनिया कार्यक्रम, इन्स्पेक्टर इगल थर्मासचा कार्यक्रम.

या सर्व प्रकारात ताजेपणा टिकविणं हे जाहिरातदाराचे कर्तव्य.

पृष्ठ १३ वर

# दोन मॉडेल्स




कबीर बेदी
कबीरमुळे सूट चांगला दिसतो
की सुटामुळे कबीर ?
कागदावरून पडद्यावर चढलेला नट.

शीला जोन्स
जाहिरातदारांची
ही लाडकी कन्या.
प्रत्येक फोटोची किंमत
फक्त १००० रु.




हिन्दुस्थान थॉम्पसन ॲडव्हरटायझिंग
या जाहिरात कंपनीच्या ऑफिसातील
दर्शनी भाग.
येथेच त्यांच्या सृजनशीलतेची चाहूल लागते.

# जाहिरात क्षेत्रातील काही नामवंत मंडळी



रमेश कुलकर्णी
आर्ट डायरेक्टर



मोहन ललवाणी.
गोदरज कंपनीची जाहिरात मोहिम
यांनी हाताळली.
भपकेबाज जगाची एक चुणुक



शीलकुमार
नारदाचा वारसा सांगणा
लोकप्रिय रेडिओ कॉमेंट



पुण्याच्या
टॉम अॅन्ड बे या जाहिरात कंपनीचे
कार्यकारी संचालक
श्री. जी. व्ही. तांबे.





लक्स सुप्रीम

या श्रीमंती साबणाची मोहिम हाताळणारे श्री. गरूड.
[दृश्यवेधक - Visualizer.]


आशा नाडकर्णी : कल्पक लेखक.

श्रीमती शीला बॉम्बे डाईंगच्या जाहिराती यांच्याच....

# या काही कल्पक जाहिराती




'आमच्याकडेही दुर्मिळ आहे हो.'
डोळ्याला सुख, डोक्याला खाद्य.
परिस्थितीचा कानोसा घेणारी नित्य ताजी जाहिरात
हे अमूलचे वैशिष्ठ्य.



सुंदर फुले
आणि सुंदर चेहरे. नावात काय आहे मोठे ?




सेक्सी
म्हणून गाजलेली
बॉम्बे डाईंगची ही
कलात्मक जाहिरात
उत्तेजक होती
पण
अश्लिल नव्हती.



# स्वप्न विक्रेत्यांची ही दुनिया : पृष्ठ ८ वरून

तसेच जो जाहिरात वाचून दाखवतो त्याचा आवाज, स्वर, वाणी स्वच्छ अनुरूप असणे महत्त्वाचे. त्यातही पुन्हा लोकांच्या जवळ जाणं, आपलंसं करणं, वस्तू ज्या प्रकारची असेल तिला अनुकूल वातावरण निर्मिती करणे हे सर्व आवाजाचे कसब.

रेडिओ स्पॉटपैकी एक उत्तम जाहिरात आठवतीय्.

आज मैं आया था, कल फिर आऊँगा,

आपसे पूछनेके लिये आपने पैरमे दाऊदके जूते पहने है या नही.

अतिशय साधी, बारीकीच्या किंचाळण्यामध्ये उठून दिसणारी, तुमची काळजी घेणारी ही जाहिरात शीलकुमारची होती. त्याच्या आवाजातील सहज मिठास तुमच्यापर्यंत तेव्हाच पोचते.

मात्र आपण ऐकतो त्यांपैकी बऱ्याच जाहिरातींमध्ये इतका आरडाओरडा असतो, नाटकीपणा असतो की, बऱ्याच वेळा रेडिओचा कान पिरगळावासा वाटतो आणि मग विक्रेत्यांचा हेतू किती सफल होत असेल तेच जाणे.

## जाहिरातपट

एका मिनिटाचा जाहिरातपट तयार करण्यासाठी १५ ते २० हजार रुपये खर्च सहज येतो. शिवाय प्रिंटचा खर्च वेगळा. चित्रपट दाखविण्यासाठी सामान्य प्रतीच्या चित्रपटगृहाला आठवड्याला वीस रुपये या दरापासून उत्तम प्रतीच्या चित्रपटगृहात ३०० रु. आठवडा एवढा दर असू शकतो. मात्र या जाहिरातपटांतर्फे ग्राहकांपर्यंत अधिक उत्तम तऱ्हेने पोचता येते. शिवाय चित्रपट कोणत्या वस्तीतील कोणत्या चित्रपटगृहात दाखवायचा हे तुमच्या हातात असते. त्यामुळे जाहिरातींवरील पैसे वाया जाण्याची शक्यता कमी. नाहीतर पुष्कळवेळा तुमचे नक्की ग्राहक वेगळे काढता न आल्याने खूप मोठ्या प्रमाणात जाहिरात करून तुम्ही ५०% खर्च फुकट घालवता.

## सिनेमांच्या जाहिराती

वस्तूंच्या जाहिरातींमध्ये इतकी प्रगत तंत्रे वापरली जात असताना सिनेमांच्या जाहिरातींमध्ये आपण इतके मागासलेले कसे याचे कोडे पडते. अर्थात अविकसित देशातील सामान्य माणूस मनोरंजनासाठी मुख्यतः सिनेमावर अवलंबून असतो आणि हे निर्मात्याला चांगलं माहित असतं. तो सगळ्या प्रकारांनी सामान्य माणसाच्या खिशावर झडप घालायचा प्रयत्न करतो. म्हणूनच सिनेमाच्या धंद्यात जाहिरात या प्रकरणावर उत्पादनखर्चापैकी १५% ते २५% पर्यंत खर्च केला जातो. सिनेमाच्या जाहिरातींमध्ये बॅनर्स, पोस्टर्स, होर्डिंग्ज यांना फार महत्त्व. प्रेस कमी महत्त्वाचा.

दिवाकर करकरे आज मुंबईमधील सिनेजाहिरात–धंद्यातील बीनीचे कलाकार. 'मेरा नाम जोकर' या आगमनापूर्वी गाजलेल्या आणि नंतर पडलेल्या चित्रपटाची पब्लिसिटी यांचीच. सबंध मुंबईत ५० ते ६० जागांवर मोठे फलक आणि हजारांहून जास्त छोटी पोस्टर्स एवढा पसारा एका चित्रपटासाठी मांडावा लागतो. शिवाय गावोगावी–खेडीपाडी पोस्टर्स डकविली जातात. मेरा नाम जोकरचा पब्लिसिटी खर्च ७–८ लाखांहून जास्त होता.

दिवाकरसारखे काही लोक आज 'सेक्स'चा विकृत वापर न करता नवनवीन तंत्रे वापरत आहेत. फलकावर त्या त्या नटनटीचा चेहेरा बरहुकूम येणं फार महत्त्वाचे. शिवाय त्या त्या चित्रपटातील विशिष्ट भूमिकाही त्यातच दिसली पाहिजे. नटनट्या याबाबत फारच जागरूक असतात. दिवाकर करकरे एक आठवण सांगत होता. 'जोशीला' चित्रपटाची जाहिरात ज्यावेळी तो करत होता त्यावेळी हेमामालिनेने दहा वेळा निरोप पाठविले, 'हमे अपनी छबी देखना है' छकडीचा जीव कासावीस. रस्त्यावर आपण कशा दिसतो ! दिवाकरने सरळ उडवून लावले, 'अगर देखना है तो आ जाओ हमारे स्टुडिओमे, पेंटिंग चल रहा है.' सगळ्यांचे चेहेरे आणि कंबरासुद्धा त्याच्या मुठीत. दिवाकर सांगत होता, फोटोपेक्षा सगळ्यांच्या कंबरा एकेक इंच कमी दाखवत जा असा सरसकट आदेश असतो. अशा आमच्या लट्ठाण्या.

मात्र या फलक जाहिरातींनी मुंबईचे अवकाश खराब करून टाकले आहे. व्ही. टी. स्टेशनजवळ हारीने लागलेल्या या सिनेमांच्या जाहिराती बघा. बोरीबंदरची इमारत वास्तुशास्त्राचा एक सुंदर नमुना म्हणून वाखाणता येईल. मुंबईला अभिमान वाटावा अशी ही इमारत. पण पैशाच्या मागे लागून मुंबई महानगरपालिकेने ही इमारत गहाण ठेवली. मध्यंतरी तर इमारतीसमोरील कमानीवरील जागाही भाड्याने देण्यात आली होती. पण मुंबईकर माणूस फार सोसतो, पण एका क्षणी लख्खकन् जागा होतो. त्याने आरडाओरडा केला आणि कमान वाचली.

सिनेमांच्या जाहिरातींतील किळसवाण्या सेक्सवर आपण नेहमीच कोरडे ओढतो. म्हणजे आपली अडचण अशी असते की, त्या खऱ्याखुऱ्या सेक्सी नसतात हो ! नसल्याच ओंगळ–खोट्या असतात. मागे एकदा बॉम्बे डायिंगची जाहिरात सेक्सी म्हणून गाजलेली आठवत असेल. मला वाटते, माणूसमध्येही एका बाईंनी त्यावर खरमरीत लेख लिहिला होता. समाजहितचिंतकांनी निषेध नोंदविला. पण जाहिरातदारांचा हेतू सफल झाला. लोकांपर्यंत पोचणे, नाव माहीत होणे. आणि माझ्या मते ही जाहिरात उत्तेजक होती पण व्हल्गर नव्हती. निश्चित कलात्मक होती. Life is a bed of roses या इंग्लिश वाक्याचा अतिशय सुंदर उपयोग त्यात करून घेतला होता. गुलाबाच्या फुलांचे डिझाईन, त्याच्यावर उत्कट क्षणी धुंद झालेले पतिपत्नी. सुखाची स्वप्ने पाहायला लावणाऱ्या चादरी.

जाहिरातीत सेक्स वापरला जावा किंवा नाही याबद्दल चर्चा करताना आर्ट डिरेक्टर कुलकर्णी यांनी एक इंटरेस्टिंग गोष्ट सांगितली. फिलिप्स कंपनीसाठी कॅलेंडर बनवायचे होते. दोन-तीन जाहिरात कंपन्यांमध्ये स्पर्धा चालू होती. गिऱ्हाईक गळाला लागले पाहिजे. यांच्या कंपनीने नवरसाचा विषय सुचविला. नमुना म्हणून शृंगाररसाचे ड्रॉइंग तयार करून दिले. खजुराहोच्या दोन कलाकृती त्यात वापरल्या होत्या. मंडळी खूष झाली. ऑर्डर मिळाली. मग बाकीच्या रसांची स्केचेस तयार करून दाखविली. आणि मंडळी

वैतागली. पहिले चित्र इतके सुंदर, उद्दीपित करणारे, बाकीची अगदीच मिळमिळीत बुवा. शान्तरसासाठी बुद्धाच्याच चित्राची गरज आहे हे समजावूनही पटेना. आणि मग सर्वच कागद शृंगार-रसाचे असावेत अशी तडजोड झाली. तेव्हा जोपर्यंत जाहिरात हा प्रकार आहे तोपर्यंत सेक्सचा उपयोग करून लोकांचे लक्ष खेचून घ्यायचे प्रयत्न राहणारच असं लक्षण दिसतंय्.

### जागरुक पहारा–क्विक अॅक्शन

एकदा जाहिरात बाहेर पडली की जाहिरात कंपनीला आराम, ही कल्पना अगदी चुकीची आहे. विशेषत: ज्या वस्तूमध्ये अगदी सतत स्पर्धा असते, उदा. आंध्र प्रदेशात दोन वर्षांपूर्वी व्हिक्स व्हेपोरबची विक्री कमी झाल्याचे आढळले. अमृतांजनची मागणी वाढली होती. अमृतांजनच्या जाहिरातीमध्ये कातडीवर किंचित् जळजळ होते आणि मग आराम वाटतो असे ध्वनित केले होते. आपण औषध लावतो आणि त्याचा परिणाम होतोय असे लोकांना मानसिक समाधान मिळते. व्हिक्समध्ये अशी जळजळ नाहीय्. लोकांना समजावे कसे ? जळजळ होत नाही तरीसुद्धा व्हिक्स काम देतं म्हणणं अगदी बाळबोध वाटतं. शिवाय अमृतांजनशी स्पर्धा चाललीय् हे लक्षात येत. मग नवा विषय शोधून काढला. नवी घोषणा तयार केली, नवा चित्रपट काढला. व्हिक्स सर्दीसाठी असतं. आणि सर्दी आत असते, कातडीत नसते.

नाक का बहना तो केवल एक लक्षण है
सर्दी तो भीतर छातीमें भरी रहती है

नॅशनल अॅडव्हर्टायजिंगचे नरेंद्र मैनी यांनी ही जाहिरात तयार केली. आणि त्यानंतर मार्केट सर्व्हे घेतला. तेव्हा निश्चितपणे या मेसेजचा परिणाम होऊन विक्री वाढलेली आढळली. तेव्हा बाजारच्या नाडीवर सतत हात ठेवून बसावं लागतं.

नरेंद्र मैनींचे मात्र मत आहे की, भारतातील जाहिरातक्षेत्रात पाश्चिमात्यांचे अंधानुकरण फार चालते. येथील लोक, त्यांच्या गरजा, त्यांची बौद्धिक, शैक्षणिक पातळी, सांस्कृतिक मूल्ये यांचा फारसा विचार केला जात नाही. स्वत:च्या सर्जनशीलतेवर खूष राहत ते नव्या नव्या कल्पना, कॉपीज् शोधत राहतात. लोकापर्यंत पोहचण्याचा विचार गौण होतो.

### ब्रॅन्डनेम

ब्रॅन्डनेम शोधून काढणे याला जाहिरात तंत्रात फारच महत्व




असते. डालडा, बर्शन, ब्रुकब्रॉन्ड, सर्फ वगैरे अशी त्राही नावे सांगता येतील की ही विशेषनामे न राहता सामान्यनामे होऊन गेली आहेत. कोणतेही वनस्पती तूप डालडा. कोणतीही साबूची पावडर सर्फ. म्हणजे उद्या कोणी मॅजिक कंपनीचा सर्फ द्या हो म्हटलं तर आपल्याला वावगं वाटत नाही.

तसंच जगभर गाजलेलं ब्रॅन्डनेम कोकाकोला. हा ट्रेडमार्क १८८६ सालापासून सुरू झाला. तो आजतागायत ८५ वर्षे सतत चालू आहे. त्यावेळी या पेयासाठी नाव शोधून काढण्यासाठी खूप लोकांनी डोकी लढविली. त्यासाठी बऱ्याच अटी होत्या. शब्द अर्थहीन असायला हवा. म्हणायला सोपा, लक्षात राहायला चटकदार. कोणत्याही भाषेत त्याचा उच्चार एकच. शब्द शोधून काढल्याबरोबर तो रजिस्टर्ड झाला. जगातील १०० भाषांत त्यांचे वेगवेगळे रजिस्ट्रेशन केले आहे एवढेच नव्हे, कोक हा सर्वसामान्य उच्चार प्रचारात आल्यावर तोही रजिस्टर्ड झाला. बाटलीचा आकार, अक्षराचे वळण, शब्दोच्चार या प्रत्येकाचे वेगळे रजिस्ट्रेशन आणि त्या सर्वांवर डोळ्यात तेल घालून पहारा चालतो. खूप कोले निघाले, पण कोकाकोला अमर राहिला.

### वस्तू-फरक

केवळ जाहिरातीने व्यवस्थित पोझिशनिंग करून एकाच प्रकारच्या वस्तूमधून जास्त नफा कसा मिळू शकतो ते पाहणे गमतीशीर आहे.

एकाच कंपनीच्या अनेक सिगारेटस् असतात, हे पुष्कळांना माहिती असेलच. प्रत्येकाच्या किंमतीमध्ये बराच फरक ठेवलेला असतो. गुणात्मक फरक मात्र त्या प्रमाणात नसतो. येथे आपण एका साबणाचे उदाहरण घेऊ.

लक्स आणि लक्स सुप्रीम हे एकाच कंपनीच्या साबणाचे दोन प्रकार.

आपल्याला जो लक्स बाजारात ८० पैशाला मिळतो त्याचा उत्पादनखर्च समजा ४० ते ४५ पैसे आहे. याच लक्समध्ये जरा चांगल्या प्रकारचा सुवास घातला, किंचित गुणवत्ता वाढविली की लक्ससुप्रीम तयार. उत्पादनाची किंमत बनते ६० पैसे आणि बाजारात विक्रीची किंमत १·४० रु. फक्त. जाहिरातीने हा साबू श्रेष्ठ आहे, खास आहे, हे पटविले जाते. उच्चवर्गीयांना ही किंमत परवडते. प्रतिष्ठा हा फार महत्त्वाचा घटक असतो. आम्ही उत्तम दर्जाचा, देशातील सर्वोत्तम साबू वापरणार, आमच्या दर्जाला शोभेलसे राहणीमान राखणार हे ब्रीद असते. आणि हा वस्तू-फरक कंपनीने जाहिरातीने घडवून आणलेला असतो. गरिबांकडून नफ्याचे प्रमाण कमी मिळते. ते कंपनी श्रीमंतांकडून भरून काढते.

आता सर्वांत महत्त्वाचा आणि प्रत्येकाच्या मनात नेहमीच कुज-बुजणारा प्रश्न येतो की, मग विक्रीच्या किंमतीमध्ये या जाहिरातीच्या खर्चाचे प्रमाण काय बुवा ?

हे प्रमाण बदलत राहते. सामान्य माणसाच्या गरजेच्या वस्तूमध्ये हे प्रमाण पुष्कळच कमी असते. पण अतिशय महाग सौंदर्यप्रसाधनाची साधने, उत्तमपैकी कापड वगैरेंमध्ये हेच प्रमाण ४० ते ५० टक्के एवढे वाढते. म्हणजेच १०० रु. विक्रीची किंमत धरली तर ५० रु. जाहिरातखर्च. पुष्कळदा जाहिरात नीट तऱ्हेने न झाल्याने हा खर्च फुकटही जातो. टेक्सटाईल–कापडबाजार विशेषत: उच्च प्रतीचा हे

याचे उत्तम उदाहरण आहे. गेल्या काही वर्षांत सगळ्या मिल्सनी उत्तम शर्टींग, सूटींग, टेरीन–साड्या, ड्रेसमटेरियल या वस्तूंची इतकी जाहिरात केली, त्यामुळे महाग कापडासाठी निश्चित बाजारपेठ तयार झाली, लोकांची मागणी वाढली. सुती कपड्याकडून लोक टेरीनकडे वळले. पण तरीही दुकानात गेल्यावर अमूक एका मिलचाच माल द्या, असे सहसा कोणी म्हणत नाही. आवडेल ते डिझाईन, काऊंटरवरच्या सेल्समनचे आश्वासन याच आधारावर मुख्यतः लोक खरेदी करतात.

तसेच उत्पन्नातील विषमतेमुळे यांपैकी काही महाग वस्तू फक्त १ ते २ टक्के लोकच खरेदी करू शकतात. म्हणजे बाजारपेठेचा आकार मुळातच मर्यादित असतो आणि मग जाहिरातीचे युद्ध सुरू होते. जाहिरातयुद्धात रसातळाला मिळाल्याचे महत्त्वाचे उदाहरण आहे रेडिमेड शर्टस्. दोन वर्षांपूर्वी लिबर्टी, बॉन्ड, ॲरिस्टो ही नावे मध्यमवर्गीयांच्या डोळ्यासमोर होती. पण त्यांच्या मुळातच किंमती जास्त ठेवून, सरकारी कर भरून आणि जाहिरातींवर अतोनात खर्च करून या सगळ्याच कंपन्यांचे दिवाळे निघायची वेळ आली.

### जाहिरातीचे अर्थशास्त्रीय समर्थन

संपन्न देशांमध्ये जाहिरातींचे समर्थन अशा रीतीने केले जाते की, जाहिरातीमुळे खूप मोठ्या प्रमाणावर बाजारपेठ उत्पन्न होते. अधिक ग्राहक निर्माण होतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणावरील उत्पादन तंत्र (largescale production) वापरून उत्पादनखर्च कमी होतो. उत्पादन आणि वितरण दोन्हींमध्ये काटकसर होऊन खर्च वस्तूंच्या जास्त संख्येवर वाटला जातो. स्पर्धा हा भांडवलशाही उत्पादनव्यवस्थेचा आत्मा. या स्पर्धेला जाहिरातीची साथ हवीच. जाहिरातीमुळे गुणवत्ताही आपोआप उंचावते आणि देशाच्या अर्थव्यवस्थेला गती मिळते.

### अविकसित देश आणि जाहिरात

प्रश्न येतो अविकसित देशांचा. येथे कच्चा माल, उत्पादनाची साधने इतकी कमी असतात, ती स्पर्धेसाठी वाया जाऊ द्यायची का? नुकतीच बाजारात काळी कातडी गोरी करणारे एक क्रीम आले आहे. त्यासाठी आयात केलेली दुर्मिळ रसायने, पॅकिंगसाठी आयात केलेली दुर्मिळ रिमप्लेट नियंत्रित दराने त्या कंपनीला मिळू शकते. तिच्या जाहिरातीसाठी टंचाई असलेला कागद वापरला जातो आणि त्याचा फायदा किती लोक घेऊ शकतात, १, २, किंवा ३ टक्के फक्त. आपल्या लक्षात येईल, या जाहिराती मुख्यत्वेकरून ग्राहकोपयोगी वस्तू, चैनीच्या वस्तूंच्या असतात. त्यामध्ये नफ्याचे प्रमाणही बरेच असते. त्यामुळे भांडवलाची गुंतवणूकही नेमकी याच वस्तूंच्या उत्पादनासाठी केली जाते. म्हणजेच आधीच दुर्मिळ भांडवल या निरुपयोगी वस्तूंच्या उत्पादनासाठी अडकून बसते. या जाहिरातींमुळे लोकांची खर्चिक वृत्तीही वाढते. अविकसित देशांना आवश्यक असलेली शिल्लक पडत नाही. देशातील लोकसंख्येच्या गटांमध्ये राहणीमान अधिकाधिक विषम होत जाते. तेव्हा ही जाहिरातबाजी आपल्यासाठी वर म्हणायचा की शाप म्हणायचा? □

[ या लेखात वापरलेले काही फोटो (HTA) हिंदुस्थान थॉम्पसन कंपनीमध्ये त्यांच्या परवानगीने आणि सहकार्याने काढले आहेत. ]

---

# इंडोचायना


## संपत आलेले युद्ध

वा. दा. रानडे

दक्षिण व्हिएटनाम आणि कंबोडियातील युद्ध कम्युनिस्टांच्या निर्णायक विजयाने संपत आले आहे. कंबोडिया तर जवळजवळ पूर्णपणे कम्युनिस्टांच्या हाती गेलाच आहे आणि दक्षिण व्हिएटनामचा पाडाव व्हावयालाही साठ दिवसांपेक्षा अधिक काळ लागणार नाही, असा अंदाज अमेरिकन तज्ज्ञ व्यक्त करीत आहेत. कम्युनिस्ट चढाईचा आजचा वेग पाहता त्यापूर्वीसुद्धा युद्धाचा शेवट होण्याची शक्यता आहे. कंबोडियाचे अध्यक्ष लोननॉल देश सोडून पळाले. दक्षिण व्हिएटनामचे अध्यक्ष थिऊ यांनाही एक तर राजीनामा देणे भाग पडेल किंवा लोननॉल यांच्याप्रमाणेच देश सोडून जावे लागेल. सरकार पक्षाचे बहुमत असलेल्या सिनेटने युद्ध संपविण्यासाठी देशाचे नेतृत्व बदलले पाहिजे, अशी मागणी करणारा ठराव एकमताने पास केला. थिऊविरुद्ध लोकमत किती तीव्र आहे, याची यावरून कल्पना येईल. अशा परिस्थितीत ते फार काळ अधिकारावर टिकणे शक्य नाही. थिऊंनी सध्याच्या मंत्रिमंडळाच्या जागी नवे मंत्रिमंडळ नेमले आहे, पण लोकांना थिऊच नको आहेत. त्यांना पदभ्रष्ट करण्यासाठी काही लष्करी अधिकाऱ्यांनी केलेला कट फसला असला तरी थिऊंच्या धोरणाबद्दल लष्करात किती तीव्र असंतोष आहे, हे त्यावरून दिसून आले.

एकामागून एक शहरे प्रतिकाराशिवाय कम्युनिस्टांच्या हाती पडत आहेत, हे दक्षिण व्हिएटनाममधील दृश्य चिनी कम्युनिस्टांच्या विजयी घोडदौडीची आठवण करून देणारे आहे आणि चॅंग कै शेकविरुद्ध युद्धात चिनी कम्युनिस्टांचा ज्या कारणांमुळे विजय झाला त्याच कारणांमुळे दक्षिण व्हिएटनाम व कंबोडियात कम्युनिस्ट विजयी होत आहेत. तेथील राजवटी मुख्यतः अमेरिकेच्या पाठिंब्यावर टिकून होत्या. एवढेच नव्हे तर दोन वर्षांपूर्वी पॅरिस करार होईपर्यंत त्यांचे युद्ध अमेरिकाच लढत होती. अमेरिकेने लष्करी व आर्थिक मदत मोठ्या प्रमाणावर केली. एवढेच नव्हे तर आपले पाच लाखांपर्यंत सैनिक व्हिएटनाममध्ये कम्युनिस्टांविरुद्ध लढण्यासाठी पाठविले. फक्त अण्वस्त्रे सोडून बाकी सर्व प्रकारची अत्यंत संहारक शस्त्रे वापरली. पण जगातील या सर्वांत बलाढ्य राष्ट्राला हो चि मिन्ह यांच्या चिवट व कडव्या नेतृत्वाखालील तयार झालेल्या छोट्या देशाने हो यांच्या निधनानंतरही यशस्वीपणे तोंड दिले आणि दोन वर्षांपूर्वी अमेरिकेस तडजोड करण्यास भाग पाडले. व्हिएटनाम युद्धाविरुद्ध अमेरिकेतही असंतोष वाढत होता. त्यामुळेही अमेरिकेला तडजोड करणे भाग पडले. 'प्रतिष्ठा न गमावता प्रस्थापित केलेली शांतता' असे पॅरिस कराराचे वर्णन त्यावेळचे अमेरिकेचे अध्यक्ष

मलपृष्ठ १ दर



# व. पुं.चं पंचविसावं पुस्तक

रवीन्द्र पिंगे

सर्व सोंगं आणता येतात. पैशाचंही सोंग आणता येतं. फक्त दोन सोंगं मात्र बापजन्मी आणता येत नाहीत. एक तारुण्याचं नि दुसरं तमाम लोकप्रियतेचं. माणूस रंगरंगोटी करेल, पाखराच्या उत्साहाने चार–दोन हेलपाटे मारील, शीळ घालील, चटेरीपटेरी कपडे घालेल, भावगीतांच्या मैफलीत बसेल. पण अंगचंच तारुण्य नसेल तर ही सारी कसरत कमजोर ठरेल. आतल्या आत कुठेतरी तो ढेपाळेल. त्याचं अवसान कोमेजेल. तारुण्यनिदर्शक बाह्यात्कारी पिसं डकविता आली तरी उल्हासकारी प्राण अंतर्यामी फुलणार कसे ? ते फूल आतूनच फुलावं लागतं. तोच न्याय लोकप्रियतेचा. तुम्ही भले सत्यनारायण करून गाव हाकाराल, किंवा बाटल्या फोडून वडेसागुतीचं इच्छा–भोजन चाराल. माणसं तीर्थप्रसादाला नक्की येतील नि मोफतातली पार्टी तर कुणीच चुकवणार नाही. पण रात्रीचे चार धुंद प्रहर उलटले की लक्षात येईल, माणसं आपल्याकडे आली होती ती आपल्या पुण्याईने नव्हेत; त्या भ्रमरांना बोलावून घेणारा धनी वेगळा होता. लोकप्रियता ही अगदीच स्वयंभू गोष्ट आहे. तिजे नाटक पार निरुपयोगी ठरत. डोंगळ्यांसारखी माणसं आपल्या चालीने लोकप्रिय व्यक्तीला गराडा घालतात. त्याला चहापाणी करून स्वतः तृप्त होतात. पुढच्या भेटीची वाट आलोचन पाहतात. लोकप्रियतेचं वारं ज्याच्या अंगावरून वाहिलेलं नाही, तो मग कितीही थोरपदी विराजमान झालेला असो, आपलं घर टाळून टपालवाला पुढल्या बिऱ्हाडात पत्र टाकताना पाहणंच त्याच्या नशिबी लिहिलेलं असतं. तशात तो थोर गृहस्थ लेखक, गायक, किंवा नटवर्य असला तर साक्षात गतप्राण झालाच म्हणून समजा. पु. लं. ची गोष्टच सोडा, पण आमच्या लोकप्रिय आनंद साधल्यांना सुद्धा एक सहस्र खुषी–पत्रं आलेली आहेत म्हणे ! हे असलं अमोप भाग्य ललाटीच लिहिलेलं असावं लागतं. आनंद साधल्यांना आली आहेत ती फक्त लडिवाळ पत्रोत्तरंच आहेत, अशी सांत्वनकारी दवंडी कितीही पिटली तरी शिष्टजनांच्या दरबारात सर्वतोपरी शून्य शुकशुकाट आहे, हे सत्य लपत नाही ते नाहीच.

तात्पर्य : तारुण्य अंगचंच असावं लागतं आणि लोकप्रियता बाजारात मिळत नाही; ती वेल तुमच्या अंगणातच आपखुषीने रुजावी लागते.

आमच्या आजच्या प्रवचनाचे निमित्त– नायक श्रीमान वसंत पुरुषोत्तम काळे ह्यांच्यापाशी तारुण्य आणि अफाट लोकप्रियता, ह्या दोन्ही अतिदुर्मीळ गोष्टी, एखाद्या पुरंध्रीजवळ लावण्य आणि लाघव ह्या दोन्ही शक्तींचा मिलाफ झालेला असावा तशा एकवटल्या आहेत. त्याबद्दल मी प्रथम व. पुं. बद्दल पोटभर मत्सर व्यक्त करतो आणि आता निरुपणाकडे वळतो.

व. पुं. चे योग फार बलवान आहेत. नाकासमोर नेकीने चालणारा कलावंत बाप, सहिष्णू आप्त, पक्की टगी पोरं, चलती असलेले हौशी प्रकाशक, कौतुक करू शकणाऱ्या मैत्रिणी, त्या मैत्रिणींच्या त्यांच्याहूनही कौतुकबाज मैत्रिणी, एकाहून एक श्रीमंत मित्र, मजेशीर नोकरी, संदर्भसंपन्नता लखलाभ करणाऱ्या वस्तीतला राजबिंडा रहिवास, नवसाला पावणारे लागेबांधे, प्रवासाला हमखास निघू शकणारी लेखणी, चतुर धिटाई, वृत्तीतला पारदर्शक गोडवा, आणि सांभाळून घेणारी टवटवीत गृहिणी, ह्या आयुधांसारख्या उपयोगी पडणाऱ्या सगळ्या गोष्टींचा व. पु. ला गराडा पडलेला आहे. पहावं तेव्हा व. पु. धमाल धांदलीत असतो. एक तर मित्राकडून नुकताच परतलेला तरी असतो, किंवा मित्राकडे तरातरा निघालेला असतो आणि घरातल्या तारेवर चिमणीने बसावं तितक्या सहजतेने व. पु. मित्र जोडीत सुटलेला असतो. एकदा त्याला पोस्टमनने चेंबूरच्या वाचकाचं खुषीपत्र आणून दिलं. मजकूर नेहमीचाच होता. तुमची कथा आवडली, वगैरे. शिवाय पत्रलेखक चक्क पुरुष होता. तरीही त्या मजकुराची व. पुं. वर इतकी भूल पडली की, लागलीच त्याने स्कूटर सरळ चेंबूरच्या दिशेने उन्हातान्हातून हाणली. दारात व. पु. ला बघून पत्रलेखक चाट झाला. व. पु.ला गहिंवरून आलं. कृतार्थ होऊन तिथून तो परतला न परतला तोच मी भेटलो. त्याने त्या सोहोळ्याचं साग्रसंगीत वर्णन मला एका दमात ऐकवलं. वाचक–लेखक संबंधांचा काही वेदांतही सुनवला. मी तो अर्थातच ह्या कानाने ऐकून त्या कानाने सोडून दिला. पण अस्मादिकांसारखा अलिप्त माणूस त्याला सटिसहामाशी एखादाच भेटत असेल. बाकी त्याच्यासमोर नेहमी जल्लोष असतो. हा आला, तो गेला; तो आला, हा गेला, असं रसायन चालू असतं. साहेबाने लिहिलेलं यावज्जीवी मी वाचणार नाही अशी कुणाच्या तरी पायापाशी त्याने शपथ वाहिलेली आहे. तेव्हा पुस्तकाचं ओझं म्हणून कसं ते त्याच्या खांद्यावर श्रीकृपेकरून नाहीच. चेकॉव्हची गोष्ट न वाचली तरी त्याचं चालू शकतं. हे जग अलिप्तपणे निरखणारा ग्रॅहॅम ग्रीन नावाचा कादंबरीकार ह्या पृथ्वीतलावर आहे, मानाचे मुजरे मिळवीत आहे हे माहीत नसलं तरी त्याचं काही बिघडत नाही. सकाळच्या दैनिकांतला मजकूर त्याला रवंथ करायला यथेच्छ पुरतो. आम्ही जगाची नसती चिंता वाहतो तेव्हा तो अरुण दातेचा गझल ऐकतो. आणि अरुण दातेचा गझल ऐकताना आम्ही जेव्हा पेंगत असतो, तेव्हा तो दादरकर मैत्रिणीबरोबर गप्पा ठोकत असतो. छे ! व. पु. चा पुनःपुन्हा हेवा करण्याशिवाय गत्यंतरच नाही बुवा !

आणि, ह्या लोकांच्या अंगात हे चैतन्य येतं तरी कुठून? दोन वर्षांमागची गोष्ट. रात्रीचा दीड–दोनचा सुमार. ऐन थंडी. आम्ही कुटुंबीय घोरत पडलो होतो. इतक्यात दारावर टकटक झाली. मला वाटलं, पहाट झाली, दूधवाला भय्या आला. मी डोळे चोळीत उठलो नि दुधाची पातेली घेऊन दार उघडलं. पाहतो तर गळ्याला मफलर गुंडाळून दारात व. पु. मित्र–मैत्रिणींचा फौजफाटा घेऊन तशा थंडीत हजर! मी चक्करब्रँडच झालो. मग व. पु. म्हणाला, 'हॅपी न्यू इयर! आम्ही तुझ्या घरी गाणी म्हणायला आलोय.' मग ते टोळकं हसत हसत आत आलं. मी मुलांना उठवलं. मुलांच्या आईला उठवलं. मच्छरदाण्या सोडल्या. तोंडं धुतली. मग तशा त्या आड-प्रहरी गाण्याबजावण्याची आमच्या स्वयंपाक-घरात धमाल उडाली. व. पु. तर नको–नको म्हणत असतानाही गायलाच, पण त्याची बायकोही छान गायली. त्याचे मित्र गायले. महावीरजींनी मोठा खुषबुदार गझल सुनवला. एक उषा मेहता सोडल्यास तो सगळा कंपू त्या मध्यरात्री माझ्याकडे गाऊन गेला. मग कॉफीपान झालं आणि ती मंडळी शंकर वैद्याला उठवायला निघून गेली! खरंच, ह्या प्रेमिकांच्या अंगात हे असलं अमोघ चैतन्य येतं तरी कुठून? ह्या साऱ्याचा इष्ट तो परिणाम परस्पर घडतच असतो. ही हौशी माणसं मोठ्या तृप्तीत जगत असतात. गंमत करतात. गुरफटतात. पण चतुर असल्या-मुळे हातही झटकू शकतात. आता त्यांचे भिंतीआडचे पवित्रे आम्हाला बसल्या जागे-वरूनही लख्ख दिसतात ते सोडा. पण ही माणसं गुलजार जगतात, हे खरंच आहे. व. पु. ला तर मी कधी कुणावर डाफरताना पाहिलेलंच नाही. तो एक व्यूह रचू शकणारा प्रेमळ लेखक आहे. साहजिकच त्याला खट-पटीही कराव्या लागतातच. कुणाचा हॅपी बर्थ डे साजरा कर, कुणाच्या जलशात पेटी वाजव, कुणाच्या घरी नाट्यवाचन आणि पार्टी असं दोन्ही कर, कुणाच्या बाळंत-विडयाची व्यवस्था कर, असं सूत्रसंचलन हस्तेपरहस्ते तो चालूच ठेवतो. अशी गस्त घालीत बसल्यामुळे त्याच्या वेळेचा चिवडा होतो. पण माणसंही जोडली जातात.

प्रेम द्यावं नि प्रेम घ्यावं हे त्याला बेश उमगलेलं आहे. जमेल तेवढी किरकोळ प्रेमाची खिरापत तो वाटीतच असतो. साहजिकच त्याच्या मनाचं पाणी कधी डुचमळलंय असं झालेलं नाही. अर्थात त्याच्या मनात काही काही गोष्टींबद्दल विषाद जरूर असेल. उदा. प्रेसच्या एकट्याचाच वाट्याला इतकी मलई काय म्हणून? वगैरे-वगैरे. पण 'सत्यकथा' मासिकाच्या कंपौंडाबाहेर उन्हात तापकळत असणाऱ्या लेखकांच्या मनात दर्जेदार साहित्यिकांबद्दल जो एक अगम्य असा डूक असतो, त्याचा मागमूसही व. पुं च्यापाशी नाही, ह्याला मी साक्ष आहे. अरे, जो खऱ्याखुऱ्या चेकॉव्हची ऐशीतैशी करतो, सत्यकथाकारी गावठी चेकॉव्हांना काय धूप घालणार? उलट व. पु.ला एक बक्षीस लागल्यावर माझ्या पोटात गोळा उठला होता ही खरी सत्यकथा आहे. व. पु. धडाधड लिहीत सुटलेला लेखनविस आहे. बघता बघता त्याच्या छातीवर पंचवीस बिल्ले लागले. आणखीही, एकशेपंचवीस लागतील. घोडामैदान जवळ आहे. व. पुं-च्या जवळ उत्साह उदंड आहे. तो आणि त्याचे संपादक–प्रकाशक एकमेकांना मस्त-पैकी वश आहेत.

व. प. चं कथाकथन म्हणजे मोठी मार-डाला चीज आहे. अलम् महाराष्ट्राच्या कोन्याकोपऱ्यातून तो रतिब टाकत हिंडतो. मी भेटलोच तर मला जिव्हाळ्याने सांगतो, रे, ते नवसारीचे लोक तुझी चौकशी करीत होते; तुला ते भाषणासाठी पैसे देऊन बोलवणार आहेत. आता नवसारीवाले माझं बारसं जेवून राहिलेले असतात. ते मला टाळून पुन्हा व. पु. लाच आग्रहाचं आमंत्रण पाठवात नि व. पु. जातोही. परतल्यावर व. पु. मला सांगतो, रे, ते नवसारीवाले तुला बोलावणार आहेत. दोन महिन्यांपूर्वीची गोष्ट. पार्ल्याच्या मुलींच्या महाविद्यालयात कथाकथनासाठी त्याला मोठा मानपान करून नेलेलं होतं. मला 'निव्वळ श्रोता म्हणून जमल्यास या' असं मोघम आमंत्रण होतं. तरी मी साहित्यबाह्य कारणांसाठी जायचा तो गेलोच. त्या दिवशी व. पु. ने गोष्टी इतक्या रंगवून सांगितल्या आणि बेहद्द खुप झालेल्या त्या पोरीबाळींनी व. पु. चं इतकं उदंड कौतुक माझ्या समक्ष पुन्हा पुन्हा केलं की त्यानंतर महिनाभर लोक भेटल्यानंतर मला पुष्कळ प्रश्न करीत, 'पिंगे, तुमचा चेहेरा हल्ली इतका काळवंडलेला का दिसतो?'

असो, व. पु. फाटीभर लिहित असल्यामुळं त्याचं सर्वच साहित्य वाचणं अशक्य आहे. नि त्याची तशी जरूरीही नाही. 'सांगे वडिलांची कीर्ती' हे त्याने स्वतःच्या वडिलांबद्दल लिहिलेलं मधुर पुस्तक नमुन्यादाखल प्रत्येकाने वाचावं अशी मी शिफारस करतो. केवढ्या उमाळ्याने त्याने आपल्या म्हाताऱ्या बाबांबद्दल लिहिलं आहे! वाहवा! निदान त्या एका पुस्तकाबद्दल तरी मी व. पु. ला चक्क शरण गेलो.

सॉमरसेट मॉम हे नाव व. पु. ने बहुतेक करून एव्हापर्यंत ऐकलेलं असावं. ऐकलेलं नसल्यास मी त्याला सांगतो की अनेक नद्यांचं तीर्थ चाखलेला आणि सत्तर वर्षं सतत लिहिता राहिलेला तो एक बलवंत लेखक होता. त्याने कधीही चतुराई केली नाही, की पवित्रा घेतला नाही. अवसान तर तो आणीतच नसे. त्याच्या वाट्याला आलेली मौजमजा त्याने न गुरफटता मोठ्या अलिप्त-पणे चाखली. टिकाकारांनी जन्मभर त्याची उपेक्षा केली. पण तो लेखणीचा धंदा असल्यामुळं त्याचं नि वाचकांचं उबदार हस्तांदोलन झालं होतं वाचकांचा कलिजा असलेल्या अशा मॉमने लिहिलेलं आहे. 'मर्यादा कुणाला चुकल्या आहेत? आपल्या मर्यादांचं पुरतं भान राखून जो त्यातल्या त्यात उत्तम लिहितो, तोच खरा लेखक. जगातल्या सर्वच गुणशाली लेखकांनी हवं तितकं भिकार भारूड लिहिलेलं आहे शेक्सपियरची नि चेकॉव्हचीही त्यातून सुटका नाही. पण लेखक कितीवेळा कुठ-कुठल्या शिखराशी पोहोचला ते पहायचं असतं. लेखकाची इयत्ता फक्त त्याच्या निवडक गुणी साहित्यावरून ठरते.'

मॉमने सांगितलेला न्याय आपण व. पु. ला का लावायचा नाही? आपण फक्त पौष्टिक आणि अत्युच्च दर्जाची साहित्य सेवाच तेवढी करणार, अशा घोषणांची तोरणं खुद्द व. पु. ने तरी कुठे बांधली आहेत? एका मजा म्हणून तो लिहितो; एक मजा म्हणून वाचक ते वाचतात. मामला इतका साधा, सरळ आहे. लेखन हे व. पु. चं व्यसन आहे, त्याबाबतीत तरी तो आता हाताबाहेर गेलेला माणूस आहे नि इतःपर त्याला दुरुस्त करायचं सामर्थ्य खुद्द नरसोबाच्यावाडीच्या अंगाऱ्यातसुद्धा नाही! ☐☐

# सोलकढी

## □ खुजाखुरटा राजाबाई टॉवर

महाराष्ट्रातली विद्यापीठे अलीकडच्या काळात फार्फार गाजली. ती तशी गाजणे योग्य, उचित, आणि स्वाभाविकच होते. कारण प्रत्येक विद्यापीठावर त्या त्या विद्यापीठाधीश कुलगुरूंच्या कर्तबगार व्यक्तिमत्त्वाचा ठामठसा उमटलेला होता. महाराष्ट्रातल्या कित्येक सार्वजनिक संस्था कर्तबशून्य सूत्रचालनामुळे मोडकळीला येतात. मात्र विद्यापीठांना तेवढे नेमके कमालकर्तबगार सूत्रचालक लाभतात. पण काही बोंबखंड्यांना ते सहन होत नाही. वशिलेबाजी, उधळपट्टी, पैसेखाऊखोरी, घटिंगणगिरी, गैरकारभार, भ्रष्टाचार असल्या कर्तबगारीच्या आजूबाजूला उगवणाऱ्या किरकोळ गोष्टींबद्दल ते ठणाणा करतात आणि कर्तबगारीचे उत्तुंग सपाट होते. कुलगुरू नायमेने महाजनी पवार यांचे असे झाले. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू त्र्यंबकतात्या कृष्णाजी टोपे यांचे मात्र असे झाले नाही. राजाबाई टॉवर खुजाखुरटा वाटावा असे त्र्यंबकतात्यांचे टोलेजंग कर्तृत्व या मुंबईत उभे आहे.

एक बरे आहे : मुंबई विद्यापीठाच्या सिनेट-सिंडिकेटच्या विद्वान, अभिध्या, सदाचारी सभासदांनासुद्धा कुलगुरू टोप्यांच्या कर्तृत्वाचे कौतुक आहे. टोप्यांना आणखी तीन वर्षे मुदतवाढ मिळाल्याबद्दल नुकतेच त्यांनी टोप्यांचे अभिनंदन केले. आता आणखी उंच व्हायला त्यांना जागा कशी उरेल, एवढाच एक बारीक प्रश्न मला पडलेला आहे.

गेल्या तीन वर्षांच्या आपल्या कार्यसंकुल कारकीर्दीत टोप्यांनी कितीतरी गोष्टी नवीन केल्या, तर काही जुन्या गोष्टींना नवी प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. पूर्वी मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थ्याला महाविद्यालयातल्या पूर्वपरीक्षेला बसायला लागायचे; त्यात तो कधीकधी अनुत्तीर्ण व्हायचा; त्यामुळे विद्यापीठाच्या परीक्षेला बसून उत्तीर्ण व्हायच्या न्याय्य संधीला तो मुकायचा. न्याय आणि कायदा या विषयातले टोपे हे अधिकारी पुरुष. त्यांनी फक्त पूर्वपरीक्षा ऐच्छिक करून टाकली. नव्या कार्यविधीत, विद्यापीठाच्या परीक्षादेखील अशाच ऐच्छिक करायचा त्यांचा विचार आहे, असे ऐकतो. गेल्या वर्षी, आपल्या अलोट अधिकारात, टोप्यांनी आणखी एक चिरस्मरणीय सत्कृत्य करून मुंबई विद्यापीठाचे नाव रोशन केले. शास्त्रशाखेच्या प्रथमवर्षाची पदार्थविज्ञानाची प्रश्नपत्रिका अनपेक्षित होती; नेमलेल्या अभ्यासक्रमाबाहेरचे प्रश्न तिच्यात आहेत, असे विद्यार्थ्यांना वाटले. प्रश्न अभ्यासक्रमानुसारच आहेत अशी प्रश्नकाढ्या प्राध्यापकांची खात्री होती; पण विद्यार्थ्यांनी संघटित होऊन कुलगुरुमाऊलीकडे दाद मागितली आणि कुलगुरुमाऊलीने अशा सातशेसत्तावीस विद्यार्थ्यांचे नादुरुस्त पदार्थविज्ञान दुरुस्त करून टाकले. विद्यार्थ्यांनी ज्यांना घेराव घातला असे टोपे हे मुंबई विद्यापीठाचे पहिले कुलगुरू आहेत. त्यांचे हे ऐतिहासिक श्रेय कोणी नाकारू शकत नाही. विद्यापीठाचा नवाकोरा परिसर टोपेराजवटीतच वाजतगाजत नांदायला लागला. तो परिसर उभा राहायला किती पैसे लागले याबद्दल मतभेद आहेत. पण मतभेदांशिवाय तो उभा राहू शकला नसता हे मुंबईकरांनी समजूतदारपणे मान्य केले आहे. महाविद्यालयातील गैरव्यवस्था, परीक्षांबाबतचा सुविहित-सुनियंत्रित गोंधळ इत्यादी परंपरांचे कुलगुरु टोप्यांनी डोळस निष्ठेने जतन तर केलेच; पण वर त्यांना एक कायदेशीर प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.

हे श्रेय त्यांना कोणी देऊ गेला तर ते संकोचतील. तसे ते विनयीच आहेत हो. ते म्हणतील, हे श्रेय माझे एकट्याचे नाही; सहस्रबाहु चिदंबरमप्रभृती विद्यापीठाच्या कष्टाळू कारभाऱ्यांचा त्या श्रेयात फार मोठा वाटा आहे. मागे उल्लेखिलेल्या सिनेटच्या बैठकीत त्यांनी हे जाहीरपणे सुद्धा सांगून टाकले आहे.

गेल्या वर्षीपासून १८ जुलै हा मुंबई विद्यापीठाचा स्थापनादिन खुद्द विद्यापीठात आणि संलग्न संस्थांमधून आवर्जून साजरा केला जाऊ लागला आहे. त्यावेळी, विद्यापीठाच्या शिफारसवजा आदेशानुसार (किंवा आदेशवजा शिफारसीनुसार) विद्यापीठाला आजचा थोरथोर दर्जा आणि दबदबा प्राप्त करून देणाऱ्या माजीआजीउद्याजी कुलगुरूंचे पुण्यस्मरण करण्यात येते. या वर्षी एका कुलगुरू त्र्यंबकतात्या कृष्णाजी टोपे यांचे स्मरण करून, स्थापनादिन आणि मुदतवाढ यांच्यासाठी एक संयुक्त सोहळा करावा, अशी सूचना मी सिनेटचा सभासद नसताना सुद्धा करतो आहे.

कुलगुरू टोप्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणि कार्याचे स्फुरणदायित्व ध्यानी घेता त्यांचे एखादे बृहच्चरित्र लिहायचा प्रकल्प मुंबई विद्यापीठाने हाती घ्यावा, असे जे अनेकांना वाटते आहे, त्याला माझा पाठिंबा आहे.

—अनंतराव



# पॅपिलॉन



मूळ लेखक : हेन्री शॅरियर

अनुवाद : रवींद्र गुर्जर

'सान्ता मार्ता' तुरुंगात पॅपिलॉन, जोन्स आणि मॅच्युरेट पुन्हा एकत्र आले, पण थोड्याच अवधीत पॅपिलॉनला अंधार कोठडीत टाकण्यात आलं. अठ्ठावीस दिवसानंतर त्याची तिथून सुटका झाली. त्या वेळी त्याची दशा दयनीय झाली होती. तुरुंगाच्या गव्हर्नरला लाच देण्याच्या तीन योजना पॅपिलॉननं तयार केल्या. मोठ्या युक्तीनं तसं वातावरणही निर्माण केलं. वाट्टेल ते करून पळून जाणं हेच उद्दिष्ट अहोरात्र समोर होतं. कॉन्व्हेंटच्या मदरकडून त्यानं मोती परत मिळवले आणि ते विकून पैसे उभे केले. बेल्जियन वकिलाची या कामात मध्यस्ती झाली. तिसऱ्या योजनेत तर एका कोळ्याचे मदतीने होडी तयार ठेवण्यातही यश मिळालं, पण ऐनवेळी पाऊस न पडल्यानं सुटकेचा तो मार्गही खुंटला.

## प्रकरण बारा : सारे प्रयत्न निष्फळ

दुसऱ्या दिवशी सकाळी सहा वाजता आमची बारानक्विल्ला तुरुंगाकडे रवानगी झाली. सोबत आठ सैनिक, दोन कॉर्पोरल आणि एक लेफ्टनंट असा ताफा होता. सर्वांना बेड्या ठोकण्यात आल्या होत्या. आर्मीच्या एका लॉरीनं सव्वाशे मैलांचं अंतर साडेतीन तासात काटलं. दहा-दहाजणांच्या ओळीत आम्ही तुरुंगात प्रवेश केला. या तुरुंगात अडकावं लागू नये म्हणून कोण आटापिटा केला होता, पण व्यर्थ. गाव मोठं होतं. तुरुंगही तसाच मोठा : चारशे कैदी आणि शंभरएक वॉर्डर्स. सर्वसाधारण युरोपियन धाटणीची व्यवस्था होती. भोवताली दोन उंचच उंच भिंती—पंचवीस फुटांचे वर.

वरच्या अधिकाऱ्यांनी आम्हाला आत घेतलं. गव्हर्नरचं नाव होतं डॉन ग्रेगरिओ. 'अत्यंत धोकादायक' गुन्हेगारांची खास सोय असलेल्या विभागात आम्ही जाऊन पडलो. माझ्या झडतीच्या वेळी त्यांना तेवीस हजार पेसो आणि छोटे बाण सापडले. बाण विषारी होते हे सांगणं इष्ट होतं. गव्हर्नर म्हणाला, "विषारी बाण जवळ बाळगण्यापर्यंत तुमची मजल गेली नाही का!"

बारानक्विल्ला इथून पळ काढणं जवळजवळ अशक्य होतं. या ठिकाणीच आम्हाला फ्रेंच अधिकाऱ्यांच्या सुपूर्त करण्यात येणार होतं. अखेरची धडपड करताना सर्वस्व पणाला लावणं अश्यक होतं.

यार्डच्या मधोमध आमची पिंजरावजा कोठडी होती. जाड लोखंडी गजांवर सिमेंटचं छप्पर, एक कडेला मुतारी. पाऊस आत येऊ नये म्हणून छपरावर पुढे येणारे धातूचे पत्रे ठोकण्यात आले होते. या मुख्य पिंजऱ्यात अडकवलेल्या आम्हा सहा फ्रेंच माणसांना सर्व कैदी आणि मुख्यत: वॉर्डर्स सदैव पाहू शकत होते. सकाळी सहा ते सायंकाळी सहा बाहेर हिंडण्याची मोकळीक होती. सर्व दिवसभर आम्ही या कोठडीतून त्या कोठडीत फिरलो. बोलणे, चालणे किंवा खाण्यालाही परवानगी होती.

दोन दिवसांनंतर आम्हाला तिथल्या एका छोट्या चर्चमध्ये नेण्यात आलं. तिथे गव्हर्नर, काही पोलीस आणि सात-आठ वार्ताहर आधीच येऊन बसले होते.

'तुम्ही गियानाच्या तुरुंगातून पळ काढला ना?'

' ते आम्ही कधीच नाकारलेलं नाही. '

' कोणकोणत्या गुन्ह्यांमुळे तुम्हा प्रत्येकाला ही गंभीर शिक्षा झाली होती ?'

' ते महत्त्वाचं नाही. प्रश्न हा आहे की, आम्ही तुमच्या कोलंबियन भागात कोणताही गुन्हा केला नसताना तुम्ही एक तर आम्हाला मोकळेपणानं, सुखात जगू देत नाही आणि फ्रेंच सरकारचे हस्तक असल्यासारखे रानटीपणानं वागता. '

' कोलंबियाला तुमचा स्वीकार करावा असं वाटत नाही. '

' पण माझी आणि दोन मित्रांची तशी बिलकुल इच्छा नव्हती. आम्हाला समुद्रात दूरवर अटक करण्यात आली, तुमच्या जमिनीवर उतरताना नाही. उलट आम्ही जास्तीत जास्त लांब जाण्याचा प्रयत्न करीत होतो. '

' बहुतेक फ्रेंच लोक आपल्यासारखेच कॅथॉलिक असतात. ' एक वार्ताहर म्हणाला.

' तसं असेल, पण तुमची वागण्याची पद्धत ख्रिश्चन धर्मापासून कित्येक मैल दूर आहे. '

' तुझं आमच्याविषयी असं मत का झालंय् ?'

' आमच्या जीवावर टपलेल्या प्राण्यांच्या कारवाईला तुम्ही हात-भार लावता म्हणून. त्यांच्यासाठी तुम्ही काम करता हे वाईट आहे. आमची होडी आणि त्यातली एकूण एक चीजवस्तू तुम्ही हिरावून घेतली. त्या सर्व गोष्टी आमच्या स्वतःच्या होत्या. क्युराकाओच्या दयाळू बिशपमुळे त्या मिळाल्या होत्या. आमचं जीवन नव्यानं सुरू व्हावं ही किमान इच्छा तुम्ही पायदळी का तुडवावी हेच कळत नाही. बरं, तुम्हाला कसलीही तोशीस पडू न देता आम्ही दुसऱ्या देशात जात असताना तुम्ही का अडवावं ? आम्हाला आसरा द्यावा असं त्या देशांना वाटेलही कदाचित. इथेच तुमची वागणूक आम्हाला पटत नाही. '

' म्हणजे तुमचा आम्हा कोलंबियन लोकांवर बराच राग आहे तर ?'

' लोकांवर नाही, पण पोलीस आणि कायदा–व्यवस्थेवर मात्र आहे. '

' याचा काय अर्थ ?'

' अर्थ हाच की सदिच्छा असेल तर कोणतीही चूक सुधारता येते. दुसऱ्या देशाला समुद्रमार्गानं जाण्याची आम्हाला परवानगी मिळावी. '

' आम्ही त्यासाठी जरूर प्रयत्न करू. '

परत आल्यावर मॅच्युरेट मला म्हणाला, ' तुझ्या लक्षात आलं ना ? यावेळी गमजा चालणार नाहीत. आपण चांगलेच अडकलो आहोत. इथून सुटका करून घेणं अशक्यच वाटतं. '

' हे बघ, ' मी म्हणालो, ' आपण सर्वजण एक झालो तर उपयोग होईल का नाही ते सांगता येत नाही, प्रत्येकाला जे योग्य वाटेल तसं त्यानं वागावं. मी तरी इथून पळ काढणारच. '

गुरुवारी मला बाहेरील लोकांना भेटायच्या खोलीत बोलावणं आलं. तिथे एक उत्तम पोशाखातला गृहस्थ बसला होता. मी नीट निरखून चेहरा पाहिला. त्याच्या आणि लुईस देगाच्या चेहऱ्यात विलक्षण साम्य होतं.

' तूच पॅपिलॉन का ?'

' होय. '

' मी जोसेफ, लुईस देगाचा भाऊ. वर्तमानपत्र वाचून मी तुला भेटायला आलो आहे. '

' आभार. '

' तुझी आणि माझ्या भावाची गियानात गाठ पडली का ? तुमची निदान ओळख तरी आहे ना ?'

आम्ही रुग्णालयातून पळ काढेपर्यंतची सर्व कथा मी त्याला ऐकवली. त्यानं सांगितलं की, मार्सेलिसमधून आलेल्या बातमीनुसार देगा सध्या सेलट बेटावर होता. त्याच्याकडून असंही कळलं की, बारान्क्विल्लामध्ये बारा फ्रेंच सहकुटुंब राहत होते, ते नशीब काढायला आले होते. त्यांची ' कुटुंबं ' खास परंपरागत आणि कौशल्ययुक्त वेश्याव्यवसाय करीत होती. सर्व जगात जशी या धंद्यातली माणसं असतात तशीच तिथेही होती. त्यांचा चरितार्थ उत्तम चालू होता.

आणखीही बहुमोल माहिती जोसेफनं पुरवली. आम्ही तुरुंगात आल्यापासून त्या लोकांचं मनःस्वास्थ्य नष्ट झालं होतं. जर का आमच्यापैकी कोणी पळ काढला तर ते फ्रेंच असल्यामुळे त्यांची तपासणी होणार अशी त्यांना भीती वाटत होती. पर्यायानं त्यांची शांती नष्ट होणार होती; चालत्या धंद्यावर गदा येणार होती. बनावट कागदपत्र, मुदत संपलेली लायसेन्स, आयडेंटिटी कार्डस् आणि इतर खोटे परवाने या गोष्टी उघडकीस येण्याची शक्यता होती. म्हणजे एकूण त्यांच्या दृष्टीनं वाईटच.

मी सर्व परिस्थितीचा आढावा घेतला. जोसेफनं कोणत्याही प्रकारची मदत लागली तर ती देण्याचं आश्वासन दिलं. दर रविवारी आणि गुरुवारी भेट घ्यायचं ठरलं. तो खरोखर भला माणूस होता. पुढे त्याचा खूपच उपयोग झाला. आम्ही पुन्हा ताब्यात येणार असल्यामुळे फ्रेंच सरकार आनंदोत्सवच साजरा करण्याची शक्यता होती.

' मित्रहो, मी तुमच्यासाठी खास बातम्या आणल्या आहेत. '

' काय काय ?' माझे पाचही मित्र एकदम ओरडले.

' उगीच खोटी आशा धरू नका, हे आधी सांगतो. आपल्याला नेण्यासाठी फ्रेंच गियानाहून एक खास जहाज निघालं आहे. दुसरी गोष्ट म्हणजे आपण इथे आल्यामुळे गावात आरामात राहणाऱ्या फ्रेंच भडव्यांना खूपच काळजी वाटू लागली आहे. साला एकही मला भेटायला आला नाही. आपल्यापैकी कोणी पळ काढला तर त्यांचं स्वास्थ्य हरपणार आहे. '

सगळेजण हसू लागले. त्यांना वाटलं की मी थट्टाच करतोय. जोन्स म्हणाला, ' गव्हर्नर महाशय, कृपया मला सुटकेची परवानगी द्याल का ?'

' मी विनोद करत नाहीये. त्यांच्यापैकी कोणी भेटायला आलेच तर आपण भेटायचं नाही, समजलं ?'

' समजलं. '

मी पूर्वी सांगितल्याप्रमाणे तिथे शंभराच्यावर कोलंबियन कैदी होते. ते काही साधेसुधे नव्हते. वाकबगार चोर, तज्ज्ञ तिजोरीफोडे, हुषार भेसळवाले, खास शिक्षण मिळालेले खुनी इ. इ...त्या भागातील श्रीमंत आणि यशस्वी धाडसी लोक या गुन्हेगारांना विकत



'आम्हाला बाहेर जाऊ देण्याची आज्ञा द्या, नाहीतर मी तुम्हाला ठार करीन.'

घेऊन आपला कार्यभाग साधीत असत.

सर्व धर्म, वंशाचे लोक तुरुंगात होते. मी त्यातल्या काहीजणांशी संबंध प्रस्थापित केले, त्यांच्यातल्या शक्तीला साद घातली आणि सुटकेची इच्छा त्यांच्या मनात निर्माण केली. बरेचजण माझ्या-सारखेच होते. मोठी शिक्षा मिळण्याची शक्यता असलेले किंवा आधीच ती मिळालेले. पळ काढण्याचा विचार त्यांच्या मनात सदैव जागृत होताच.

## सुटकेच्या तयारीला सुरुवात

भोवतालच्या चारी भिंतींवर गस्त घालण्यासाठी छोटा मार्ग होता. रात्री तिथे प्रखर दिवे पेटविलेले असत. प्रत्येक कोपऱ्यात उंच लाईट-हाऊस होतं आणि तिथे एकेक शिपाई पहारा देई. चार शिपाई रात्रंदिवस त्या जागी असत. पटांगणात एक आणि चर्चच्या दाराशी एक असे दोन होतेच. अन्नपदार्थ चांगले होते. शिवाय बाहेरून जिन्नस विकत आणण्याचीही सवलत होती. आत काही व्यापारीही येत. कैदी आणि त्यांच्यात काही काही वेळा मारामारीचे प्रसंग उद्‌भवत.

दोन कोलंबियन चोर माझ्याकडे एक प्रस्ताव घेऊन आले. मी तो लक्षपूर्वक ऐकला. गावात असेही काही पोलीस होते की, जे चोर होते. ते कामावर असताना त्यांचे साथीदार निर्धास्तपणे आपला धंदा चालू ठेवत. अशा एखाद्या पोलिसाकडून पिस्तूल पैदा करावं आणि दारावरच्या सैनिकांना धाक दाखवून, दार उघडायला लावून बाहेरच्या गर्दीत मिसळून जावं अशी त्यांची कल्पना होती. मला त्यात फारसं तथ्य वाटलं नाही. पिस्तुलामुळे भिंतीवरचे गार्ड घाबर-तीलच याचा भरवसा नव्हता. त्यातल्या कोणी जरा हालचाल केली तर त्याला निष्कारण ठार करावं लागणार होतं. मी नकार दिला.

काहीतरी धडपड केली पाहिजे असं वाटणारा काही मीच एकटा नव्हतो, माझे काही इतर मित्रही होते. फरक फक्त एवढाच होता की, त्यातल्या बऱ्याच जणांनी निराश होऊन प्रयत्न सोडून दिले होते. गियानाला परत नेण्यासाठी निघालेल्या बोटीवर मुकाटयानं चढाव असाही विचार पसरला होता. आपल्याला तिथे काय शिक्षा होणार, वागणूक कशी मिळणार या विषयांवर खूप वेळ चर्चा चालत.

'तुमच्या असल्या चर्चा ऐकून माझं तर डोकंच उठतं,' मी म्हणालो, 'असलं काही माझ्यासमोर बोलत जाऊ नका. नशिबाच्या गोष्टी फक्त छक्क्यांनीच कराव्यात. तुम्ही तसे आहात का? तुमच्यापैकी कोणी पुरुषत्व गमावलेलं आहे का? तसं असेल तर सांगा. मी जेव्हा सुटकेबाबत विचार करतो तेव्हा सहाही जणांच्या संदर्भात तो करतो. माझं डोकं अहोरात्र ज्यात गुंतलंय ते सग-ळ्यांच्या सुटकेसाठी. ते इतकं काही सोपं नाही. आणखी एक गोष्ट ऐकून ठेवा. फक्त माझ्यापुरता प्रश्न असेल—मी एकटाच—तर काम अत्यंत सोपं आहे. फ्रेंच अधिकाऱ्यांच्या ताब्यात जाण्याचा दिवस जवळ आला आणि काहीच मार्ग सापडला नाही तर मी सरळ एका कोलंबियन पोलिसाला ठार मारीन. त्यामुळे मला अवधि मिळेल. ते काही मला लगेच बोटीवर पाठवणार नाहीत. मी एकटा सहज पळ काढू शकेन.

तेवढयात दुसरी एक योजना पुढे आली. ती बऱ्यापैकी होती. दर रविवारी चर्चमध्ये खूपच गर्दी जमायची. कैदी आणि त्यांना भेटा-यला आलेल्या लोकांची प्रवचने पार पडल्यावर पाहुणे लोक ज्यांच्यासाठी आले असतील तेवढे कैदी तिथे थांबत, बाकीचे परत जात. थोडाफार पहारा असायचा. पुढच्या रविवारी मी तिथल्या परिस्थितीचा अभ्यास करायचं ठरवलं. इतर कैद्यांनी बंड करण्यात मी पुढाकार घ्यावा असं सुचवलं, पण मी नकार दिला. सगळ्या कैद्यांना मी पुरेसा ओळखत नव्हतो.

आमच्यातल्या कारग्युरेट आणि एकाची या प्रयत्नात भाग घेण्याची तयारी नव्हती. त्यांनी फक्त चर्चमध्ये हजर राहायचं नाही असं ठरलं. बाकीच्या चौघांनी तिथे जावं. चर्च आयताकृती होतं. दोन्ही बाजूच्या यार्डमध्ये बाहेर पडण्यासाठी दारं होती. एका बाजूला

व्यासपीठ, त्याच्यासमोरच्या बाजूला मुख्य दरवाजा, बाहेर बरेचसे पोलीस असत. त्याच्या पलिकडे तुरुंगाबाहेर रस्त्यावर जाण्यासाठी एक दरवाजा. प्रवचन चालू असताना सर्व पोलीस ओळीत उभे राहत. भेटायला येणाऱ्या दोन स्त्रियांनी आतमध्ये शस्त्रे आणावीत असं ठरलं–पायांमध्ये दडवून दोन मोठी पिस्तुलं. मुख्य माणसाच्या ताब्यात ती दिल्यावर त्यांनी लगेच निघून जायचं. सर्वजण आत जमले की तयारीत राहायचं. घंटा वाजल्यावर दुसऱ्या क्षणी आम्ही सर्वांनी एकदम हल्ला करायचा. मी गव्हर्नरच्या गळयाशी मोठा चाकू धरून म्हणायचं, 'आम्हाला बाहेर जाऊ देण्याची आज्ञा द्या, नाहीतर मी तुम्हाला ठार करीन.'

दुसऱ्या एकानं धर्मोपदेशकाला तसंच करायचं. इतर तिघांनी पोलिसांवर पिस्तुलं रोखायची. जो बंदूक खाली टाकणार नाही त्याला गोळी घालायची. निःशस्त्र लोकांना आधी बाहेर जाऊ द्यायचं. गव्हर्नर आणि धर्मोपदेशकाचा बचावासाठी ढालीसारखा उपयोग करायचा. पोलिसांनी खाली टाकलेल्या बंदुका उचलून त्यांना चर्चमध्ये ढकलायचं. मुख्य दार बंद करून रस्त्याकडे सर्वांनी पळ काढायचा, पन्नास यार्डांवर एक लॉरी वाट पाहणार होती–आत चटकन शिरण्यासाठी त्याला छोटी शिडी लावलेली. शेवट आत चढणाऱ्या माणसानं शिडी वर ओढून घ्यायची वगैरे वगैरे.

मी जेव्हा प्रवचन आणि सामुदायिक प्रार्थना कशी चालते हे प्रत्यक्ष पाहिले तेव्हा योजनेला मान्यता दिली. फर्नान्दोनं सांगितल्या-प्रमाणे सर्व गोष्टी पार पडल्या.

जोसेफ देगा रविवारी भेटायला येणार नव्हता. का ते तो जाणून होता. तो एक टॅक्सी तयार ठेवणार होता. आम्ही लॉरीऐवजी त्यात शिरणार होतो, आणि कुठे तरी अदृश्य होणार होतो. सर्व आठ-वडाभर मी जय्यत तयारी केली. सगळेच अधीर झाले होते. फर्नान्दोनं दुसऱ्या मार्गानं एक पिस्तूल पैदा केलं. गुरुवारी जोसेफची एक बायको मला भेटायला आली. ती खूप गोड होती. टॅक्सी पिवळी असेल असं तिनं सांगितलं–आमचा घोटाळा होऊ नये म्हणून. 'ठीक आहे. आभार.'

'गुड लक.' तिनं माझ्या दोन्ही गालांचे मुके घेतले. मला जाणवलं की ती फारच भावनाप्रधान होती.

'या, या सर्वजण आत या. ईश्वराचा संदेश ऐकण्यासाठी एकत्र.' धर्मोपदेशक म्हणाला.

जोन्सनं स्वतःला कसंबसं सावरलं होतं. मॅच्युरेटचे डोळे नेहमी-प्रमाणे चमकू लागले होते. एकजण मला चिकटूनच उभा होता. माझ्या जागेवर मी अत्यंत शांतपणे उभा होतो. एका लठ्ठ बाई-शेजारी गव्हर्नर ॲन ग्रेगरिओ खुर्चीवर बसला होता. आम्ही चारी-जण भिंतीपाशी उभे होतो. रस्त्यात सटकायला मिळालं तर कोणी आपल्याला ओळखू नये म्हणून, मी उजव्या हातात चाकू उघडा करून ठेवला. खाकी सदऱ्याच्या बाहीमध्ये ती दडवलेला होता. घंटा वाजल्यावर सर्वजण खाली वाकत. तोच आमचा खुणेचा इशारा होता. प्रत्येकाला आपापलं काम चांगलं ठाऊक होतं.

घंटा वाजली... मी गव्हर्नरच्या दिशेला झेपावलो आणि त्याच्या सुरकुतलेल्या गळयावर चाकूचं टोक भिडवलं. धर्मोपदेक किंचाळला, 'मला ठार मारू नका, दया करा.' न बघताच मला समजलं की, इतर तिघांनी पोलिसांना बंदुका खाली टाकण्याची धमकी दिलेली होती. सर्व काही व्यवस्थित पार पडत होतं. मी गव्हर्नरची कॉलर पकडून त्याला उठवलं. 'माझ्या मागोमाग या, अजीबात घाबरू नका. मी तुम्हाला काहीही इजा करणार नाही.' जवळून त्याच पद्धतीनं धर्मोपदेशक लोकांबरोबर दाराकडे सरकत होता. फर्नान्दो म्हणाला, 'आपण आता पळू या, फ्रेंच दोस्तांनो, बाहेर पडू या.'

विजयाच्या आनंदात मी माझ्या लोकांना बाहेरच्या दाराकडे ढकलत होतो. इतक्यात दोन बंदुका उडाल्या. फर्नान्दो आणि दुसरा एकजण खाली कोसळले. पोलीस भानावर आले होते आणि त्यांनी बंदुकांनी आमचा मार्ग रोखला होता. सुदैवानं त्यांच्या आणि आमच्यामध्ये काही स्त्रिया होत्या म्हणून आम्ही बचावलो. त्यांना गोळया झाडता आल्या नाहीत. आमचा तिसरा पिस्तुलधारीही बंदुकीला बळी पडला. प्रेतकळा पसरलेल्या चेहऱ्यानं गव्हर्नर मला म्हणाला, 'मला चाकू दे.' मी तो देऊन टाकला. काही नवीन हालचाल करणं मूर्खपणाचं होतं. तीस सेकंदांच्या आत पारडं फिरलं.

एका आठवड्यानंतर मला समजलं की, आमचं बंड बाहेर पटांगणात उभ्या असलेल्या एका कैद्याच्या चुगलीमुळे मोडलं गेलं. तो आत बघत उभा होता. गडबड सुरू झाल्याचं दिसताच त्यानं भिंती-वरच्या एका सैनिकाला सांगून टाकलं. वीस फूट उंचीच्या भिंतीवरून दोघांनी खाली उडी टाकली आणि हस्तक्षेप केला. चर्चमधील पोलिसांना संरक्षण दिलं. त्यांच्याच गोळयांना आमच्यांतील तिघं बळी पडले होते. नंतर एकच गोंधळ उडाला. मी आपला गव्हर्नरच्या मागे उभा होतो. तो भराभर आज्ञा सोडीत होता. आम्हा चार फ्रेंच लोकांसह एकूण सोळा जणांची अंधार कोठडीत रवानगी झाली–पुन्हा एकदा ब्रेड आणि पाणी.

जोसेफ गव्हर्नरला भेटला. मला बोलावणं आलं. माझ्यावर 'कृपा' करून मित्रांसह मला पुन्हा बाहेर काढणार असल्याचं त्यानं सांगितलं. दहा दिवसांनंतर कोलंबियन कैद्यांसह आम्ही सर्वजण पहिल्या कोठडीत दाखल झालो. ही जोसेफचीच मेहेरबानी. फर्नान्दो आणि इतर दोन हुतात्म्यांना आम्ही काही काळ स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली. जोसेफनं मला सांगितलं की, त्यानं गावातल्या सगळया वेश्यांकडे हॅट फिरवून पाच हजार पेसो गोळा केले होते. त्याच्या जोरावरच गव्हर्नरचं मन त्यानं वळवलं होतं. वेश्यांविषयीच्या आमच्या मतामध्ये त्यामुळे फरक पडला.

पण आता करायचं काय? नवीन कल्पना कुठे आहेत? कारण काहीं झालं तरी मी प्रयत्न सोडणं शक्यच नव्हतं आणि मुकाट्यानं बोटीवर चढणं ही कल्पना असह्य होती.

बाथरूममध्ये खाली आडवं पडून, मी भिंतीवरच्या सैनिकांकडे लक्षपूर्वक पाहू शकत असे. त्यांच्या ध्यानात न येता– रात्रीच्या वेळी दर दहा मिनिटांनी 'जागते रहो!' अशा आरोळया ते ठोकत. त्यामुळे पहाऱ्यावरच्या मुख्य अधिकाऱ्याला सर्व सैनिक जागे अस-ल्याची खात्री होई. कोणी झोपल्याचं कळलं तर त्याला लगेच उठवण्यात येई.

याच ठिकाणाहून पळून जाण्याची काहीतरी युक्ती शोधून काढावी असा मी विचार केला. चारी कोपऱ्यातल्या लाईट-हाऊसमधून भिंती-

वरून दोरीनं एकेक भांडं खाली सोडलेलं होतं. डुलकी आल्यावर पहारेकरी कॅन्टीनवाल्याच्या नावानं ओरडून कॉफी मागवी. तो इसम भांड्यात दोन–तीन कप कॉफी ओतत असे आणि दोरीनं भांडं वर ओढून घेऊन सैनिक तिचा समाचार घेई. आपल्याला भिंतीवर चढता आलं तर पलीकडे उडी टाकता येईल. पण हे कसं जमावं ?

एका कोपऱ्यातला सैनिक उकाड्यामुळे त्रासल्यासारखा दिसत होता– जागं राहण्यासाठी डोकं झटकीत होता. देवाला काळजी, युक्ती सापडली ! त्याला सरळ झोपवावं. आधी मी दोर तयार ठेवावा, मिळाला तर हूक. दोन दिवसानंतर मी वीस फूट दोर तयार केला. खूप सदऱ्यांचा वापर करून. हूकही पैदा केला. जोसेफ देगानं मला झोपेचं कडक औषध आणून दिलं. सूचना अशी होती की एका वेळी फक्त दहाच थेंब वापरायचे. एकूण सहा मोठे चमचे भरून द्रव्य होतं. मी एका सैनिकाला वारंवार कॉफी देऊन खूष केलं. तो जवळजवळ मित्रच बनला. तो कॉफीसाठी भांडं खाली सोडी आणि मी दरवेळी तीन कप कॉफी वर पाठवीत असे. सगळ्या कोलंबियन लोकांना दारू आवडते. झोपेच्या औषधालाही तसाच वास येत होता. मी एनिस नावाची दारूची बाटली मागवली.

एक दिवस त्या पहारेकऱ्याला मी म्हणालो, 'फ्रेंच कॉफी प्यायला आवडेल का ?'

'ती कशी काय असते ?'

'त्यात थोडी एनिस घालतात.'

'थोडी दे. आधी चव तर बघू.'

त्यांच्यापैकी खूप जणांना तशा कॉफीची चटक लागली. मी जेव्हा त्यांना कॉफी विषयी विचारीत असे, तेव्हा ते म्हणत, 'फ्रेंच कॉफी !'

'ठीक आहे,'– मरा लेको. मी कॉफीत एनिस ओतायचो.

अखेर 'ती' वेळ जवळ आली. शनिवार दुपार. हवेत भयानक उष्मा होता. मागोमाग अली नावाचा एक कोलंबियन कैदी वर चढणार होता. मला दोर आणि हूक जवळ बाळगता येणार नव्हता, कारण पहारेकऱ्यांना कॉफी देण्याच्या अवधीत ते उघडकीस येण्याची शक्यता होती. त्यामुळे दुसऱ्या साथीदाराची आवश्यकता होतीच. पहारेकरी पाच मिनिटात बाद होणार होता.

अजून पाच मिनिटे. मी पहारेकऱ्याला म्हणालो, 'काय, ठीक ?'

'हो.'

'कॉफी घेणार का ?'

'चालेल, पण फ्रेंच कॉफी–ती बरी लागते.'

'एक मिनिट–मी घेऊन येतो.' मी कॉफीच्या स्टॉलवर गेलो. 'दोन कॉफी.' भांड्यात मी आधीच आख्खी बाटली रिकामी केली होती. पहारेकरी बराच वेळ आडवा पडणार होता. झोपेचं औषध होतंच तितकं जहाल. भिंतीखाली जाऊन त्याच्या देखत मी भांड्यात एनिस दारू ओतली. 'जरा कडक करू का ?'

'हो.'

त्यानं भांडं वर ओढून घेतलं.

पाच मिनिटं झाली, दहा, पंधरा, वीस मिनिटं ! अजूनही गुंगी आली नव्हती, त्याहून वाईट म्हणजे खाली बसायच्या ऐवजी, बंदूक हातात धरून तो चक्क येरझारा घालू लागला. पण त्यानं सगळी कॉफी रिचवली होती. एक वाजता पहारे बदलत असत.

मी अगदी श्वास रोखून त्याची प्रत्येक हालचाल न्याहाळत होतो. औषधाचा कणमात्रही परिणाम जाणवत नव्हता. थांबा, पावलं अडखळली ! पहाऱ्याच्या चौकीसमोर तो खाली बसला, बंदूक दोन पायात ठेवली. त्याचं डोकं खांद्यावर कलंडलं. ज्यांना वर काय घडणार हे ठाऊक होतं तेही माझ्यासारखंच काळजीनं पाहत होते.

'पुढे, हो !' मी अलीला म्हणालो. 'हा दोर !'

तो दोर वर फेकणार इतक्यात पहारेकरी उभा राहिला, बंदूक खाली टाकली आणि मोठा आळस दिला. हा काय प्रकार आहे. अलीची हालचाल सुदैवानं त्याच्या दृष्टीस पडली नाही. पहारे बदलायला फक्त अठरा मिनिटे बाकी उरली. आता मी मनात देवाचा धावा सुरू केला. 'परमेश्वरा, मला फक्त एकदाच तुझी मदत हवीय, मी प्रार्थना करतो. यावेळी माझ्याकडे पाठ फिरवू नकोस !' पण व्यर्थ. माझ्यासारख्या नास्तिक माणसाची प्रार्थना तो कशी बरं ऐकणार !

'आपला तर विश्वासच बसत नाही ' जोन्स जवळ येऊन म्हणाला, 'हा महामूर्ख माणूस अजून का झोपी जात नाही ?'

बंदूक उचलण्यासाठी तो खाली वाकला आणि धाड्कन् आडवा झाला, जणू काही त्याच्या पाठीत कोणी सुरा खुपसला होता. अलीनं हूक वर फेकला पण तो न अडकता परत खाली आला. दुसऱ्यांदा टाकल्यावर मात्र तो बरोब्बर अडकला, हूक घट्ट अडकला होता हे त्यानं तपासून घेतलं. आता दोर पकडून मी भिंतीवर पाय टेकणार इतक्यात जोन्स ओरडला, 'थांबा थांबा ! तो बघ नवीन गार्ड येतोय !'

त्याच्या दृष्टीस पडण्यापूर्वी मी भिंतीपासून कसाबसा दूर झालो. कैद्यांमधे आपल्या साथीदाराला सावरून घेण्याची जो उपजत प्रवृत्ती असते, किंवा वेळप्रसंगानुसार एकी निर्माण होते त्यानुसार दहा-बारा कोलंबियन कैद्यांनी मला गराडा दिला. गर्दीत मी मिसळून गेलो. भिंतीच्या कडेनं आम्ही दूर जाऊ लागलो. आमचा दोर तसाच लोंबळत होता. नव्या गार्डला तो दोर आणि निपचित पडलेला आधीचा गार्ड दृष्टीस पडताच धावत जाऊन त्यानं धोक्याचा इषारा देणारी घंटा वाजवली. कोणीतरी हमखास पळ काढलेला असणार ही त्याला खात्री वाटत होती.

बेशुद्ध माणसाला स्ट्रेचरवरून उचलून नेण्यात आलं. वरच्या भिंतीवर आता वीसपेक्षा जास्त पोलीस जमले होते. गव्हर्नरही आला. आमचा दोर वर ओढून घेण्यात आला. थोड्याच अवधीत सर्वांवर बंदुका रोखण्यात आल्या. सर्वांची नावं घेऊन हजेरी झाली. आपलं नाव उच्चारून झालं की प्रत्येकानं कोठडीत जायचं होतं. आश्चर्य ! एकही कैदी गायब नव्हता ! सर्व कोठड्यांना कुलपं ठोकण्यात आली.

पुन्हा रोलकॉल आणि तपासणी, प्रत्येक कोठडी–कोठडीत. छे कोणीच अदृश्य झालं नव्हतं. दुपारी तीन वाजता आम्हाला पुन्हा बाहेर मैदानात सोडण्यात आलं. बेशुद्ध पहारेकरी अजूनही घोरत होता अशी वार्ता आली. कोणत्याही उपायानं त्याला जागं करण्यात यश आलं नव्हतं. माझी आणि अलीची पाचावर धारणच बसली होती. आमची योजना नक्की यशस्वी होणारच यात मला संशय

वाटत नव्हता, पण दुर्दैव ! अलीनं अमेरिकेला गलिच्छ शिव्या घातल्या, कारण ती औषधाची बाटली अमेरिकेत तयार झाली होती. आता काय करायचं ?'

'त्यात काय आहे, पुन्हा पहिल्यापासून सुरुवात.' मी त्याला फक्त एवढंच म्हणू शकलो. त्याला वाटलं की दुसऱ्या गार्डला पुन्हा झोपवण्याबद्दल मी बोलत होतो. मला म्हणायचं होतं, 'आपण दुसरा काही मार्ग शोधून काढू या.'

तो म्हणाला, 'वॉर्डर्स इतके खुळे आहेत असं तुला वाटतं का ? पुन्हा कोणी फ्रेंच कॉफी घेईल असं मला वाटत नाही.'

हा प्रसंग दुःखद असूनही मला हसल्यावाचून राहवेना. 'तुझं बरोबर आहे.' मी म्हणालो.

तीन दिवस आणि चार रात्री झोप काढून बिचारा पहारेकरी शुद्धीवर आला. ती सगळी माझ्या फ्रेंच कॉफीचीच करामत असल्याचं अर्थातच त्यानं सांगून टाकलं. गव्हर्नरनं मला बोलावलं आणि आम्हा दोघांना समोरासमोर उभं केलं. पहाऱ्यावरील कमांडर माझ्यावर तलवार घेऊनच धावला. मी कोपऱ्यामधे जाऊन वाकलो आणि त्याचा वार चुकवला. त्यानं पातं पुन्हा उगारलं. गव्हर्नर मधे पडला, त्यामुळे तो जबरदस्त तडाखा त्याच्या खांद्यावर बसला. तो खाली कोसळला. त्याचा खांदा मोडला होता. इतक्या मोठ्यानं तो किंचाळत होता की, सगळ्यांना आधी त्याच्याकडेच लक्ष पुरवावं लागलं. त्याला उचलण्यात आलं. डॉन ग्रेगरिओ मदतीसाठी ओरडत होता. सगळे कामगार जवळच्या कार्यालयांमधून धावत आले. कमांडर, दोन पोलीस आणि नुकताच शुद्धीवर आलेला गार्ड यांची आणि धावत आलेल्या लोकांची खडाजंगी सुरू झाली. मी बाजूलाच राहिलो. त्यांच्यातच गुद्दागुद्दी चालली. बऱ्याच जणांना थोड्या फार जखमा झाल्या. ज्याला किंचितही धक्का लागला नाही अशी व्यक्ती फक्त एकच होती–ती म्हणजे मी. गव्हर्नर आणि कमांडर यांच्यातील अनपेक्षित युद्धामुळे मी बचावलो. डॉनला हॉस्पिटलात हलवण्यात आलं. मला बाहेर पटांगणात नेण्यात आलं. 'तुझ्याकडे नंतर बघू.' साहाय्यक गव्हर्नर म्हणाला.

दुसऱ्या दिवशी खांदा प्लॅस्टरमधे अडकवून गव्हर्नर कामावर हजर झाला. त्यानं मला कमांडर विरुद्ध लेखी निवेदन देण्यास सांगितलं. त्याला जसं हवं होतं तसं मी आनंदानं दिलं. झोपेच्या औषधाची कथा संपूर्णपणे दुर्लक्षित झाली. त्यात आता कोणालाच रस वाटत नव्हता–माझं नशीब जोरावर होतं, दुसरं काय ! ईश्वरानं अशा प्रकारे माझं रक्षण केलं.

रात्रीच्या वेळी पळून जाणं अशक्य होतं. भिंतीवरच्या दिव्यामुळे बारीकशी हालचालही लपू शकत नव्हती. ते दिवेच बंद पाडले तर ? उत्तम. नवीन योजना तयार झाली. चर्चसमोरील आणि रस्त्याच्या बाजचा असे दोन रक्षक विकत घेणे. गव्हर्नरला दोन हजार पेसो 'आग्रहानं' स्वीकारायला लावून तेच रक्षक रात्री पहाऱ्यावर असतील अशी व्यवस्था करणे. त्या दोघांना अर्थातच पैसे द्यावे लागणारच. पूर्वीसारख्या अर्ध्या नोटा आधी देऊन, फत्ते झाल्यावर त्यांचा राहिलेला भाग द्यायचा. आणि इतर आवश्यक त्या सर्व काळज्या घ्यायच्या. तरी या योजनेच्या तयारीत महिना उलटलाच. अपेक्षेप्रमाणे सर्व काही जुळून आलं. फक्त दोन लोकांना जाण्याची परवानगी मिळाली. इलेक्ट्रिशियननं जबाबदारी पत्करली.

ठरलेल्या वेळी दिवे गेले. एक गोष्ट सांगायची विसरली. कोठडीचे गज रक्षकाच्या उदार दुर्लक्षामुळे आधीच कापून ठेवले होते. आम्ही गज बाजूला वाकवून बाहेर आलो. अंगात काळे कपडे चढवले होते. मी जोन्सला बरोबर घेतलं होतं. दुसरा माणूस कोण न्यावा–जोन्स की मॅच्युरेट–हे ठरविण्यासाठी नाणेफेक केली होती. जोन्स जिंकला. अली मागोमाग आलाच. कमरेच्या छोट्या आणि काळ्या टॉवेल-खेरीज त्याच्या अंगावर एकही कपडा नव्हता. दबकत दबकत भिंती-पर्यंत जाऊन पोचलो. नवा दोर आणि हूक मिळवण्यात काहीच अडचण आली नव्हती. पहिल्या फेकीतच हूक वर अडकला. किंचितही आवाज न करता मी भिंतीच्या वर जाऊन पोचलो. फक्त तीन मिनिटं लागली. आडवं पडून मी जोन्सची वाट पाहू लागलो. काळाकुट्ट अंधार पसरला होता. इतक्यात एक हात वर पकड घेण्याचा प्रयत्न करीत असल्याचं मला जाणवलं. मी हात देऊन जोरात ओढलं. एक विचित्र आवाज झाला. तो होता जोन्सच, पण त्याची विजार कशाला तरी अडकली होती. बहुधा धातूचा तुकडा किंवा खिळा असावा. भिंतीवर घासल्यानं त्याचा मोठा आवाज झाला. रात्रीच्या शांततेमधे तरी तो मोठा वाटला. मी पुन्हा जोर देऊन जोन्सला कसंबसं वर ओढलं.

आमच्या विरुद्ध बाजूच्या रक्षकानं फैरी झाडल्या. जवळचा शांत होता. बंदुकीच्या आवाजानं गांगरून जाऊन आम्ही रस्त्याच्या भलत्याच ठिकाणी उड्या टाकल्या. म्हणजे तीस फूट उंचावरून. योग्य जागी उडी टाकली असती तर पंधरा फुटावरच पहिला उत-वटा होता. परिणाम : जोन्सचा उजवा पाय पुन्हा मोडला. मलाही उठता येईना–माझे दोन्ही पाय दुखावले होते. त्या वेळपर्यंत पहारे-करी रस्त्यावर येऊन पोचले. आमच्यावर बंदुका रोखून चेहेऱ्यावर टॉर्चचा प्रकाश सोडला. अपयशामुळे बेभान होऊन मला तर रडूच फुटलं. त्याहूनही दुःख या गोष्टीचं झालं की, मला उठता येत नव्हतं, यावर पहारेकऱ्यांचा विश्वासच बसला नाही. शेवटी गुडघ्यावरून फरफटत मी पुन्हा तुरुंगात शिरलो. जोन्स एका पायानं लंगडत होता. माझ्या डोक्यावर बंदुकीच्या दस्त्याचा जबरदस्त फटका बसल्यामुळे तिथून रक्तस्राव होत होता.

बंदुकीच्या आवाजामुळे डॉन ग्रेगरिओ जागा झाला होता. रात्री तोच ड्यूटीवर असल्यामुळे तो ऑफिसमध्ये झोपला होता, एवढं तरी आमचं नशीब. त्याच्या जागी दुसरा असता तर संगिनीनं भोसकूनच त्यांनी आम्हाला ठार केलं असतं. डॉननं तो प्रकार थांबवला. त्यानं उलट पहारेकऱ्यांनाच दम दिला की आम्हाला फार जखमी केलं तर त्यांना कोर्टापुढे उभं करण्यात येईल. या जादूच्या शब्दांनी त्यांची सारी शक्तीच नष्ट झाली.

दुसऱ्या दिवशी जोन्सचा पाय प्लॅस्टरमध्ये बांधण्यात आला. माझे पाय डोक्याएवढे सुजले होते आणि लालबुंद झाले होते. मिठाच्या पाण्यात पाय धुऊन दिवसातून तीन वेळा त्यांना जळवा लावण्यात आल्या. डोक्याच्या जखमेला सहा टाके घालावे लागले.

बातम्यांच्या शोधातच असलेल्या एका वार्ताहरानं माझ्यावर एक सनसनाटी लेख तयार केला. त्यानं लिहिलं की चर्चमधील उठावाचा मीच म्होरक्या होतो. पहारेकऱ्यास विष घालण्याचं अपकृत्य माझंच

आणि नव्या योजनेचा सूत्रधारही मीच. माझे बाहेर नक्कीच हस्तक असले पाहिजेत. 'या एक नंबरच्या बदमाशाला फ्रान्सनं ताबडतोब आमच्या देशातून हलवावं' असा त्यानं लेखाचा समारोप केला.

जोसेफ भेटायला आला. त्याच्याबरोबर त्याची बायको—ॲनी—होती. राहिलेल्या अर्ध्या नोटा मागच्या योजनेत मदत करणारे पहारेकरी मागत होते. ॲनीनं काय करायचं असं विचारलं. मी देऊन टाकायला सांगितलं. त्यांनी आपला शब्द पाळला होता. आम्ही अयशस्वी झालो यात त्यांचा काही दोष नव्हता.

पंधरा दिवसांनी पायाची सूज निम्म्यावर आली. पायाचा एक्स-रे काढल्यावर समजलं की घोटयाजवळची हाडं मोडली होती.

आजच्या वर्तमानपत्रात बातमी आली—महिनाअखेरीस आम्हाला नेण्यासाठी 'माना' नावाचं फ्रेंच जहाज येणार होतं. आज बारा ऑक्टोबर. शेवटचा प्रयत्न करण्यासाठी अद्याप १८ दिवस बाकी होते. पण पाय मोडलेल्या स्थितीमध्ये काय प्रयत्न मी करू शकणार?

थोडयाच दिवसांत मी फ्रेंच सरकारच्या ताब्यात जाणार म्हणून जोसेफ खिन्न झाला होता. सुटकेसाठी अविश्रांत धडपड करूनही मला यश आलं नव्हतं. गावातल्या स्त्री-पुरुषांना माझ्या भवितव्याबद्दल चिंता लागली होती. त्यांचा मला नैतिक पाठिंबा असलेला पाहून मलाही खूप धीर आला.

पूर्वीच्या योजनेप्रमाणे कोलंबियन पोलिसाला ठार करण्याची कल्पना मी सोडून दिली होती. ज्यानं माझा कोणताही अपराध केला नाही किंवा मला किंचितही त्रास दिला नाही त्याला मारण्याचा मला काय अधिकार? त्याच्यावर आईवडिलांची किंवा बायकामुलांची जबाबदारी असणारच. गमतीत मी असा विचार केला की, आपण असा एखादा दुष्ट स्वभावाचा पोलीस शोधून काढावा, ज्याच्यावर कोणाचीही जबाबदारी नाही. 'मी जर तुला ठार केलं तर कोणाला दुःख होईल का?' असं त्याला विचारावं.

१३ ऑक्टोबर. मला पिक्रिक ॲसिडचे स्फटिक मिळाले. ते जर खाल्ले तर कावीळ होणार होती. हॉस्पिटलमध्ये दाखल होता आलं तर जोसेफकरवी लाच देऊन पळण्याचा मार्ग निघण्याची शक्यता होती. मी ॲसिड गिळून टाकलं. दुसऱ्या दिवशी मी लिंबाहून पिवळा पडलो. गव्हर्नर मला बघायला आला. कसलीही काळजी न करता मी सरळ त्याला म्हणालो, 'मला हॉस्पिटलमध्ये पाठवलं तर दहा हजार पेसो तुमचे होतील.'

'फ्रेंच गृहस्था, मी प्रयत्न करीन. पैशाकरता नाही, पण तुझी सुटकेची अखंड धडपड आणि त्यात आलेलं अपयश पाहून. फक्त मला भीती एवढीच वाटते की, वर्तमानपत्रातल्या त्या लेखामुळे ते तुला हॉस्पिटलात ठेवून घेतील की नाही हे सांगता येत नाही.'

एक तासानंतर मला हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. माझं शरीर आणि लघवी काळजीपूर्वक तपासून दोन तासांच्या आत मला पुन्हा कोठडीत रवाना करण्यात आले. हाही उपाय निरुपयोगी ठरला.

एकोणीस ऑक्टोबर. जोसेफची बायको मला भेटायला आली. तो गुरुवार होता. जोसेफचे माझ्यावर महदुपकार होते. ती माणसं माझ्याशी अत्यंत जिव्हाळयानं वागत—वरवरच्या नाही तर मनापासून. मला मदत करताना त्यानं स्वतःचं समाजातील स्थान आणि अगदी स्वातंत्र्यही धोक्यात टाकलं होतं.

ॲनीनं मला एक कल्पना सुचवली. बोलता बोलता ती म्हणाली, 'प्रिय पॅपिलॉन, स्वतंत्र होण्यासाठी तू दुसऱ्याला कमीत कमी त्रास व्हावा म्हणून झटलास, पण तुला नशिबानं साथ दिली नाही. आता फक्त एकच प्रयत्न शिल्लक राहिला आहे—हा तुरुंगच उडवून लावणे.'

'जरूर. का उडवून लावू नये? हा तुरुंग जुनाच तर झालाय. तसं केलं तर कोलंबियावर एक प्रकारे उपकारच केल्यासारखे होतील. मी तुरुंग नष्ट केला म्हणजे तरी ते नवा तुरुंग बांधतील.'

निरोप देताना मी तिला सांगितलं की 'रविवारी जोसेफला माझ्याकडे पाठव.'

२२ तारखेला जोसेफ आला. 'हे बघ, वाट्टेल ते करून मला एक डायनामाईटची कांडी, एक डिटोनेटर आणि फ्यूज आणून दे. अगदी आकाशपाताळ एक करायला लागलं तरी चालेल, पण गुरुवारी या वस्तू माझ्यापर्यंत पोचल्या पाहिजेत. तोपर्यंत मी भोक पाडण्यासाठी एक ड्रील पैदा करतो.'

'तुझा विचार तरी काय आहे.'

'मी भरदिवसा हा तुरुंग हवेत उडवणार आहे. पाच हजार पेसो देऊन भिंतीपलीकडे गाडी तयार ठेव. ती रोज सकाळी आठ ते संध्याकाळी सहापर्यंत बाहेर उभी राहिली पाहिजे. या प्रयत्नाला यश मिळालं नाही तर रोज पाचशे पेसो आणि मिळालं तर आणखी पाच हजार पेसो देण्याची माझी तयारी आहे. डायनामाईटमुळे भिंतीत पडलेल्या भोकातून मी एका बळकट कोलंबियन कैद्याच्या पाठीवरून टॅक्सीपर्यंत येईन—पुढचं पुढे. गाडी तयार राहणार असेल तर आत कांडी पाठव: नाहीतर, नाहीतर तोच शेवट—सर्व प्रयत्नांची अखेर, आणि पुन्हा आशेला स्थान नाही.'

'काळजी करू नकोस, मी सर्व काही जमवून आणतो.'

[ क्रमशः ]

---

'तू मास खाणाऱ्या मुंग्या पाहिल्यास का, पॅपिलॉन?'
'अजून तरी नाही. फक्त मोठ्या काळ्या मुंग्या पाहिल्यात.'
'त्या खूप छोटया असतात, अगदी रक्तासारख्या लाल.'
मांसाचे अगदी सूक्ष्म कण घेऊन वारुळाकडे जातात.
आम्हाला त्या अरबानं फार छळलं, ठीक आहे, पण
त्यालाही किती यातना सहन कराव्या लागल्या असतील
याची तूच कल्पना कर. हजारो मुंग्यांनी त्याला जिवंत
खाल्लं. दोन आख्खे दिवस आणि एक सकाळ इतका वेळ
त्यानं मरण्यासाठी घेतला. चोविस तासाच्या आत तर
त्याचे डोळेही ठिकाणावर राहिले नव्हते.
'मला मान्य आहे की सूड घेताना आम्ही निर्दयपणे
वागलो. पण त्यानंही आमचे काय हाल केले होते हे
विसरून चालणार नाही.'

## फ्रेंच गियानाला परत

**पुढील अंकी**

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

## १२-४-७५ ते १८-४-७५

### महाराष्ट्राचे राजकारण देशभर गाजेल

मेष चंद्राच्या भ्रमणावर गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर या आठवड्याची सुरुवात होत आहे. दि. १४ ला रवीदेखील मेष या उच्चराशीत प्रवेश करीत आहे. हे ग्रहमान तसे प्रतिकूल नाही. पण महाराष्ट्राच्या अंतर्गत जीवनात मात्र असंतोष व अस्वस्थता धुमसू लागणार आहे. मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण लोकमतावर प्रभाव पाडणारी एखादी महत्त्वाची घोषणा करतील, पण त्याबद्दल लोकांत फारसा उत्साह राहणार नाही. बेळगाव सीमाप्रश्न वातावरणात तरंगेल व पुन्हा लुप्त होईल. महाराष्ट्राच्या राजकारणातली एखादी झलक देशभर चर्चेचा विषय होईल. राजधानी दिल्लीत प्रभाव वाढेल. बिहार नेतृत्वात बदलाची वेगवान चाके फिरू लागतील. अमेरिका-भारत संबंधात थोडा अनुकूल बदल होईल.

**मेष : चिंता निवारण होईल.**

मेष राशीच्या व्यक्तींना तशी कोणतीच चिंता नाही. जर असली तर ती निवारण होईल. बारावा गुरू वाईट नाही. तो पैसा खूप खर्चायला लावील, पण तो चांगल्या कारणासाठी लावील. यावेळी सोमवार ते बुधवार हे दिवस उपासनेच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहेत. एखादी चारित्र्यसंपन्न पारमार्थिक व्यक्ती तुम्हाला काही सुविचार देईल. तो मुद्दाम ग्रहण करा. त्यामुळे मन व आत्मा आनंदी राहील. या आठवड्यात मनात आशाआकांक्षाची खूपच गर्दी होईल. ही चांगली की ती चांगली असा गोंधळही उडेल. पण आठवडा सर्वसाधारण चांगला जाईल. नोकरीतील एखादे जुने महत्त्वाचे काम यशस्वी होऊन जाईल. नव्या उद्योगाची मुहूर्तमेढ घातली जाईल. संसारात नवचैतन्य राहील. महिलांचे आर्थिक मनोगत पुरे होतील. विवाह लांबणीवर पडेल. शुभांक २-४-५.

**वृषभ : नोकरीत बदल**

या आठवड्यातील सोमवार व मंगळवार विशेष महत्त्वाचे आहेत. रेंगाळत राहिलेली अनेक कामे यावेळी मार्गी लागतील. कोर्टातील वाद तडजोडीने मिटण्याची चिन्हे दिसू लागणार आहेत. अनेक दिवस मनात घोळत असलेल्या एका कामासाठी प्रवास घडणार आहे. विशेष करून हा प्रवास सागरीकडेने होईल. नोकरीधंद्याची परिस्थिती समाधानकारक राहील. विशेष करून नोकरीत महत्त्वपूर्ण असा बदल घडेल. हा बदल स्थैर्याच्या दृष्टीने मोठा सूचक ठरावा. आज गुढीपाडव्यापासून आपले जीवन सुधारू लागणार आहे. पैसा, प्रतिष्ठा, यश, महत्त्वाकांक्षापूर्ती असे सारे काही महत्त्वपूर्ण ठरावे. तरुणवर्गाने डोकी शांत ठेवण्याची गरज आहे. महिलांच्या कार्याला चालना मिळणार आहे. शुभांक ४-६-७.

**मिथून : वाङ्मयात मोठेपण**

आज भारतीय संस्कृतीच्या नव्या वर्षाची सुरुवात होत असून त्याचवेळी आठवडा सुरू होत आहे; ही तुमच्या दृष्टीने फारच महत्त्वाची घटना होय. तुम्ही आज कोणती योजना आखाल व कोणता उद्योग सुरू कराल तो आगामी काळात भरभराटीत येणार आहे, हे निःशंक होय. मेष राशीच्या चंद्रावर राक्षसनाम संवत्सराची सुरुवात तुमच्या लाभस्थानी होणे म्हणजे भरभराट, आर्थिक समृद्धी, उद्योगांत प्रगती, वाङ्मयीन कर्तृत्वाने मोठेपणा असे काही तरी घडेल. तुम्ही लेखक असाल तर एखाद्या नव्या कलाकृतीची सुरुवात यावेळी होईल. लेखक नसाल तर तुम्ही लेखक बनणार आहात. तरुणवर्गात उत्साहाचे वारे संचारेल मुलाचे लग्न ठरेल. महिलांना वरच्या क्षेत्रात नोकरी मिळेल. शुभांक ६-७-११.

**कर्क : भाग्योदयकारक पहाट**

भाग्यस्थानी मेषेचा चंद्र व त्याचबरोबर नव्या वर्षाची सुरुवात म्हणजे तुमच्या आगामी काळातील भाग्यकारक घटनांची नांदीच होय. आता शनीचा त्रास असून नसल्यासारखाच आहे. जे मनात आणाल ते करून दाखवण्याचे कर्तृत्व तुमच्या ठायी संचारणार आहे. तुम्ही नोकरीच्या फंदात पडणारच असाल तर युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशन वा महाराष्ट्र पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या उच्च श्रेणीच्या नोकरीसाठी प्रयत्न करा. यश पदरात पडेल. रसायन, विज्ञान, वाणिज्य व कृषितज्ज्ञ यांना हा आठवडा फार मोलाचा ठरणार आहे. त्यांना आवडते असे काम त्यांना मिळणार आहे. रविवार ते बुधवार विवाहेच्छूंचे विवाह ठरतील. विद्यार्थी वर्ग परीक्षेत मोठे यश मिळवील. महिलांपैकी वृद्धांना तीर्थयात्रा घडेल तर मध्यमवयीन स्त्रिया नोकरीत कर्तृत्व दाखवतील. शुभांक ४-५-१०.

**सिंह : सुरुवात उत्तम होईल**

रवी व चंद्र हे या आठवड्याचा पूर्वार्ध गाजवून सोडणार आहेत. विशेषतः नव्या वर्षाची सुरुवात भाग्यस्थ चंद्राने होत आहे; ही घटनाच मुळी तुमच्याबाबतीत क्रांतिकारक ठरावी. दि. १४ चा रवीचा मेष राशीत प्रवेश तुमचे सर्वत्र क्षेत्रांतील यश निश्चित करणार आहे. विशेष करून तुम्ही राजकारणात एकदम आघाडीवर चमकाल. तुमच्या विरोधकांच्या कारवाया हाणून पडतील. तुमचे गुणगान गाण्याची त्यांच्यावर पाळी येईल. या वेळी दूरचा व दीर्घ असा प्रवास घडेल. उद्योगात नव्या योजनेला योग्य असा प्रतिसाद मिळू शकेल. अनेक प्रकारच्या अडचणींवर मात होईल. औषधी उद्योग एकदम तेजीत येऊन भरपूर नफा मिळेल. तरुण उद्योगपतींना सरकारी प्रोत्साहन मिळू शकेल. त्यांच्यापैकी एखादा सरकारी कृपेस पात्र राहील. विद्यार्थी वरवर पास होईल. महिलांनी उद्योग सुरू केला तर पैसा मिळेल. शुभांक ७-१०-११.

**कन्या : अनपेक्षित अर्थलाभ**

गुढीपाडवा मेष राशीत अष्टमस्थानी उगवत आहे तर दि. १४ ला रवीदेखील तसाच येत आहे. चंद्र-रवी अष्टमस्थानी उन्हाळा व थंड या दोहोंपासून तब्येतीला कुरकुरायला लावणार आहे. पण एवढा त्रास सोडला तर हा आठवा ग्रहयोग आर्थिक समृद्धीचे सुचिन्ह ठरणार आहे. पुष्कळ दिवस वसूल होत नसलेले पैसे वसूल होतील. बुडणार म्हणून तुम्ही आशा सोडलेले पैसेदेखील वसूल होऊ लागतील. प्रामुख्याने लॉटरीत अगर रेसमध्ये तुम्ही अवश्य भाग घ्या. एकदम दारिद्र्य संपेल. तुम्ही 'राजे' होणार नसलात तरी 'प्रधानपद' तर नक्कीच मिळवू शकाल. नोकरीत काही मागण्यांबद्दल वरिष्ठांकडून सहानुभूती मिळेल, विचार

होईल. चालू नोकरीत कामाचा ताण खूपच वाटणार आहे. पण ते सुसह्य होण्याइतपत मन प्रसन्न व उत्साही राहील. महिलांना पतिराजांकडून नवे कापड व साड्या मिळणार आहेत. शुभांक ७–८–१०.

**तूळ : संसारात समाधान**

आपल्या नव्या वर्षाची सुरुवात आज गुढ्या उभारून होत आहे. चंद्र मेष राशीत म्हणजे आपल्या सातव्या स्थानी उदित आहे. ही ग्रहपरिस्थिती प्रामुख्याने तुमचे कौटुंबिक व सांसारिक जीवन सुखाचे घडावे यासाठीच आहे. भावाभावात समंजस्य निर्माण होईल, मतभेद वा भांडणे मिटतील. पत्नी अगर अगर पती, मुले एकोप्याने वागतील. सुख आणि शांती यांचे मूर्तिमंत रूप तुमच्या संसारात दिसेल. ज्यांच्या हृदयात 'कसेसे' होत आहे त्यांना या आठवड्यात प्रतिसाद मिळणार आहे. प्रेम सफल होईल. तरुण मुलेमुली कलाक्षेत्रात आपला पराक्रम दाखवू शकतील. अभिनयगुणांना वाव मिळेल. जुन्या नोकरदारांना, प्रामुख्याने सरकारच्या महसूलखात्यातील नोकरांना व बांधकाम खात्यातील नोकरांना पगारवाढ मिळेल. आकाशवाणीच्या कलाकारांबद्दल सरकारात सहानुभूती निर्माण होईल. महिलांना त्यांच्या कार्याची योग्य पावती मिळेल. शुभांक ५–६–१२.

**वृश्चिक : आकांक्षा फुलतील**

आज शनिवार आपणास अत्यंत शुभदायक आहे. आपण शेतीविषयक, खत वा शेती-अवजारे याचा एखादा लहानमोठा उद्योग आज सुरू करा. अगदी नजीकच्या काळातच त्याला साफल्याची, फायद्याची गोड फळे येऊ लागतील. चालू उद्योगात एखादा धाडसी प्रयोग करू शकाल. सोमवार ते बुधवार नोकरीत स्पर्धा होईल. पण तुमचे म्हणणे वरिष्ठांना पटून एखादी जबाबदारी तुमच्याकडे चालत येईल. शेतीपदवीधर, संशोधक यांना उत्तम दर्जाची नोकरी मिळेल. उद्योग अगर नोकरीव्यवसाय यांतील तुमच्या सुप्त आशाआकांक्षा यावेळी फुलतील, बहराला येतील. नवे वर्ष अडचणीचे नाही. पण संधीचा योग्य फायदा घेतला तरच ते फायद्याचे ठरेल. प्रौढ अगर तरुण विवाहेच्छू व्यक्तींनी निदान हा आठवडा तरी लग्नाचा विचार करू नये. महिलांना राजकीय नेत्याकडून मोठा मान मिळेल.शुभांक ६–१०–११.

**धनू : गौरव होईल.**

गुरुच्या वर्चस्वाची तुमची रास आहे. सध्या राशीस्वामी सुखस्थान भूषवीत आहे. नव्या वर्षाच्या सुखाची नांदी ठरणारा गुढीपाडवा पंचमस्थानी मेष लग्नावर पडत आहे, ही फारच आशादायक घटना होय. हा एक अविस्मरणीय असाच योग म्हणावा लागेल. तुमच्या घरात बऱ्याच अवधीनंतर पुत्रजन्माचा आनंदसोहळा तुम्ही अनुभवू शकाल. परीक्षेत अनपेक्षित, श्रेष्ठ दर्जाचे यश या राशीच्या विद्यार्थ्यांच्या पदरात पडणार आहे. कोणत्याही क्षेत्रात नोकरी करीत असलेल्या व्यावसायिकांना उच्च अधिकाराच्या परीक्षा देण्याची संधी मिळणार असून, त्यात ते यशस्वी होतील. बेकारांच्या डोक्यावर अनिश्चितपणाची टांगती तलवार या आठवड्यात दूर होईल. त्यांना त्यांच्या इच्छेप्रमाणे धंदा अगर नोकरी मिळेल. विवाहाला मात्र अनुकूलता नाही. राहत्या जागेचा प्रश्न समाधानकारक सुटेल. महिलांना माहेरची प्रॉपर्टी व संपत्ती मिळेल. शुभांक ४–६–७.

**मकर : सुखाचा स्पर्श होईल.**

आठवड्याची सुरुवात सुखस्थानच्या गुढीपाडव्याने होत आहे ही तुम्हाला समाधान देणारी घटना होय. अनेक प्रकारे तुमचे अस्वस्थ होणारे मन या आठवड्यापासून नियंत्रणाखाली येईल. अंतःकरणात प्रकाश दिसेल. कोणत्याही कामात उत्साह वाटेल. जुना आजार वा अशक्तपणा कमी होऊ लागेल. घरातील त्रास व अडचणी दूर होण्यास अनुकूल वातावरण तयार होईल. खूप दिवस दुरावलेले मातृसुख गवसेल. बंगला अगर फ्लॅटमध्ये प्रवेश करायला हा आठवडा अनुकूल आहे. दि. १४ रोजी रवी मेष राशीत उदित होत आहे. त्या वेळी अनेक चांगल्या घटना घडू शकतील. अनेकांच्या नोकऱ्या कायम होतील. नोकरीतील अस्थिरपणा दूर होईल. शेतजमिनीच्या खरेदीविक्रीचा व्यवहार फायद्याचा होईल. जवळपासचा प्रवास होईल. सूतगिरणी, वर्कशॉप, फर्निचर इत्यादी उद्योगांत काम करणारे मालक अगर नोकर समाधानी होतील. त्यांना पैसा मिळेल. नोकरीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा उत्तम प्रशासक म्हणून नावलौकिक वाढेल. आर्थिक परिस्थिती मात्र जेमतेमच राहील.

महिलांना उद्योगाची गुरुकिल्ली सापडेल. घरात मान वाढेल. शुभांक ५–७–१०.

**कुंभ : धंद्याचा व्याप वाढेल.**

आज गुढीपाडवा असून तिसऱ्या स्थानी मेष राशीत चंद्र आहे. तुमचा धंदा भरभराटणार आहे, याचीच ही खूण समजा. सौंदर्यप्रसाधनाचा व्यापार, कापडविक्री, नाटक, चित्रपटाची कॉंट्रॅक्टस, मैफलीचे मक्ते लाभदायक ठरतील. खूप दिवस तुमच्या मनात नवी गृहसजावट करायची होती, नवे फर्निचर घ्यायचे होते, पण पैशाअभावी ते जमत नव्हते. या आठवड्यात मात्र ते जमणार आहे. धंद्यासाठी परदेशी प्रवास घडण्याची शक्यता आहे. या आठवड्यात तुम्हाला सज्जन कलावंत व सुसंस्कृत असे मित्र भेटतील. भावी काळात धंद्याचा व्याप वाढवण्याच्या दृष्टीने त्यांचा उपयोग होईल. नोकरीत तसे वाईट नाही. वरिष्ठांकडून बोलणे खावे लागले तरी ते फारसे मनावर घेऊ नका. लग्नाचा विचार पुढे ढकला. महिलांनी नको त्या विचारात गढून राहू नये. शुभांक ४–६–१०.

**मीन : सामर्थ्याचा प्रत्यय**

राशीस्वामी राशीत ही एकच गोष्ट तुमच्या बाबतीत महत्त्वाची आहे. नोकरीधंदा, वाचन, चिंतन, मनन, कला इत्यादी सर्व क्षेत्रांत तुमचा दबदबा निर्माण होईल. अनेक लोकांच्या मनात तुमच्याबद्दल आपुलकी वाढू लागेल. मित्रांचे सहकार्य मिळू शकेल. सोमवारी नोकरीबद्दलची मुलाखत होईल. विज्ञानपदवीधर, शेतीपदवीधर यांना जास्त अनुकूलता आहे. धनिक मित्रांचा सहवास लाभेल. तुम्ही जर कलावंत असाल तर या आठवड्यांत दि. १४ नंतर तुम्हांला अनपेक्षित पैसा, कीर्ती मिळेल. आकाशवाणीवर नाव गाजेल, राजकारणात तुमचे मन रमणार नाही. पण अशी एखादी मोठी व्यक्ती तुमच्यावर खूष राहील. अनेक दिवस लांबणीवर पडत असलेले विवाह यावेळी पार पडतील, कोर्टकचेरीतील कामात काळजी घ्यावी लागेल. महिलांना दूरची तीर्थयात्रा अनपेक्षितरित्या घडेल. शुभांक ६, ७, १०.

□ □

# माझे दिवस संपले

## टुणटुण

'या दोघी म्हणजे दहाचा आकडा... ' शबाना आझमी आणि टुणटुण यांना एकत्र पाहून कुणीतरी तो सुपरिचित (पाठभेद : शिळा) विनोद ' टाकला. ' फार फार पूर्वी, हॉलिवूडमध्ये मेरिलिन मन्रो आणि कॅथरिन हेप्बर्न यांचा एकत्र फोटो घेण्याचा प्रसंग आला, तेव्हा म्हणे ही उक्ती जन्माला आली आणि तेव्हापासून वेळ मिळेल तेव्हा ताणून ताणून ती वापरली जाते.
जिला कधीही डाएट करावं लागत नाही म्हणून इतर नटयांकडून हेवा केली जाणारी, लठ्ठपणा हे भांडवल असलेली टुणटुण सध्या जरा फिकिरीत पडलीय. (अर्थात या फिकिरीमुळे वजन घटण्याची भीती तिला अज्जीबात वाटत नाही, ही गोष्ट वेगळी.) कारण...कारण तिच्या मते म्हणे प्रेक्षकांची अभिरुची सुधारते आहे. लठ्ठ शरीराचे अंगविक्षेप, ही विनोदाची जुनी व्याख्या त्यांना दिवसेंदिवस नामंजूर होत चालली आहे. साहाजिकच अवाढव्य शरीरविस्तार असलेली टुणटुणच नव्हे, तर तिच्या विजातीय हास्य-भाईबंदांना चिंता उत्पन्न झाली आहे.
चित्रसृष्टीत एखाद्यावर एक शिक्का पडला की तो पुसला जाणं हे मह्रा कठीण कर्म ! एकेकाळच्या नायक–नायिका निदान चरित्र-भूमिका मिळवू शकतात. पण विनोदी नट–नटींना असे सांधे बदलणं फार कठीण जातं. टुणटुणचं हे म्हणणं खोटं नाही. एके-काळी डझन डझन करार हातात असणाऱ्या टुणटुणला आज नियमितपणे तीन–चार चित्रपट मिळणंही महाग होऊन बसलं आहे. एखाद्या विधवेची वा आईची प्रौढ, गंभीर भूमिका करायची तिची तयारी आहे. पण अशा सौम्य भूमिकेत टुणटुणला पाहणं प्रेक्षकांना पसंत पडेल की नाही, याची निर्मात्यांना खात्री वाटत नाही. नाही म्हणायला एका आगामी चित्रपटात टुणटुण आई म्हणून दिसेल–तीही असरानीची आई म्हणून ! यावरून त्या भूमिकेचं स्वरूप लक्षात यावं !

' माझे दिवस संपले ' – अशी स्वच्छ कबुली आज टुणटुण देते. मात्र टुणटुणला बसलेला हा पहिला धक्का नव्हे. मनोरमासारखी जुन्या जमान्यातली देखणी नटी, भरपूर शरीरवृद्धी झाल्यावर तिनं बिनदिक्कत टुणटुणच्या पावलावर (आणि पोटावरही) पाऊल ठेवलं. निर्मात्यांना काय, आणखी एक गरगरा डोळे फिरवणारी, वेळप्रसंगी असहाय पुरुषावर हात टाकणारी विनोदी म्हणा, की खल म्हणा, नटी मिळाली. शिवाय मनोरमेचा देह तुलनेनं टुणटुणपेक्षा बरा. हां हां म्हणता मनोरमेनं टुणटुणची जागा घेतली. (की व्यापली म्हणणं योग्य ठरेल ?) मनोरमामाहात्म्य इतकं वाढलं, की गुलजारच्या संवादात देखील तिचा उल्लेख व्हावा ! ' आंधी 'मधला तो प्रसंग आठवतोय ना ? आपल्या भावी अपत्याचं नाव काय ठेवायचं, याची नायक–नायिकेत

पृष्ठ ३३ वर

## नरेंद्र–चंचल

मनेहरूनंतर कोण ' हा प्रश्न पूर्वी जितका वाजत गाजत चर्चिला जायचा, तसा चित्रसृष्टीत सध्या एकच सवाल गरजतो आहे : लता–आशांना प्रतिस्पर्धी कोण ? त्यांच्या ' नंतर ' कोण म्हणायचं धाडस अर्थातच इयल्या ,डळींना होत नाही. पण चक्क थोडंसं जातीयवादी व्हायचं तर, या दोघींनी अमराठी मंडळींची झोप हैराण केली आहे, हे पाहून गुदगुल्या होतात खऱ्या. लता–आशांना शह कोण, हा प्रश्न शिरा ताणून चर्चिला जातो. पण किशोरकुमारच्या मक्तेदारीला मात्र या मंडळींची हरकत नाही.
असो. हे सगळं आठवलं ' मेहबूब स्टुडिओ 'मध्ये एक रेकॉर्डिंग ऐकताना. गाण्यात वाद्यांचा गदारोळ नव्हता आणि थांबताच ऐकू येणारा आवाज हा ऐन उमेदीतल्या महंमद रफीच्या गळ्याच्या जातीचा वाटत होता. ' हा कोण सांप्रति नवा पुरुषावतार ' म्हणून पृच्छा केली आणि तिला जे उत्तर मिळालं, ते ऐकून जबर धक्का बसला. जे. ओमप्रकाशनं किंवा मोहनकुमारनं ' अ 'पासून सुरू होणारं शीर्षक–परंपरा सोडली, तर जेवढा धक्का बसेल, तसाच हा धक्का. ज्याचं साधं बोलणं देखील ' काळी–पाच 'मध्ये (माहिती बरोबर आहे ना हो ?) असेल, असं वाटणारा गगनभेदी आवाजाचा आणि गगनचुंबी ख्यातीचा ' बॉबी ' फेम नरेंद्र चंचल साक्षात सदेह हे गाणं गात होता. ' दिलको समझे एक खिलौना ' हे गाण्याचे बोल. गाणं संपूर्ण ऐकलं. नरेंद्र अधून मधून आपल्या जातीवर जातच राहिला–म्हणजे मध्येच कुठेतरी टाचणी लावल्यासारखा ओरडत राहिला. एवढा खटकणारा भाग सोडला, तर बऱ्याच दिवसांनी एक साधं आणि श्रवणीय गाणं ऐकल्याचं समाधान मिळाल. जागेअभावी त्याचा सविस्तर तपशील पुन्हा केव्हातरी. ◻

# झिलमिल सितारे

अरुणा अंतरकर



सफर, सरस्वतीचंद्र, अनोखी रात, उपकार
या चित्रपटांचे गीतकार इंदीवर

मेहबूब स्टुडियोत रेकॉर्डिंगच्या वेळी............




संगीत दिग्दर्शक चांद परदेशी

गायक नरेंद्र चंचल

आणि निर्माता सुलतानिया

# मराठी चित्र

## 'करावं तसं भरावं'



मराठीत देखील आता हा प्रकार
यायला लागला बरं का!
अरूण सरनाइकनं त्या काडीपैलवानाला
असं का उचललं आहे ते 'करावं तसं भरावं'
मध्ये कळेल. आणि त्यासाठी
जास्त वाट पहावी लागणार नाही.
या महिन्यातच तो सर्वत्र प्रदर्शित होतो आहे.
या रहस्यप्रधान चित्रपटाची कथा-पटकथा
सुप्रसिद्ध लेखक श्री. यशवंत रोजणकरांनी
लिहिली आहे.



नृत्याचा अभिनव प्रकार!
घड्याळाच्या तालावर
'यशवन्त-विलास' चित्रच्या
'करावं तसं भरावं' मध्ये
उषा-चव्हाण.

# 'चंदनाची चोळी अंग अंग जाळी'



संध्याची एक नृत्यमुद्रा

चंदनाची चोळी - अंग अंग जाळी.....
तो हाच प्रकार काय ?



'माझे दिवस संपले आहेत.' टुणटुण.

कालपरवापर्यंत लठ्ठपणात मला कोणी प्रतिस्पर्धी नव्हता. हल्ली मात्र योगिताबाली अन् आशा सचदेव त्यांच्या ऐन तारुण्यातच माझ्याशी स्पर्धा करू पाहतात म्हणजे काय म्हणावं?



# टुणटुण

पृष्ठ २८ वरून

चर्चा चाललेली असते. मुलींच्या नावांमध्ये नायक नाव सुचवतो मनोरमा. त्यावर नायिका तत्क्षणी त्याला उडवून लावते : ' छे छे ! मनोरमा नकोच ! ती ' मोटी ' लगेच नजरेसमोर येते ! '

दिलीपकुमार आणि नौशाद यांनी मिळून उमादेवीचं ' टुणटुण ' हे फिल्मी नामकरण केलं, नाहीतर मनोरमेच्या जागी ' उमादेवी ' हे आपलं मूळ नाव गुलजारकडून उद्धृत होण्याचं भाग्य टुणटुणला नसतं का लाभलं. टुणटुणला विनोदी नटी बनवण्याचं श्रेयही नौशाद–दिलीप यांच्याकडेच जातं.

' बाबुल 'च्या सेटवर नौशादनं टुणटुणला एका माणसाशी बोलताना पाहिलं. टुणटुणचे हातवारे, तिची बोलण्याची पद्धत पाहता, ती चांगल्यापैकी विनोदी भूमिका करील, असं नौशादना उत्स्फूर्तपणं वाटलं.

' बाबुल 'ची कथा तेच लिहीत होते. दिलीपकुमारशी सल्लामसलत करून त्यांनी ' बाबुल 'मध्ये टुणटुणसाठी एक खास, छोटी भूमिका लिहिली. उमादेवीचं टुणटुणमध्ये रूपांतर झालं ते ' बाबुल 'मुळेच. मग जवळजवळ प्रत्येक सिनेमात टुणटुणचं विशालकाय अस्तित्व हा अत्यावश्यक भाग होऊन बसला. दुधी भोपळ्यासारखा किरकोळ जॉनी वॉकर आणि कधी त्याचा अनुनय करणारी, तर कधी चक्क त्याला धपाटे घालणारी तांबड्या भोपळ्यासारखी गोल, गरगरीत टुणटुण, हे जोडपे प्रेक्षकांनी बराच काळ आवडीनं बघितलं.

जॉनी वॉकरच काय, दिलीपकुमारसारख्या नायकाबरोबर टुणटुणनं एके काळी काम केलं आहे. अर्थात बड्या नायकांबरोबर काम करताना सदैव शूर्पणखेचीच भूमिका तिच्या वाट्याला यायची. ' कोहिनूर 'मध्ये दिलीपकुमार तिचे केस कापतो आणि वेषांतरासाठी दाढी म्हणून त्यांचा उपयोग करतो.

एकामागून एक याच साच्याच्या भूमिका टुणटुण करीत राहिली. ती स्वतः त्यांना कंटाळली नाही, आणि निर्माते व प्रेक्षक मंडळी यांचीही त्याबद्दल तक्रार नव्हती. पटकथा-लेखकांना टुणटुणची भूमिका वेगळी लिहावी लागत नव्हती. ते तिला खुषीनं आयत्या वेळीदेखील जागा करून द्यायचे. टुणटुणच्या वर्चस्वाची नायिकांना भीती नव्हती. हास्यनट नायकावर क्वचित ताण करून जायचे. पण टुणटुणच्या कॉमेडीभोवती मर्यादांची कुंपणं पक्की बांधण्यात आली होती. ती वरचढ होण्याचं भय कधीच नव्हतं. त्यामुळे भूमिका मिळविण्यासाठी निर्माते आणि दिग्दर्शक, नायक वा नायिका यांची खुषामत करण्याची वेळ टुणटुणवर कधीच आली नाही. विनोदी नटाला करारबद्ध केलं की पाठोपाठ टुणटुणला घ्यायचं, हा अलिखित नियम ठरून गेल्यासारखा झाला.

नाही म्हणायला, महमूदबरोबर शुभा खोटेची जोडी जमली, तेव्हा टुणटुण जरा चरकली होती. लठ्ठपणाचा आधार शोधायची शुभा खोटेला गरज नव्हती. हास्यअभिनयाचे उपजत गुण तिच्या अंगी होते. ' सीमा ', ' अनाडी 'सारख्या चित्रपटात नायिकेच्या बरोबरीनं ती प्रेक्षकांची टाळी घेत होती. पण लवकरच शुभा खोटेनं विवाह केला आणि टुणटुणच्या मार्गातला काटा अगदी सहजी दूर झाला. पुन्हा टुणटुण उड्या मारीत, हसतखिदळत, लचकतमुरडत (!!!) काम करायला टुणटुण निर्धास्त मोकळी झाली. इंदिरा बन्सालसारखे किरकोळ–हो; शारीरिक दृष्ट्या टुणटुणच्या बरोबरीची असली तर इंदिराची प्रसिद्धी टुणटुणच्या मानानं किरकोळच राहिली–तेव्हा ह्या किरकोळ गोष्टींचं भय बाळगण्याची जरूरी कालपरवाच्या ' हमराही ' आणि ' बेनाम 'पर्यंत टुणटुणला भासली नाही. आज १९७५ साली मात्र ती तीव्रतेनं भासू लागली आहे. पदरी चार मुलाबाळांची जबाबदारी असलेल्या टुणटुणला आता वेगळ्या दिशेनं हातपाय हलवायची गरज वाटू लागली आहे. आणि त्यासाठी टुणटुण पुन्हा उमादेवी बनण्याचा प्रयत्न करीलसं दिसतं. टुणटुण ही मावळती हास्य नटी आहे; उमादेवी होतकरू पार्श्वगायिका होती. लता-आशा नावाचे चंद्रसूर्य चित्रांगणात चमकत नव्हते, तेव्हा उमादेवीचा तारा तळपत होता. ' चंद्रलेखा 'मध्ये आख्खी सातच्या सात गाणी तिनं गायिली आहेत. त्या गाण्यांच्या ध्वनिमुद्रणासाठी एक महिनाभर मद्रासमध्ये तिची खास सोय करण्यात आली होती म्हणे. सुरय्या ही त्या काळातला तिची एकमेव प्रतिस्पर्धिनी. ' अफसाना ', ' दर्द ', ' दिलवाले ', ' फिल्मनाटक ' ह्या चित्रपटांमधली उमादेवीची गाणी चांगलीच गाजली. ' दर्द 'मध्ये तर कट्टर प्रतिस्पर्धी सुरय्या समोर होती. सुरय्याकडे गोड गळ्याबरोबर लाडिक रूपाचं आणि अफाट प्रसिद्धीचं वलय होतं. पण ' दर्द 'मधली उमादेवीची गाणी सुरय्याच्या गाण्याइतकीच लोकप्रिय झाली. ' अफसाना लिख रही हूं दिले बेकरारका ' हे उमादेवीचं गाणं ' सिलोन ' आणि ' विविध भारती 'वर जुन्या गाण्यांच्या कार्यक्रमात बहुतेक तीन-चार दिवसांनी कानी पडतंच. आपल्या ओळखीची टुणटुणच हे गाणं म्हणत्येय, यावर विश्वास बसणं कठीण. पण टुणटुणला गळा आहे, एवढी खात्री ते गाणं निश्चित पटवून देतं.

आज तीच गळ्याची पुण्याई टुणटुणला तारून नेते आहे. हल्ली गावोगाव सिनेकलाकारांचे व्हरायटी प्रोग्रॅम्स होतात. टुणटुणला ह्या कार्यक्रमामध्ये गाण्यासाठी आवर्जून आमंत्रण असतं. ती गाते ती गाणी अर्थातच गैरफिल्मी आणि विनोदी असतात; पेटन्ट टुणटुण ब्रँडच्या अभिनयाची असतात. पण ती उचलून धरली जातात खरी. आपण लता किंवा आशा यांच्या दर्जाच्या गायिका आहोत, असा टुणटुणचा तरी कुठे दावा आहे ? ती स्वतःच सांगते, ' माझ्याजवळ गळा आहे, पण सफाईनं गाण्याचं तंत्र नाही. माझ्या गायनाला फार मर्यादा पडतात. लता-आशा दूरच, त्यांच्याहून कमी दर्जाच्या, पण शास्त्रशुद्ध शिक्षण घेतलेल्या कोणत्याही गायिकेपुढं माझा टिकाव लागणं अशक्य होतं. म्हणून तर नौशादमियांची ' बाबुल 'ची ऑफर मी तत्काळ स्वीकारली. '

कचकड्याच्या दुनियेत पंचवीस-तीस वर्षे घालवूनही आज ठामपणे कुठेच उभी नसलेली टुणटुण हे नटीचं एक प्रातिनिधिक चित्र आहे. टुणटुणकडून उमादेवीकडे जाण्याची वाट ती कशी शोधून काढते बघायचं. □

# दिलखुलास गप्पा शांतारामबापूंशी...

'तुम्ही लोक काय त्यांना प्रश्न विचारणार? त्यांच्या सिनेमाबद्दल तुमचे मतभेद असतील; पण हा माणूस समोर येऊन तुमच्याशी बोलायला लागल्याबरोबर ते टिकतात का पहा.'

व्ही. शांताराम यांच्याबरोबर वर्षानुवर्ष काम करीत आलेला त्यांचा एक वयोवृद्ध सहकारी सांगत होता. शांताराम या कलाकाराबरोबरचे मतभेद शांताराम या माणसापाशी आले की थांबतात—निदान काही काळ—, हा त्या पांढऱ्या केसांचा निष्कर्ष चुकीचा नव्हता, हा अनुभव 'चंदनाची चोळी—अंग अंग जाळी' च्या जाहिराती झळकू लागल्यापासून येतच होता. 'शांताराम' नावाबद्दल आस्था बाळगणारे निष्ठावान प्रेक्षक अद्यापही आहेत, याचा प्रत्यय येत होता. सिनेमाबद्दल फारसा रस न घेणारी माणसंसुद्धा, 'तुझ्या ओळखीनं या सिनेमाची पहिल्या दिवशीची तिकिटं मिळाली तर मिळवून दे ना.' म्हणून सांगत होती. शांतारामच्या 'माणूस-कुंकू'वर पोसलेल्या पिढीची ही मागणी होती, हे मुद्दाम सांगायला नकोच. 'का हो, शांताराम तुम्हाला पूर्वीइतकेच आवडतात का? त्यांचे सिनेमे तुम्हाला पूर्वी इतके चांगले वाटतात का?' मी त्या शांतारामनिष्ठ गृहस्थांना विचारलं. क्षणभर ते थांबले, आणि मग उत्तरले. 'पण शांताराम तो शांताराम! त्याच्याबद्दल जे मनाला वाटतं, ते अद्याप दुसऱ्या कुणाबद्दल वाटत नाही खरं!' शांतारामचा चित्रपट आवर्जून पहायचा आणि तोही पहिल्याच दिवशी पाहिला पाहिजे, अशी त्यांची भावना दिसली राजकपूरसारखा माणूसदेखील शांतारामचं नाव निघालं, की कानांच्या पाळ्या पकडून म्हणतो, 'उनकी तो बात ही अलग है.' आपले गुरु म्हणून देखील त्यांचा उल्लेख त्याच्या तोंडून ऐकला आहे. 'चंदनाची चोळी...'च्याच प्रीमीयरच्या संध्याकाळची गोष्ट. 'प्रभात' टॉकीजवर 'ट्रॅफिक जॅम' म्हणावं इतकी गर्दी जमलेली. पुन्हा गर्दीतल्या छोट्यामोठ्यांचं आकर्षण—शांताराम! आणि या नावाचा दरारा वाचाळ पत्रकारजातीवरही पडल्याचं दिसून यावं ना? सिनेमा संपल्यानंतर प्रेस-कॉन्फरन्स सुरू झाली; पण पहिली दहा मिनिटं शांतारामना कुणी एक प्रश्न विचारेल तर शपथ! 'तुम्ही काय लागेल ते विचारू शकता बरं का मंडळी—अगदी काय लागेल ते'—अशी दिलखुलास संमति मिळाली तरी ही शांतता भंगेना. शेवटी एका ज्येष्ठ पत्रकारानंच सुरुवात केली, 'या सिनेमात गाणी जरा जास्त झाली आहेत असं नाही वाटत? विशेषतः उत्तरार्धातल्या दुःखी मनःस्थितीत नायिका एवढी गाणी गाईल का?'

—आणि इथून पुढे जे जे प्रश्न विचारले गेले, त्यांच्या त्यांच्या उत्तरात 'इथे दिग्दर्शक दिसतो'—'इथे शांताराम दिसतात' शोधण्याची हौस पुरी होण्याचा संभव आहे. प्रत्येक प्रश्नाचं ठाम उत्तर शांतारामजींजवळ तयार असतं. ते तुम्हाला पटो न पटो, त्या वेळेपुरतं शांताराम तुम्हाला निरुत्तर करून टाकतात एवढं खरं. कुणीतरी या सिनेमातल्या दोनचार जुजबी घटनांचा दाखला देऊन विचारलं, 'इतक्या अनपेक्षितपणे गोष्टी घडू शकतात का! नायिकेनं या धोक्याचा आधीच विचार करायला नको होता का?'

'हवा होता की!' शांताराम थंडपणे उत्तरले, 'पण आपल्याला ठेच लागते ती सांगून सवरून लागते का? कधीतरी बाथरूममध्ये पाय घसरतो तो अपघात पूर्वसूचनेनं घडतो का? जरा पायाखाली पाहिलं, तर या गोष्टी टळणाऱ्या असतात. पण तरीही त्या टळत नाहीत, हाच अनुभव येतो ना? आयुष्यात अनपेक्षितपणा ही गोष्ट नसती तर, 'आधी कळायला पाहिजे होत रे' अशी हळहळ ऐकूच आली नसती!'

—आता अर्थात विचारणारा थंड झाला होता. पुढचा प्रश्न: (पुन्हा जरा दबूनच विचारलेला)—पण खऱ्या आयुष्यात कुठे सगळ्या घटना अशा दिसून येतात?

'अस्सं!' आश्चर्य वाटल्याचा आविर्भाव करून शांतारामनी म्हटलं, 'मग तुमच्या वर्तमानपत्रात तुम्ही बातम्या छापता त्या? खून, बलात्कार, मारहाणी, मारामाऱ्या, दंगली—सगळं काही होत असल्याचं आपण वाचतोच ना वर्तमानपत्रात? (हसून) प्रेक्षकांची नका काळजी करू तुम्ही! सिनेमातल्या काही घटना 'तयार' केलेल्या असतात, हे त्यांना माहीत असतं. सिनेमात होणारी मारामारी ही पडद्यावर पहाण्यापुरतीच लक्षात घ्यायची, हे त्याला कळतं. एक मात्र माझा नम्र दावा आहे. माझ्या सिनेमात हीरो-हीरॉइन्स कधीच नसतात. कथेतल्या घटना, प्रसंग आणि पात्रं यांच्यामध्ये मी नेहेमीच माणसं पहात आलो आहे. 'माणूस'पासून ते कालच्या 'पिंजरा'-पर्यंत मी हा दृष्टिकोन ठेवलेला आहे.' अर्थात प्रेक्षकांसाठी म्हणून काही गोष्टी 'घालाव्या' लागतात, हे त्यांनी मान्य केलं. उदाहरणार्थ याच चित्रपटातलं ते नोकर-नोकराणीचं गाणं. 'पण अशा काही सवलती तुम्ही आम्हाला द्यायला पाहिजेत'—त्यांनी म्हटलं, आणि आपला आवडता सिद्धान्त सांगितला: 'अखेर कला जगायला हवी असेल, ती पुढे जायला हवी असेल तर प्रथम कलाकार जगायला


बॉम्बे डाइंग
एकमेव वितरक
पराग
डेक्कन जिमखाना, ● लक्ष्मी रोड, पुणे
आज आपल्यासाठीं
खास नवीन प्रकार
सुंदर
डिझाईनमध्ये
मनिला पिसेस
रु. 11-45
रु. 13-60
रु. 16-65

हवा. (मधेच) मधाशी कुणीतरी विचारलं ना, दुःखी मनःस्थितीत नायिका एवढी नाचगाणी करेल का ? पण मी तुम्हाला सांगतो, कलाकाराला हे करावंच लागतं. शो मस्ट गो ऑन, हे या व्यवसायाच निष्ठुर तत्त्व आहे. तमाशाचा कलाकार असो, नाटकाचा असो, की सिनेमातला; धंद्याची गणितं लक्षात येतात तेव्हा वैयक्तिक दुःख दूर सारून त्याला कामासाठी उभं रहावंच लागतं. '

' पण मराठी सिनेमा चालायला हवा असेल तर ग्रामीण कथांखेरीज–आणि त्यातही तमाशा पटांखेरीज पर्याय नाही का ?' पुढचा सवाल. आणि त्याला तत्पर जवाब का. हो, तमाशापटाला तुमची हरकत आहे की काय ? आणि मी म्हणतो, का काढू नयेत तमाशापट ? ह्या मातीत जन्मलेली अस्सल कला आहे ती. आमची म्हणावी अशी कला ! बाकी नाटक वगैरे आम्ही घेतलं ते उत्तरेकडून. त्यातल्या संगीतातदेखील आम्ही इकडचे तिकडचे ढंग चालवून घेतले. ' ( इथे शांताराम थांबले, ' चंद्रिका ही जणू 'ची एक लकेर त्यांनी घेतली–) मिश्र पद्धतीची ही गायकी तुम्हाला चालली आणि आपल्याच मातीतली ही कला तुम्हाला का चालू नये ? '

( प्रश्न विचारणारा धीर करून म्हणतो:)

' कथा ग्रामीण असण्यावर आक्षेप नाही; तिनं ग्रामीण जीवनाचा फक्त एकच पैलू–तमाशा–कां दाखवावा ? उदाहरणार्थ ' सामना ' हा ग्रामीण सिनेमा वाटतो; पण तमाशापट वाटत नाही.

शांताराम इथेही माघार घेत नाहीत. ' सामना 'नं ' पिंजरा ' इतका प्रेक्षक मराठीकडे आणला का ?'–ते रोखठोक सवाल करतात. त्यांच्या नजरेत व्यावसायिक मत्सराची झाक आता दिसेल, म्हणून आपण उत्सुकतेनं बघतो. ती तशी दिसली तर बरंच, आपल्याला लिहायला एक चांगला मुद्दा मिळाला, म्हणून विशेष बारकाईनं बघतो. पण शांतारामबापूंच्या नजरेत वा चेहऱ्यावर काहीही फरक दिसत नाही. आणि ते ज्या सुरात बोलतात त्यावरून एक स्पष्ट होतं : ते व्यावसायिक यश आणि कलात्मक यश यांची गल्लत करत नाहीत. ' सामना 'च्या गुणवत्तेबद्दल ते बोलत नाहीत. ते फक्त ' प्रेक्षक खेचून आणण्या 'च्या दृष्टीनं पहातात. आणि या दृष्टीनं पाहिलं तर कबूल करावं लागेल की, ' सामना 'नं मराठीकडे प्रेक्षक आणला आहे, पण ' पिंजरा '–इतका संख्यात्मक प्रेक्षक तो आणू शकलेला नाही...

...' सध्या मराठीची गरज आहे प्रेक्षकांची ! आपला प्रेक्षक सहजासहजी मराठीकडे येत नाही. त्याला बऱ्याच मनधरण्यांनी प्रसन्न करून, वळवून इकडे आणावं लागतं. ' पिंजरा 'नं माझ्या अपेक्षेबाहेर प्रेक्षकवर्ग मला मिळवून दिला. हा आलेला प्रेक्षक परत जाता कामा नये. त्यासाठी इथून पुढे शंभर तमाशापट काढावे लागले तरी बेहेत्तर ! मी ते काढीन !'

शांतारामबापूंच्या या आवेशाच्या आणि कळकळीच्या वक्तव्यावर देखील पुन्हा एक प्रतिक्रिया आलीच. ' पण ज्यांची कुवत आहे अशा तुमच्यासारख्यांनी या चाकोरी बाहेर पडावं असं वाटतं म्हणून ही तमाशापटांबद्दलची तक्रार. '

' म्हणजे तुम्हाला प्रयोगात्मक चित्रपट माझ्याकडून हवाय म्हणता ?' शांताराम हसून विचारतात, ' मलाही त्याचं भान आहे बरं का ! खानोलकरांची ' चानी ' ही कथा मी लवकरच हाती घेईन. त्यानंतर माझा अगदी पुढचा चित्रपट हरिजनांच्या समस्येवर आहे. मी त्यात केवळ हरिजनांना सहानुभूती दाखवू इच्छीत नाही. या समस्येच्या दोन्ही बाजू दाखवण्याचा मी प्रयत्न करणार आहे. जे कारण मी केवळ काय होतं ते सांगणारा माणूस नाही. स्वभावतःच काय होतं, काय घडलं ते कसं असावं हे सांगायला मला आवडत. ते तुम्हाला पटावं की न पटावं, ही तुमची मर्जी ! हरिजनांवरच्या कथेबद्दल एकच अडचण वाटते. वास्तवात जे घडतंय ते तितक्या प्रखरपणं मला पडद्यावर दाखवायची मुभा मिळेल का ? कारण कित्येकदा वास्तवात जे घडतं, ते इतकं भयानक असतं; पण पडद्यावर ते जसंच्या तसं मांडलं तर अवास्तवाचा, भडकपणाचा संशय निर्माण होतो. '

' प्रायोगिक चित्रपटाची तुमची व्याख्या काय ?' हा माझा प्रश्न.

' जे घडतं ते तसंच्या तसं दाखवणं, याला मी प्रायोगिक शैली समजतो. ' शांतारामनी चटकन खुलासा केला, ' एरवी सिनेमामध्ये प्रसंग रचावे लागतात; प्रेक्षकाच्या दृष्टिकोणातून त्यांची सुसंगत आणि



नाटयपूर्ण मांडणी करावी लागते. पण प्रेक्षक आणि त्यांच्यावरचा अपेक्षित परिणाम वगैरे मधल्या कोणत्याही उपाधीचा विचार न करता मूळ कल्पनेबरहुकूम घटना चित्रांकित करणं, ही झाली प्रायोगिक शैली !'

('पिंजरा 'च्या वेळीही हाच प्रश्न मी त्यांना विचारला होता. तेव्हा ते म्हणाले होते, 'प्रत्येक चित्रपट हाच मुळी प्रयोग असतो की ! प्रायोगिक–अप्रायोगिक असा भेद मी करीत नाही.' त्यांचं ते उत्तर मला तेव्हा आवडलं होतं आणि आजचंही हे उत्तर आवडतं. त्यांच्या बोलण्यात विसंगती आहे, असं वाटायचं कारण नाही. दोन वर्षांपूर्वी फक्त 'पिंजरा' त्यांच्या डोळ्यांपुढे होता. 'पिंजरा 'च्या भक्कम आर्थिक यशानं त्यांना 'चानी 'सारखी कथा घ्यायचं बळ दिलं असेल, तर विसंगतीची तक्रार करायला जागाच कुठं राहते ?)

उलटसुलट प्रश्न होऊ लागले, वातावरणात जाग आल्यासारखी वाटत होती, तोवरच शांताराम–परिवारापैकी एकाच्या लक्षात आलं, साडेअकरा वाजले आहेत. पहाटे पाचपासून कामाला लागलेल्या या 'तरुण माणसा' लासुद्धा ( वय वर्ष फक्त चौऱ्याहत्तर ! ) आता विश्रांतीची आवश्यकता आहे. डोळ्यापाशच्या सुरकुत्या सोडल्या, तर शांतारामबापूंच्या चेहऱ्यावर वा हालचालीत या शिणवटयाचं कुठं चिन्हही दिसत नाही. पण आता थांबणं भागच होतं.

'शेवटचे दोनच प्रश्न.' म्हणून तेवढा वेळ मागून घेतला. 'हा सिनेमा तुम्ही स्वत: दिग्दर्शित केला नाही आणि पुढचाही स्वत: करत नाही आहात. ही निवृत्तीची चिन्हं नाहीत ना ?

'मुळीच नाही. तुम्हा मंडळींची हरकत नसेल तर–(वर बोट दाखवून) 'तो' आम्हाला निवृत्त करेपर्यंत आमची निवृत्त व्हायची इच्छा नाही.'

विनोदबुद्धीची तल्लख चुणुक याही आधी त्यांनी दाखवली होती. 'सिनेमाच्या या मोहनगरीत राहून दारूच्या एका थेंबाला वा सिगरेटच्या थोटकाला स्पर्श न करणारा फक्त एकच माणूस उभ्या आयुष्यात मला पाहायला मिळाला. (एक क्षणभर थांबून) तो माणूस म्हणजे मीच !'

कोल्हापूरचा 'शालिनी' स्टुडिओ बंद होणार की काय, याबद्दल परस्परविरोधी बातम्या सध्या आहेत. त्याबद्दल त्यांना विचारलं. 'तुला काय वाटतं याबाबत ?' उसन्या गांभीर्यानं त्यांनी म्हटलं, 'बंद करावा की न करावा ? तू म्हणशील तसं करतो.'

आपली फिरकी घेतली गेली असली, तरी निदान मराठी चित्रसृष्टीचं भवितव्य की काय म्हणतात ते या क्षणी आपल्या हातात आहे (!) ही जाणीव कमी सुखद नव्हती. मी अर्थात 'शालिनी स्टुडिओ हवाच' या बाजूनं कौल दिला.

'खरं आहे.' शांताराम आता खरोखरीच्या गंभीरपणे म्हणाले. 'अरे, कोल्हापुरात मराठी सिनेमा नाही काढायचा तर कुठे ? अजूनही खरा मराठी नायक सापडतो तो कोल्हापुरातच. पुण्या–मुंबईच्या नायकांना मराठी बनवावं लागतं !' □□

**इंडोचायना : पृष्ठ १५ वरून**

निक्सन यांनी केले होते. पण हा केवळ आपला पराभव लपविण्यासाठी त्याला चढविलेला शाब्दिक मुलामा होता. त्यानंतर गेल्या दोन वर्षांत अमेरिकेने प्रतिष्ठाही आणि शांतताही गमावली. दक्षिण व्हिएटनाम आणि कंबोडियास आपण कम्युनिस्टांपासून अजून वाचवू, असे अमेरिकेचे अध्यक्ष फोर्ड म्हणत आहेत. पण या दोन्ही ठिकाणच्या पडत्या राजवटींना शाब्दिक धीर देण्यापलीकडे त्याला फारसा अर्थ नाही.

फोर्ड यांनी आपल्या मुलाखतीत मुख्यत: दोन तक्रारी केल्या. उत्तरेकडील प्रांत न लढता सोडून देण्याचा निर्णय थिऊ यांनी आपणास न कळविता घेतला, याबद्दल त्यांनी कडक टीका केली पण 'योग्य डावपेचात्मक कारवाई' असा थिऊंच्या निर्णयाचा गौरव अमेरिकन सेनेचे चीफ ऑफ स्टाफ जनरल वेयांड यांनी केला. दक्षिण व्हिएटनाम हे युद्ध जिंकील असा विश्वास त्यांनी सायगावहून वॉशिंग्टनला परतताना दिलेल्या मुलाखतीत व्यक्त केला. परिस्थितीची पाहणी करण्यासाठी अध्यक्ष फोर्ड यांनी त्यांना आपले प्रतिनिधी म्हणून सायगावला पाठविले होते. पण त्यांच्या या आशावादालाही 'धीराचे शब्द' या पलीकडे महत्त्व नव्हते. फोर्ड यांची दुसरी तक्रार काँग्रेसविरुद्ध होती. काँग्रेसने सायगावला अधिक लष्करी मदत मंजूर केली असती तर या युद्धात ५५,००० अमेरिकन सैनिकांनी आपले प्राण गमावले ते वाया गेले नसते असे त्यांनी सांगितले. काँग्रेसकडे ते वीस कोट डॉलर मदतीची मागणी करणार आहेत, पण युद्धात अमेरिका प्रत्यक्ष लष्करी हस्तक्षेप करणार नाही, हे त्यांनी स्पष्ट केले. अमेरिकन काँग्रेसच्या सभासदांचा कल लक्षात घेता फोर्ड यांनी मागितलेली मदत काँग्रेस मंजूर करील असे वाटत नाही. दक्षिण व्हिएटनाम व कंबोडियाच्या राजवटींना आतापर्यंत केलेली मदत वाया गेली. आपण पाठविलेली शस्त्रे कम्युनिस्टांच्या हातीच पडणार असतील तर मदत कशाला करावयाची, असे काँग्रेसच्या बहुसंख्य सभासदांना वाटते.

पॅरिस करारानुसार व्हिएटनाम युद्धातून आपले अंग काढून घेताना सायगाव व नॉमपेन्हमधील राजवटींनी यापुढची लढाई स्वत:च्या बळावर लढावी, यासाठी अमेरिकेने त्यांना शस्त्रांच्या दृष्टीने सुसज्ज केलेले होते. पण लढाया केवळ शस्त्रांनी लढल्या जात नाहीत. त्यासाठी लागते मनोधैर्य. खचलेले सैनिक व जनता विजयी होऊ शकत नाही. सायगाव व नॉमपेन्हमध्ये तेच घडत आहे. लाचलुचपतीने बरबटलेली राजवट, अंदाधुंदी आणि अकार्यक्षम कारभार या कारणामुळेही या दोन्ही राजवटींविरुद्ध लष्करात व जनतेत तीव्र असंतोष आहे.

व्हिएटनाममध्ये स्वातंत्र्य व लोकशाहीच्या रक्षणासाठी आम्ही लढत आहोत असा अमेरिकेचा दावा होता. पण हा दावा पोकळ व फोल असल्याचे केवळ व्हिएटनाममध्येच नव्हे तर इतर ठिकाणीही दिसून आले आहे. स्वातंत्र्य व लोकशाहीच्या नावाखाली एकतंत्री, हुकूमशाही, लष्करी राजवटींनाच अमेरिका नेहमी पाठिंबा देत आलेली आहे. पण आपल्यापुढील निकडीचे प्रश्न कोण निर्धाराने व निकडीने सोडवितो ही सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाची कसोटी असते. या कसोटीला थिऊ आणि लोननोल यांच्या राजवटी उतरल्या नाहीत. त्यांच्या पराभवाचे हे सर्वांत महत्त्वाचे कारण आहे. अमेरिकेने एवढी वर्षे मोठया प्रमाणावर लष्करी व आर्थिक मदत करून सुद्धा ज्या राजवटी आपल्या पायावर उभ्या राहू शकल्या नाहीत त्या यापुढे राहतील, अशी आशा कोणत्या आधारावर बाळगावयाची ? या राजवटीचा पराभव आणि कम्युनिस्टांचा जय अटळ आहे. अमेरिकेच्या फसलेल्या धोरणाची ती परिणती आहे. कम्युनिस्टांच्या या विजयावर रशिया, चीन व व्हिएटनाम यांच्यात कोणते अंतर्गत संघर्ष होण्याची शक्यता आहे, त्याचा विचार पुन्हा केव्हा तरी. पण दक्षिण व्हिएटनाम व कंबोडियातील कम्युनिस्टांचा विजय म्हणजे आग्नेय आशियाच्या राजकारणावर दूरगामी परिणाम करणारी घटना ठरणार आहे, यात शंका नाही. □



# 'उन्मेष'चे
# सोफा कम बेड

ज्योमो : विनय आपटे.
अनामिका : चंदा जोगळेकर.



ज्योमो : विनय आपटे
आँटी : दीपा श्रीराम
मंदिरा : मीनल मेहता



नजर

ह. शि. खरात

# क्रेझी बॉइज ऑफ द गेम्स

ऑलिम्पिक खेळांचे अफलातून विडंबन

पोरं इब्लिस. त्यापेक्षाही दिग्दर्शक क्लॉड झिदी हा महाइब्लिस. आयडियाबाज डोक्याचा. त्याच्या एकापेक्षा एक अफलातून आयडिया बघताना आपण तर हसून हसून बेजार होतो. मुळात 'क्रेझी बॉइज ऑफ द गेम्स्' हा चित्रपट फ्रेंच. आणि फ्रेंच माणसाच्या नसानसात फार्सिकल व्हेन भरलेली. जगातील उत्कृष्ट फार्स हे बहुतेक फ्रेंच भाषेमध्ये असावेत. साहजिकच 'क्रेझी बॉइज'— ह्या फिलममध्ये अथपासून इतिपर्यंत फार्सिकल व्हेन भरून राहिलीय. क्रेझी बॉइज बघताना असं राहून राहून वाटतं की आपल्याकडे असा चित्रपट का निर्माण होऊ नये? निदान या चित्रपटातील एखादी 'आयडिया' तरी आपल्याला का सुचू नये. आणि सुचली तरी ती हास्यास्पद न होता का मांडता येऊ नये? का त्या लोकांची जीवनाकडे पाहण्याचीच दृष्टी वेगळी असल्याने त्यांना ह्या कल्पना सुचतात. की त्यांचे अनुभवविश्व हे समृद्ध असल्याने त्यांना जीवनात येणारे अनुभवच ह्या अफलातून कल्पना सुचवितात. त्यामानाने आपले जीवन अत्यंत मर्यादित, कोते व व चाकोरीबद्ध आहे का? का आपली जीवनाकडे बघण्याची दृष्टी एवढी खेळकर नाही. काहीही असो, आपल्या जीवनातून सुद्धा अनेक धमाल गोष्टी दाखविता येतील— फक्त त्यासाठी तेवढा डोकेबाज माणूस आपल्याकडे हवा. म्हणजे खेळ ह्या विषयावरही किती उत्कृष्ट विनोदी चित्रपट तयार करता येतो, हे क्रेझी बॉइज बघताना ध्यानात येईल. ऑलिम्पिक खेळांचं इतकं सुंदर आणि अफलातून विडंबन 'क्रेझी बॉइज'मध्ये केलं आहे की, हा चित्रपट विनोदी चित्रपट क्षेत्रात क्लासिक ठरावा.

तर पोरं भलती इब्लिस असतात. पिकनिकसाठी एका गावाजवळ उतरलेली असतात. गावाशेजारच्या रानात तंबू ठोकून गावात काही खाण्यापिण्याच्या वस्तू घेण्यासाठी आपल्या फटफटयांवर स्वार होऊन येतात. इकडे गावात कसली तरी स्वागताची तयारी चाललेली असते. गावाला खेळाचं भलतं प्रेम.

खेळ गावाला जीव की प्राण. अशा वेळी कुठे तरी ऑलिम्पिक सामने भरणार असतात. आणि त्या ऑलिम्पिक खेळांची ज्योत त्या गावावरून जाणार असते. त्या ज्योतीचं स्वागत करण्यासाठीच इकडे गावात तयारी चालू असते. आणि ही स्वागताची हौस असते एका दुकानदाराला. त्याची ती खेळाडू बघितला की प्रेमात पडणारी चावट पोरगी आणि फुटबॉलसारखा फुगलेला आणि 'अपघात' ह्याच एका योगावर जन्माला आलेला त्याचा लडदू पोरगा आणि गावात आलेली चार इंग्लिश पोरं, एवढीच काय ती ह्या चित्रपटातील धमाल पात्रं त्यातल्या त्यात दुकानदार म्हातारा भलता खडूस. आपल्या पोरीवर कोणी लाईन मारायला लागला की त्याला एकदम ब्रेक लावून गाडी लाईनीवर आणायचा. ती चार पोरं गावात येऊन आपल्या भरधाव फटफटयांनी चांगलाच गोंधळ घालतात. त्याच वेळी इकडे लडदू पोरगा शिडीवर चढून पताका लावीत असताना काही 'चालू' म्हातारे लोखंडी गोळा शिडीवर फेकून त्याची छेड काढीत असताना ही चार पोरं त्यात अधिकच भर घालतात. कारण सगळयांच्याच गाडया कुठे-तरी आपली करामत दाखवतात. एक पायरी-वरून कोसळते आणि गोल चाक चौकोनी होते. एक सरळ पाण्यात. दुसरी पोरीच्या भोवती पताकांचा गोफ गुंफताना सरळ झाडावर आदळते, तर एक वाटेत पडलेला लोखंडी गोळा असा उडवते की, तो छपरावर दोन तीन ठिकाणी आदळून नेमका त्या लडदू पोराच्या टाळक्यावर असा आदळतो की लडदू शिडीवरच उभ्या उभ्याच मेल्यासारखा पडतो. तेवढयात एका पोराची लाईन दुकान-दाराच्या पोरीशी जमते. पोरगी मात्र मस्त. पण लगेच पाघळणारी. तिला आणखी नीट बघता यावी म्हणून तो वरचा माल काढायला सांगतो. पण तेवढयात आई आणि बाप हजर. ही मंडळी परत तंबूत येतात तर गाईनं तंबूत शिरून सत्यानाश केलेला. बरं खाण्यासाठी जेवणाची तयारी अशी करतात की कुणाच्याही वाटयाला काहीच येत नाही. शेवटी गरजू दुकानदार जेवण घेऊन येतो. आणि तुम्ही स्वागताची तयारी करण्यास मदत करावी असे सांगतो–पोरांनाही तेच पाहिजे असते. मग ही तयारी करताना जी धमाल घडते ती



# क्रेझी बॉइज हा सांगण्यापेक्षा बघण्याचाच सिनेमा आहे

बघूनच घ्यावी. पताका लावण्याची क्लृप्ती, दर वेळी लडदूला होणारा अपघात. लाऊड-स्पिकर असे लावतात की, 'टेस्टिंग' करताना 'माईक'वर टक टक केल्याबरोबर सारेच कर्णे कोसळतात. आणि त्यातला एक कर्णा नेमका लडदूच्या टाळक्यात. शेवटी पुतळा आणायला जातात. हातात ज्योत घेतलेल्या तरुणाचा पुतळा तयार झालेला नसतो. शिल्प-काराचे उरलेले काम ही मंडळी अक्षरशः 'तासून' पुरे करतात अर्थात पुतळा हा मॉडर्न आर्टचा नमुना. ट्रकमध्ये घालून नेतात. नेत असताना पुतळा कोसळतो, तो नेमका वळण घेऊन जाणाऱ्या त्यांच्याच पुढे. त्यांना पत्ताच नसतो. पुन्हा गोंद लावून पुतळा जोडला जातो आणि पुतळा मॉडर्न आर्टमधून खराखुरा उभा राहतो. मध्येच पूल येतो. पंचाईत, पण पुतळाही त्यांच्यासारखाच इब्लिस. तो खाली वाकतो. शेवटी पुतळा योग्य ठिकाणी येतो. ज्योतीच्या स्वागतासाठी गावातील प्रतिष्ठित मंडळी येते. बँड वाजवला जातो. बँड वाजवताना आवाजाच्या झोतानं अध्यक्षच उडावा एवढा आवाज. पुतळ्याचे उद्‌घाटन होताना फारच गंमत होते. पुतळा उलटाच ठेवलेला आढळतो. त्याला सुलट करताना बिचाऱ्या लडदूला पुन्हा थोबाडीत खावी लागते आणि तीही पुतळ्याच्या हाताने खेळाडू ज्योत घेऊन येतो. आणि ती पोरगी चक्क त्याच्यावर फिदा. त्यामुळे आमचा इब्लिस पोरगा खजिल. मग खेळांच्या स्पर्धा होतात. त्या स्पर्धा बघताना प्रेक्षकांचीच हसण्याची स्पर्धा लागते. स्पॅगेटी खाताना बाकीच्या खेळाडूनं वापरलेली युक्ती पाहून हसताना आपल्या पोटातून आता स्पॅगेटी बाहेर येणार असे वाटू लागते. पण गंमत म्हणजे ती पोरगी चक्क त्या खेळाडूबरोबर पळून जाते. आमचा हिरो आत्महत्या करायला निघतो. पण बिचारा गळ्यात बांधलेला धोंडा त्याच्या आडवा येतो. शेवटी त्या पोरीला मिळविण्यासाठी ही चार इब्लिस पोरं ऑलिम्पिक खेळाकडे निघतात. वाटेत पोलिसाने सरळ जा सांगितल्यावरून ही कारटी अगदी नाकासमोर जातात. मग वाटेत साधा खांब आला तरी तो उपटला जातो, पण त्याला वळण नाही. पुढे तर चक्क मोटारगाडीतून ते आपल्या फटफट्या काढतात. ऑलिम्पिक स्टेडियममध्ये घुसता यावे म्हणून ते झाडूवाले होतात. हे पोलिसांना कळते. मग पोलीस आणि ही चार पोरं ह्यांची जी पाठलाग स्पर्धा सुरू होते त्यामुळे ऑलिम्पिक खेळाचं धमाल विडंबन आपल्याला बघायला मिळते.

पोलिसांचा ससेमिरा चुकविण्यासाठी हे काही सायकलस्वारांना पुलाखाली मारून आपणच स्वार होतात. सायकली अशा चालवतात की, त्यांच्या मॅनेजरला गाडीस अपघात होऊन आख्खी गाडी सायकलवर वाहून आणावी लागते. सायकलिंगमध्ये गोल्डमेडल मिळाल्याने त्यांना साऱ्याच स्पर्धांत भाग घेणे भाग पडते. परंतु प्रत्येक ठिकाणी 'चमत्कार' करून ही पोरं गोल्ड-मेडल मिळवितात. त्यामुळे खेळाडूबरोबर आलेली चावट पोरगीही पहिल्या हिरोवर पुन्हा आशक होते. पोरीला शोधायला आलेला बाप पण खुश होतो. शेवटी लग्न ठरते. मंडळी लग्नाला जायला निघालेली असतात. तेवढ्यात दुसऱ्याच ॲथलेटिक्समध्ये भाग घेणारा तरुण त्या पोरीच्या पुढून जातो आणि पोरगी आदतसे मजबूर होऊन त्याच्यावर फिदा. चक्क लग्नाच्या वेषात ती स्कूटरवरून त्याच्यामागे निघून जाते. आणि आमची ही इब्लिस पोरं शेवटी हात चोळत बसतात. ऑलिम्पिक खेळात सगळी गोल्डन मेडल्स मिळविणारे हे बहाद्दर प्रेमाच्या रेस-मध्ये अक्षरशः पराभूत होतात.

असे हे धमाल विडंबन पेश करताना दिग्दर्शकाने जे कसब दाखविले आहे त्याला जवाब नाही. अशा कितीतरी घटना व प्रसंग आहेत की त्याची मोठी यादीच तयार होईल. चित्रपटाच्या सुरुवातीपासून . शेवटपर्यंत हसायला लावणारा हा चित्रपट आहे तेव्हा साऱ्या घटनाच हास्यस्फोटक असल्यास नवल नाही. सुरुवातीलाच ज्योत घेऊन धावणारा खेळाडू एका गावात शिरून बाहेर पडतो. परंतु पाठीमागे मात्र गावाला आग लागलेली असते. ज्योत विझू नये म्हणून पावसात छत्री धरणे, ऑलिम्पिक खेळाच्या उद्‌घाट-नाच्या वेळी हातात ज्योतीऐवजी झाडू येणे, स्पर्धेत भाग घेताना पळण्याच्या रेषा बदलणे, पोहण्याच्या वेळी पाणीच कमी करणे, फ्रीस्टाईल वा ज्युडो स्पर्धेत अनेक गंमती करणे, मॅरेथॉन शर्यतीत प्रतिस्पर्ध्याला अक्षरशः अडचणीत टाकून आपण पुढे सर-कणे, त्यासाठी भल्याबुऱ्याची काहीही तमा न बाळगता विजय मिळविणे. भालाफेकीचा विक्रम तर चक्रावून सोडणारा आहे. लाँग हायजम्प दाखविताना आधाराच्या पोलवर दोलायमान होणे आणि त्याचवेळी प्रेक्षकांनी तसे झुलताना दाखविणे हा कॅमेऱ्याचा चांगला उपयोग आहे. पिकनिकच्या वेळीसुद्धा कपडे बुडवतात तशा बश्या धुणे, झाडं मध्येच कापणे, मासे संगीताच्या तालावर पकडणे ह्या साऱ्याच आयडिया अफलातून आहेत. त्या साऱ्याच इथे सांगणे आणि त्यातील खरी गंमत काय आहे हे लिहिणे स्थळाअभावी शक्य नाही. मात्र हा चित्रपट सांगण्यापेक्षा बघण्याचा आहे. बघूनच ह्यातील मजा कळते कारण तिकडे खेळाचं विडंबन सुरू असताना इकडे प्रेक्षकही 'खो खो'चा खेळ अंधारात खेळत असतो.

क्रेझी बॉइजमध्ये साऱ्यांनीच चांगली कामे केली आहेत. विशेषतः 'ज्यूडो' खेळण्याच्या इब्लिस पोराचं काम चांगलं झालं आहे. आणि सगळ्यात दिग्दर्शक क्लॉड झिदी ह्यांचं काम अफलातून झालं आहे. त्याने ह्या चित्रपटातील प्रसंग इतके वेगवान दाखविले आहेत की, प्रेक्षकाला हसायलाही उसंत पडत नाही. आपल्याकडे शाब्दिक कोट्या, विदु-षकी अंगविक्षेप, हास्यास्पद कल्पना आणि खेळकर मोकळी विनोदी दृष्टी नसणे ह्या गोष्टींतून इकडचा दिग्दर्शक व प्रेक्षक बाहेर पडल्याशिवाय आणि लेक्चरबाजी सोडल्या-शिवाय केवळ शुद्ध करमणूक करणारा क्रेझी बॉइजसारखा चित्रपट निर्माण होणार नाही. परंतु आपल्याकडे एखाद्या गोष्टींचं केलेलं विडंबन आपला प्रेक्षक वा समाज खिलाडू-वृत्तीने 'ॲप्रीशिएट' करील काय ? ■ ■

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

# मुख्यमंत्र्यांसमवेत मालेगावात

**ग. प्र. प्रधान**

३१ मार्च रंगपंचमीचा दिवस. रात्री ९ चा सुमार. मालेगावच्या जवळ जवळ दक्षिण टोकाला असलेल्या बजरंगवाडी जवळील एक पानाचे दुकान. पानवाला मुसलमान. पानपट्टीच्या दुकानाजवळची वर्दळ कमी होत चालली. इतक्यात दोघे तरुण तेथे येतात. पान घेतात. एकजण अधिक सुपारी मागतो. 'मुफ्त केसा मिलेगा?' पानवाल्याचा प्रश्न. शब्दावरून शब्द वाढतो. दोघेही हात घाईवर येतात. थोडी चकमक होते. अल्पावधीत ही वार्ता आसपास पसरते. रस्त्याच्या एका बाजूस हिंदु वस्ती आहे तेथे माणसे जमतात. दुसऱ्या बाजूस मुसलमान जमाव जमतो. दगडफेक सुरू होते. खान फौजदार लोकांना शांत करण्याचा प्रयत्न करतात. आणखी पोलीस कुमक येते. दगडफेक चालू असते. थोडा लाठीहल्ला केला जातो. पण लोक हटत नाहीत. त्यातच एका जागी असलेल्या ५–६ बैलगाड्यांना व काही सायकलींना आग लागते. परिस्थिती हाताबाहेर जाणार असे पोलिसांना वाटू लागते. जवळ अश्रुधुरांची नळकांडी नसतात. मग 'जातीय दंगल असल्यास अतीशय कडक उपाय योजा' या आदेशानुसार खान व दळवी गोळीबार सुरू करतात. आठ–दहा 'राऊंड्स फायर' होतात. काही आर्त किंकाळ्या. तीन चार जण रक्ताच्या थारोळ्यात. जमाव भराभरा पांगतो. सारे भीतिग्रस्त. दरम्यान काही आगी लागतात. एक सायजिंग फॅक्टरी भस्मसात होते. वेगवेगळ्या आगीत माल, यंत्रसामुग्री मिळून जवळ जवळ पंधरा लाख रुपयांची राख होते. सगळीकडे पोलिसांच्या कर्णकटू शिट्ट्या ऐकू येतात. काय झाले ते शहराच्या इतर भागात कोणाला काही कळत नाही. रात्री अकराच्या सुमारास भीषण शांततेत मालेगाव निद्रेच्या आधीन होते. शांततेचा भंग होतो तो फक्त पोलिसांच्या गस्त घालणाऱ्या जीप गाड्यांनी.

दुसऱ्या दिवशी या घटनेचे पडसाद स्वाभाविकपणेच विधिमंडळात उमटले. 'दंगलीस जे जबाबदार असतील त्यांना कठोर शासन करा.' एकमुखाने मागणी करण्यात आली. 'जर कोणी अधिकाऱ्यामुळे अकारण प्राणहत्त्या झाली असेल तर त्याला पाठीशी घालून चालणार नाही.' कोणी तरी कडाडले. 'दंगलीची न्यायालयीन चौकशी करा.' विधान विरोधीपक्ष नेते श्री. डी. बी. पाटील यांनी मागणी केली. मुख्यमंत्री चर्चेस उत्तर देताना म्हणाले, 'सरकार कोणालाही पाठीशी घालणार नाही. कोणाचीही गय केली जाणार नाही. परिस्थिती प्रत्यक्ष पहाण्यासाठी उद्याच मी मालेगावला जाणार आहे. माझ्या बरोबर विरोधी पक्षाचे श्री. डी. बी. पाटील व जी. पी. प्रधान आणि मालेगावच्या आमदार आयेशा इक्बाल हेही येणार आहेत.'

अनेक प्रक्षोभक घटनांच्या वेळी मी महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी पूर्वी गेलो होतो. परंतु त्यावेळी एस. टी.तून जावे लागे. धावपळ करून गाडी पकडायची असे. शाही इतमामाने जाण्याची ही पहिलीच वेळ होती. त्यामुळे थोडी अस्वस्थताही वाटत होती. या इतमामात सत्यशोधन कितपत होणार अशी शंका मनाला टोकरत होती. ८॥ च्या सुमारास आमचे विमान सांताक्रूझ विमानतळावर निघाले आणि १०। च्या सुमारास धुळ्याच्या धावपट्टीवर उतरले. मुख्यमंत्री असल्यामुळे स्वाभाविकपणेच स्वागताची एकच गर्दी उडाली. पण पाच मिनिटातच आमच्या मोटारी मालेगावच्या दिशेने धावू लागल्या.

११॥ ला मालेगावच्या डाक बंगल्यात प्रथम एका खोलीत पोलीस अधिकाऱ्यांसमवेत आमची चर्चा सुरू झाली. चर्चेच्या वेळी मुख्यमंत्री, तसेच श्री. मधुकरराव चौधरी व डॉ. रफिक झकेरिया हे मंत्री, डी. बी. पाटील व मी हे विरोधी पक्षाचे आणि आयेशा इक्बाल व डॉ. हिरे हे स्थानिक काँग्रेसचे आमदार इतके जण होतो. आय. जी. श्री. वाघ, डी. आय. जी. श्री. चतुर्वेदी, डी. एस्. पी. श्री. शिवेश्वरकर, कलेक्टर श्री. पद्मनाभय्या इतकेच अधिकारी प्रथम होते. श्री. खान व आणखी एक जण या प्रत्यक्ष दंगलीत हजर असलेल्या दोघा पोलीस अधिकाऱ्यांनाही बोलावून घेतले. प्रथम श्री. वाघ यांनी झालेल्या घटनांचे निवेदन केले व नंतर आम्ही प्रश्न विचारू लागलो. 'त्या दिवशी पुरेसा पोलीस बंदोबस्त होता का?' या प्रश्नाला होकारार्थी उत्तर मिळाले, पण खान यांना काही प्रश्न विचारले, तेव्हा त्या भागात पाच एस्. आर्. पी. होते, वायरलेसवर संदेश मिळाल्यावर खान तेथे गेले आणि पहिली दगडफेक सुरू झाली. तेव्हा पोलीस अपुरेच होते, हे स्पष्ट झाले. त्याचप्रमाणे ज्या वेळी दंगलीचा संभव असतो त्या वेळी 'बॅड् कॅरॅक्टर्स'चा पकडण्यात येते तसे केले नव्हते, हेही स्पष्ट झाले. लाठी चार्जनंतर अश्रुधूर सोडला नाही, एकदमच गोळीबार केला. कारण 'जातीय दंगलीच्या वेळी कडक उपाय योजा' हाच आदेश आहे, असे सांगण्यात आले. या व्यतिरिक्तही बरीच माहिती या चर्चेत मिळाली.

नंतर आम्ही दंगलग्रस्त भागाची पाहणी करण्यास गेलो. हा कार्यक्रम अतिशय असमाधानकारक झाला. कार्यकर्ते, वार्ताहर व नागरिक यांनी फार गर्दी केली. त्यांना ढकलून बाजूला करणे आणि आम्हाला हवी असलेली माहिती देणे, हे करताना पोलिसांची तारांबळ उडाली. शांतपणे प्रश्न विचारणे शक्य होईना. आपल्या गैरशिस्त समाजजीवनाचे बेंगरूळ स्वरूप आमच्या सत्यशोधनाला ग्रासून टाकत होते. जिथल्या किरकोळ चकमकीमुळे दंगलीचा भडका उडाला, ते पानाचे दुकान बापुडवाणेपणाने उभे होते. लोक भयग्रस्त होते. एका ठिकाणी रक्ताचे डाग पडले होते. तेथे गोळीबारात एक जण ठार झाला होता. दुसरीकडे दुसऱ्या मजल्यावरील घराच्या भिंतीत गोळ्या घुसल्याच्या खुणा होत्या. तिसऱ्या ठिकाणी जळलेल्या सायकली व गाड्यांचे अवशेष आ वासून पडले होते. एका उर्दू शाळेजवळ आम्हाला लोक घेऊन गेले. होय, पोलीस जे आम्हाला दाखवणार होते, तो प्लॅन बाजूस राहून लोकच आम्हाला काही गोष्टी समक्ष पाहण्यास घेऊन जात होते. त्या उर्दू शाळेजवळ दंगा झाला नव्हता आणि तरीही एकजण गोळीबारात ठार झाला होता. बजरंगवाडीतील काही हिंदू बाया म्हणत होत्या, 'आम्हाला लई भ्या वाटतं.'

ज्या सायजिंग फॅक्टरीला आग लावण्यात आली होती ती आम्ही पाहिली. तेथे आवारातच असलेले एका हिंदूचे घर जळाले होते. फॅक्टरी जाळण्यासाठी सात–आठ जण तोंडाला फडकी बांधून आले व त्यांनी बोळे टाकले असे काही जणांनी सांगितले. येथे नुकसान भयंकर झाले. पण आगीचा बंब पोहोचू शकला नाही, आणि कोणी गुन्हेगार पोलीसांना सापडला नाही. मालकाला बहुधा इन्शुअरन्स कॉर्पोरेशनकडून काही नुकसान भरपाई मिळेल. पण अनेक कामगारांचा

मलपृष्ठ २ वर

रोजगार गेला होता. त्यांचे उध्वस्त चेहरे, उध्वस्त फॅक्टरीपेक्षा अधिक करुणाजनक होते.

ऐन मध्यान्ह्याचे चैत्राचे ऊन रणरणत होते. ढकला ढकलीतून वाट काढीत आम्ही काही पाहत होतो, काही ऐकत होतो. काही मनाने टिपत होतो. अखेर ही पदयात्रा सरली आणि मोटारी झपाट्याने शांतता समितीच्या बैठकीकडे निघाल्या. कलेक्टरांच्या प्रास्ताविक भाषणानंतर श्री. हरुन अन्सारी बोलले. ते म्हणाले, 'कर्फ्यु ऑर्डर उठवा. शांततेसाठी १४४ कलम ठेवा. पण लोकांचा रोजगार, दैनंदिन कामे सुरू होऊ द्या. या गावात हातावरच पोट असणारे अनेक आहेत.त्यांच्या चुली थंडावल्या आहेत.' नंतर आणखी एक भाषण मी ऐकले. पण मला या बैठकी इतकेच निहाल अहमदना भेटणे आवश्यक वाटत होते.

मी बैठकीतून निघालो व सोशलिस्ट पार्टीच्या कचेरीवर गेलो. निहाल अहमद व अन्य कार्यकर्ते माझी वाट पाहत होते. निहाल अहमद हे माझे निकटचे स्नेही आहेत. ते १९६७ ते ७२ आमदार असताना व पक्षात एकत्र काम करताना मला त्यांची वैशिष्टचे लक्षात आली आहेत. निहाल अहमदना गरिबांबद्दल सहानुभूति आहे हे म्हणण्यापेक्षा अन्यायाबद्दल चीड आहे. ते स्वभावाने कडक आहेत. एकदा ते झोपडपट्टीतील काही कार्यकर्त्यांची खरडपट्टी काढीत असताना त्यांचे प्रखर स्वरुप मी पाहिले आहे. त्यांना राजकारणातील डावपेच उत्तम अवगत आहेत आणि मालेगावातील जनमानसावर त्यांची पकड आहे. १९७२ साली निवडणुकीत पराभूत झाल्यावरही त्यांची कामे जोरात चालू आहेत. निकटच्या परिचयावरून मी हे खात्रीने सांगू शकतो की त्यांच्या मनात जातीयवादाचा लवलेश नाही. परंतु निहाल या वेळी मला खूपच प्रक्षुब्ध झालेला दिसला. तो मला म्हणाला, 'गोळीबारात सगळे मुसलमानच मारले गेले. हे कसं काय ?' या बाबतीत त्यांनी काढलेल्या जाहीर पत्रकात मालेगावात काही जातीय प्रवृत्तीचे लोक असून अधिकाऱ्यांची त्यांना फूस आहे असा आरोप केलेला आहे. या संदर्भात त्यांनी मला सांगितले की, बजरंग वाडीतील भीमा गवळी यास जातीय दंगलीत शिक्षा झाली होती. त्याच्यावर पोलीसांनी चॅप्टर केस दाखल केली. परंतु शहर कांग्रेस कमिटीच्या सेक्रेटरीने भीमा गवळी चांगल्या वर्तनाचा आहे असे ॲफिडेव्हिट केल्याने त्याला तडीपार केले जात नाही. 'अशी माणसेच दंगा करतात' असे सांगून निहाल अहमद म्हणाले, पानावर सुपारी देण्यावरून जी कुरापत निघाली तो भीमा गवळीचा भाचा होता.' निहाल पुढे म्हणाला, 'मालेगावात मुसलमान बहुसंख्य आहेत. म्हणून त्यांना दहशत बसविली पाहिजे असे काही अधिकाऱ्यांना वाटते.' निहालने त्याच्या पत्रकात या गोष्टीचा उल्लेख केला असून अशाने पुन्हा दंगल होण्याची भीती आहे असा इशारा दिला आहे. अधिकाऱ्यांवर टीका करताना निहाल म्हणाला, 'दंगल पसरली नाही कारण आपला पक्ष व इतरही अनेक लोक जातीय नाहीत. बजरंगवाडीजवळ कर्फ्यू आहे ते बरोबर, पण ज्या उत्तर भागात काहीही झालं नाही तिथं मुसलमान जास्त आहेत म्हणून केवळ कर्फ्यु ऑर्डर लावली आहे.' दंगल दक्षिणेला आणि कर्फ्यु उत्तरेला ही 'आग सोमेश्वरी बंब रामेश्वरी' रीत पाहून मीही चकीत झालो.

मी निहाल अहमदला म्हणालो,

'तू शांतता कमिटीवर बहिष्कार का घातलास?' यावर तो म्हणाला, 'ज्या शांतता कमिटीत दंगल घडवून आणणारे काही गुंड बसतात तेथे मी साफ येणार नाही.' निहालच्या कडक स्वभावाची कल्पना असल्यामुळे मी त्याला येण्याचा अधिक आग्रह केला नाही.

'तुझे म्हणणे मुख्यमंत्र्यांना सांगेन.'

एवढे सांगून आणि कार्यकर्त्यांशी थोडी अधिक बातचीत करून मी परत निघालो.

शांतता समितीची बैठक संपली होती म्हणून मी डाक बंगल्याकडे गेलो. तेथे गेल्यावरच मला समजले की मुख्यमंत्र्यांनी शांतता समिती बरखास्त केली व कलेक्टरांना पंचवीस जणांची नवी, शांततेला खरी पोषक ठरेल अशी समिती बनविण्यास सांगितले. माझ्या मनात आले की निहालचा आक्षेप सार्थ ठरला. मला इतकेच वाटले, की त्याने बैठकीतच हे सांगितले असते व नंतर निर्णय झाला असता तर अधिक बरे झाले असते.

मी इतर काही जणांशी बोलत होतो. तेथे भेटलेल्या एका विद्यार्थ्याला मी विचारले, 'भीमा गवळी हा तुला माहीत आहे का?' तो म्हणाला, 'मी तेथे जवळच राहतो. भीमा पहिलवान आहे. गरम डोक्याचा आहे, आक्रमक आहे. पण बजरंगवाडी मुस्लिम वस्तीने वेढलेली आहे. तेथे जगताना चार हिंदू तरी बलदंड असलेच पाहिजेत.' स्वसंरक्षणासाठी आवश्यक असलेला बलदंडपणा कोठे संपतो आणि आक्रमक गुंडगिरी कोठे सुरू होते हे सांगणे कठीण आहे. चांगले व वाईट यातील सीमा रेषा अस्पष्ट आहे.

वार्ताहराशी थोडे बोलून मी जेवायला गेलो. साडेतीन वाजून गेले होते. भूक सपाटून लागली होती. दंगलग्रस्त भागाची दृश्यं मनाच्या पटलावरून अस्पष्ट होत चालली होती.

पुनश्च धुळ्याला आलो. वाटेत एका खेडेगावात आम्हाला लोकांनी अडवले 'प्यायला पाणी मिळालेच पाहिजे' ही घोषणा होती. मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनानंतर आम्ही पुढे निघालो. दंगलीत जखमी झालेल्या चार-पाच जणांना धुळ्याच्या हॉस्पिटलमध्ये आणले होते. सर्वजण मुसलमानच होते. त्यातला एक जण आमदार डॉ. हिरे यांचा ड्रायव्हर होता. त्याला पाहून हिऱ्यांना धक्काच बसला. जखमीपैकी एक तरुण मुलगा त्याच दिवशी वारला होता. त्याच्या म्हाताऱ्या बापाने मुख्यमंत्र्यांना भेटून प्रेत लवकर ताब्यात द्या म्हणून विनंती केली. बापाचे दुभंगलेले काळीज माझे मन चिरीत गेले.

विषण्ण अंतःकरणाने हॉस्पिटलबाहेर पडलो. सातला विमान परत मुंबईत आले. आमदार निवासात येताच, दर दोन पावलाला, कोणीतरी विचारी, मालेगावला काय पाहिले ? जुजबी उत्तरे देऊन मी पुढे जात होतो. पण 'टेन्शन कमी झालाय. दंगा थांबलाय' ही दोन वाक्ये ऐकल्यावर ऐकणाऱ्यांच्या मनावरचा भार कमी होत होता, आणि तोही चटकन पुढे निघून जात होता.

□